रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, १६ एप्रिल २०२३



# उत्तर प्रदेशाच्या राजकारणातील गुन्हेगार बादशहासाठी खोदली कबर ?

देशातील उत्तरप्रदेश राजकीयदृष्ट्या महत्वाचे,मोठे राज्य आहे. राज्यातून सर्वात अधिक म्हणजे ८० खासदार व ४०४ आमदार निवडून येतात.या राज्यातील निवडून आलेल्या सदस्याने देशाचे नेतृत्व केले आहे. राज्यात अनेक वर्षे काँग्रेसची सत्ता होती. १९५० पहिले मुख्यमंत्री गोविद वल्लभ पटेल होते. त्यानंतर राज्यात भारतीय क्रांती दल, काँग्रेस संघटन,जनता पार्टी,बसपा, सपा आदी पक्षांची



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

सत्ता होती. राज्याचे नेतृत्व प्रभूत्वान नेत्यांनी केले आहे. पण दुर्देवाने या राज्यात गुन्हेगारी,गुंडगिरी, खंडणी महिलावरील अत्याचार वाढत गेले. यात अतिक अहमद कहाणी एखाद्या चित्रपट कथेला शोभणारी आहे. अतिक हा हाजी फिरोज टांगेवाल्याचा अनपढ मुलगा. त्याचे वडील हे सुध्दा गुन्हेगारी प्रवृत्तीचे होते. ते आपल्या भावांना, मुलांना चांगले शिक्षण देऊ शकले नाहीत. अतिकने वडिल्याच्या पाऊलावर पाऊल टाकले व तोही गुन्हेगारी क्षेत्राकडे वळला. त्याच्या विरोधात पहिला गुन्हा १९८३ दाखल झाला होता.तेंव्हा तो १८ वर्षाचा होता. त्याला गुन्हेगारातून पैसा मिळू लागल्याने गुन्ह्याचे प्रमाण वाढत गेले.त्यामुळे पोलिसांचा पाठलाग सुरु झाला. पोलिस आपले एनकाउंटर करतील,याची भीती वाटत होती. मग त्याने धार्मिक कार्ड खेळले.यासाठी त्याने राज्याच्या राजकारणात उडी घेतली. तो १९८९ मध्ये इलाहाबाद मतदार संघातून अपक्ष उमेदवार म्हणून उभा राहिला व त्यात त्याला मिळाला. मग तो आपले गुन्हे झाकण्यासाठी राजकारणाचा आश्रय घेवू लागला.पण निवडकीत त्याच्या विरोधात चांदबाबा हा उमेदवार उभा होता.त्यामुळे त्याने दहशत निर्माण करण्यासाठी त्याच्या रोशनबाग पराठा केंद्रावर हल्ला व गोळीबार, बॉम्ब स्फोट केला. यात काही जणांची जीव गेला. हे अतिकने घडविले होते. त्यानंतर तो १९९१, १९९३ व १९९६ मध्ये इलाहाबाद मतदार संघातून निवडून लढविली व त्यात यश मिळत गेले. तो राजकीय प्रतिष्ठीत नेता बनला. त्याने पहिली निवडणूक अपक्ष नंतर मात्र सपा व बसपाचे समर्थन घेवून निवडणूक लढविली होती. तो २००२ अपना दलचा प्रदेशाध्यक्ष बनला. त्याने २००४ मध्ये फूलपूर या लोकसभा मतदार संघातून निवडणूक निवडणूक लढविली व तो संसदेत पोहचला. याच फलपूर मतदार संघातून माजी पंतप्रधान जवाहलाल नेहरू यांनी निवडणूक लढविलेली होती. लोकसभेवर निवडून गेल्याने त्याला विधानसभेचा सदस्याचा राजीनामा द्यावा लागला, पण त्याने त्या जागेवर २००५ मध्ये आपला छोटा भाऊ खलीद अजीम उर्फ अशरफ याला उभे केले.त्याच्या विरोधात 'बसाप'चे उमेदवार राजू पाल उभे होते. पण निवडणुकीत भावाचा पराभव झाला.त्यामुळे त्याने राजकीय दहशत दाखविण्यासाठी राजूपाल यांचेवर अनेकवेळा प्राणघातक केले. नंतर राजूपाल यांची हत्या केली गेली.यानंतर अतिक याच्या राजकारणाला उतरती लागली. २००७ व २००९ च्या निवडणुकीतही पराभव झाला. पण २०१४ तो 'सपा'तर्फे पुन्हा निवडून आला. पण नंतर २०१८ मध्ये फूलपूर लोकसभा मतदार संघातून त्याला पराभव पत्कारावा लागला. इतकेच नव्हे २०१९ वाराणशी मतदार संघात भाजपाचे नेते नरेंद्र मोदी यांच्या विरोधी अपक्ष म्हणून उमेदवारी दाखल केली होती. राजकारणात सतत पराभव होत असल्याने अतिक निराश झाला. त्याने खंडणी, जीवे मरण्याची धमकी, खून, अपहरण असे गंभीर गुन्हे करू लागला. त्याने रेल्वे विभागाचे भंगार व इतर गुंडगिरीच्या जोरावर कंत्राटी कामे करुन कोट्यधुश बनला. पहाता! पहाता! त्याने आर्थिक साम्राज्य निर्माण केले. तो अरबपती बनला! तो आंतर राज्य गुन्हेगार टोळीचा संचालक बनला. त्याचे टोळी क्रमांक आय. एस. २२७ असा होता. या टोळीचे १२१ जण सक्रिय सदस्य होते. त्याचे विरोधात प्रयागराज विभागातील खुल्दाबाद या पोलिस स्टेशनमध्ये २५० गुन्ह्याची नोंद झाली होती.पण अतिक हा फिर्यादी, साक्षीदार आदींना जीवे मारण्याच्या धमक्या देत असे, त्यामुळे काही जणांनी तक्रारी मागे घेतल्या, तर पुराव्याअभावी खटल्यातून तो सुटला.तरीही ५० गुन्हे त्याचे विरोधात प्रलंबित आहेत. उत्तरप्रदेश मध्ये २०१७ मध्ये आदित्यनाथ योगी यांचे सरकार आले. योगी मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी राज्यातील गुंडगिरी, गुन्हेगारीच्या विरोधात पाऊल उचलले. एक तर शरण या! अन्यथा कठोर कारवाईला सामोर जावे लागेल! असे आव्हान त्यांनी दिले. यातून गुन्हेगाराची व गुंडाची संपत्ती बुलडोझरच्या सह्याने उध्वस्त केली जाऊ गेली. तेंव्हा अनेक गुंड गळ्यात पाट्या घालून पोलिसांना शरण येवू लागले. मुख्यमंत्री योगी सरकारच्या बुलडोझर कारवाईला धार्मिक रंग देण्याचा प्रयत्न झाला. पण उत्तर प्रदेशच्या जनतेने दुसऱ्यांदा योगींना बहुमताने सत्तेत आणले. दरम्यान योगी सरकारने अनेक माफिया, गुंड नेते यांचे विरोधात कारवाई सुरु अधिक गतीने सुरु झाली. २०१७ मध्ये योगी सरकार सत्तेत आल्यापासून राज्यात सुमारे १० हजारच्यावर चकमकी झाल्या. त्यात १८० जण ठार मारले गेले. यातील सर्व गुन्हेगारांवर ७५ हजार ते ५ लाखांचे इनाम होते. गेल्या सहा वर्षात ४९११ आरोपी जखमी झाले. तर १३ पोलिसांना हौतात्म्य पत्कारावे लागले तर १४२४ पोलिस जखमी झाले आहे. या कारवाईचे राज्यातील सामान्य जनता स्वागत करत आहे. तर दुसरीकडे योगी हे गुन्हेगार व माफिया व गुंडाराज कर्दनकाळ बनले, गुंड व गुन्हेगार कोठेही लपले तरी त्यांना पाताळातून शोधून काढून त्याला जमिनीत गाढू टाकू! अशा स्पष्ट इशारा योगींना दिला. पण विरोधी पक्षाला मात्र हे मान्य नव्हते. मुस्लिम व्होटर नाराज होत चालल्याने विरोध पक्ष नेत्यांनी गुंडाची बाजू घेणे राजकीय मजबूरु होती.अतिक याने २०१७ मध्ये विद्यापीठातील प्राध्यापकाला मारहाण केल्यानंतर तो चार वर्षापासून सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार गुजरातच्या अहमदाबाद जेलमध्ये आहे. तर त्याचा भाऊ अशरफ अहमद याच्या विरोधात ५२ गुन्ह्याची नोंद आहे. तो उत्तरप्रदेशच्या जेलमध्ये आहे.हे दोघे जेलमध्ये




असताना गुन्हेगारीचा कट रचला. त्यासाठी अतिकचा मुलगा, पत्नी, भाऊ व इतर साथीदार सहभागी व मदत केली. दि. ११ फेब्रुवारी २०२३ रोजी अतिक व त्याचा भाऊ अशरफ यांच्या उत्तर प्रदेश जेलमध्ये सुमारे दोन तास भेट झाली. तेंव्हा बसपाचे आमदार राजूपाल या खून प्रकरणात उमेश पाल हे मुख्य साक्षीदार असल्याने त्याचा काटा काढण्याचे ठरले. त्यानुसार कटाचे नियोजन करण्यात आले. त्यात पैसा व १६ मोबाईल अतिकच्या पत्नीने विकत आणले. यात कटात भाऊ होताच. अतिकचा मुलगा असद, लल्लागदी,विजयउर्फ उस्मान चौधरी, गुडूमुस्लिम व गुलाम या लोकांनी प्रयागराज येथे दि. २३ फेब्रवारी २०२३ रोजी बॉम्ब फेकला,गोळ्या झाडून उमेश पाल यांची हत्या केली गेली.यावेळी दोन पोलिस सुरक्षा कर्मचाऱ्यावर गोळ्या झाडून मारले गेले. हे हत्याकांड नियोजनबध्द पध्दतीने करण्यात आले होते. या हत्याकांडाचे धागेदोरे जुळविताना या कटात अतिकच्या पत्नीचा व इतराचा सहभाग असल्याचे स्पष्ट झाले. या हत्याकांड दोघे चकमकीत ठार मारले गेले. पण अतिकचा मुलगा असद अहमद व साथीदार गुलाम हे फरार झाले,त्यांचेवर पाच लाखाचे इनाम झाले, पण ते पोलिसांसमोर शरण आले नाहीत. दि.१३ एप्रिल रोजी हे झाशी येथून येत असताना पोलिस पथकाने त्यांना अडविले. तेंव्हा त्यांनी पोलिसांच्या दिशेने गोळीबार केला. त्याला प्रत्युत्तर म्हणून पोलिसांना गोळ्या झाडल्या.त्यात हे दोघे जागीच ठार झाले. या दोघांचा 'सुपूर्द ए खाक' (दफनविधी) झाला. असद हा अतिक अहमद याचा मुलगा म्हणून चकमकीत मारला गेला नसून तो प्रत्यक्ष हत्याकांडात गोळ्या झाडण्यात आघाडीवर होता. उत्तर प्रदेशच्या योगी सरकारने राजकारणाचा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या कुटुंब टोळीचा खात्मा केला.

.देशात पहिली एनकाऊंटर मुंबई पोलिसांनी १९८२ मध्ये केले. यात मन्या उर्फे मनोहर सुर्वे ठार झाला. त्या घटनेवर आधारित 'शुटआऊट वडाळा' चित्रपट निघालेला आहे. देशात १० एनकाउंटर स्पेशालिस्ट पोलिस अधिकारी आहेत. त्यात १) प्रदिप शर्मा-मुंबई २) अशोकसिंघ बदोरिया- मध्यप्रदेश,३) दया नायक- मुंबई,४) किशन चद्रा-बिहार,५) राजबीर सिंघ- दिल्ली ६) नवनीत शकेला - दिल्ली, ७) मोहनचंद्र शर्मा- दिल्ली,८) अजित गोगरे- छत्तीसगड ९) डी.जी. वंजारा- गुजरात १०) व्हि.जी. सतनार -हैद्राबाद यांनी शेकडो एनकाउंटर केले आहेत. यातील अनेक चकमकीवर प्रश्न चिन्ह निर्माण केले गेले. २००५ मध्ये दिल्लीच्या बाटला हाऊस चकमकीत अतिरेकी मारले गेले.यात पोलिस अधिकारी शर्मा शहीद झाले. तरीही काँग्रेसने या एनकाउंटवर प्रश्न चिन्ह निर्माण केले होते. या चकमकीत अतिरेकी मेलेले पाहून तेंव्हा तर श्रीमती सोनिया गांधी यांचे डोळ्यात अश्रू आलेले होते.न्यायालयाने ती चकमक योग्यच असल्याचा निकाल दिला. २००४ इशरतजहाँ, २००५ ला सोहराबुद्दीन चकमकीची घटना झाली.यात दोघे ठार झाले होते. या दोन्ही घटना गुजरात असल्याने काँग्रेसने गुजरातचे भाजपा सरकार मुस्लिमांना टार्गेट करत आहेत,असा आरोप केला.या पोलिस चकमकी बनावटी दाखवून पोलिस अधिकारी व गुजरातचे तत्कालिन गृहमंत्री शहा यांना आरोपी करुन जेलमध्ये टाकले गेले होते.नंतर तपास यत्रेणेने हे कुंभाड रचले असे दिसून आले व त्यात शहा व सर्वच पोलिस अधिकाऱ्यांची निर्दोष मुक्तता झाली.हैद्राबाद येथे एका महिला डॉक्टरवर बलात्कार करून जीवत जाळले गेले. त्यातील सर्व आरोपी हे चकमकीत ठार मारले गेले. १९९१ पिलीभीती येथे शीख यात्रेकरुंना अतिरेकी समजून एनकाउंटर केले होते. यात ४३ पोलिसांना जन्मठेपेची शिक्षा झाली आहे. महाराष्ट्रात २०२१ महाविकास आघाडीचे सरकार असताना लाजीरवाणी घटना घडली,पोलिस अधिकार्‍यांनी मनसुख हिरेन व्यापार्‍याचे अपहरण व हत्येचा कट रचून जीवे मारले. यात दोन पोलिस अधिकारी आरोपी आहेत.पोलिसांची प्रत्येक चकमक ही सर्थनीय होवू शकत नाही. घटनेत कोठेही एनकाउंटर चा उल्लेख नाही. पण आरोपींना पोलिसांवर हल्ला केला तर सी.आर,पी.४६ अनुसार पोलिसांना उत्तर देण्याचे अधिकार आहेत.देशात गुंड व आरोपींना कायद्याची भीती नसेल ते जर पोलिसावर हल्ला व गोळ्या झाडण्यापर्यंत मजल जात असेल तर त्यांना गाडले पाहिजे. एनकाउंटर नंतर मॅजिस्टेट पोलिसांना चौकशी समोर जावेच लागते. सर्वोच्च न्यायालयाने २०१५ मध्ये पोलिस चकमकीबाबत मार्गदर्शक निर्देश दिलेले आहेत.यात चकमकीचीनंतर पोलिसांना प्रथम नोंद करावी लागते. तसेच सी.आर, पी.१७६ अनुसार मजिस्ट्रेट चौकशी करणे अनिवार्य आहे. यावेळी पोलिस अधिकार्‍यांना वापरलेली शस्त्रे व त्यांना वापरलेल्या गोळ्याचा माहिती द्यावी लागते.राजकीय क्षेत्रातील गुन्हेगार बादशहा अतिक अहमद याला शंभर गुन्ह्यापैकी ४५ वर्षापूर्वीचा प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा सुनावली गेली आहे.त्याचे मुलगा इतर तीघे साथीदार एनकाउंटर मध्ये मारले गेले या टोळीचा अनेकांची मालमत्ता उध्वस्त केली. त्याची ४२५ कोटी रूपायांची संपत्ती जप्त झाली आहे.या टोळीतील एकूण सुमारे २३६८ कोटीची मालमत्ता जप्त झाली आहे. राजकारणातील नेता अतिक हा निर्दयीपणे लोकांची हत्या करतो तेंव्हा त्याचे कधी हात कापले नाहीत. पण योगी सरकारच्या काळात पोलिसां- समोर मात्र तो थरथर कापत होता,मुलगा मेल्याचे कळताच तो रात्रभर रडत बसला. राज्यात योगी सरकारने गुन्हेगार,गुंड माफियाना चांगलाच धाक बसविला आहे. तसा पुरोगामी महाराष्ट्र पोलिसांचा धाक राहिलेला नाही. या सरकारने राजकीय नेता व त्याची माफीयागिरीचा खत्म केली आहे. त्याची कबर खोदून ठेवली आहे.बसाप व सपाने या अतिकला राजकारणात आणून गुन्हेगारीला प्रोत्साहन दिले, ही त्यांची चूक होती. त्याच्या गुन्हेगाराची इतिहास माहित असताना आता तरी चूप बसवयास पाहिजे होते. पण ते राजकारण करत आहेत. गुंडाना,गुन्हेगारांना जात व धर्म कधीच नसतो. त्याचा स्वार्थासाठी, संपत्तीसाठी गुन्हा करणे, हाच त्याचा धर्म असतो.२०२० मध्ये कुख्यात गुंड विकास दुबे हा ब्राह्मण होता,तो चकमकीत मारला गेला. तेंव्हा त्याचा धर्म पाहिला गेला नाही. आय एम आय एम. नेते असुदोद्दीन औवेसी हे जीना प्रमाणे बॅरिस्टर आहेत.त्यांना भारतीय संविधानप्रमाणे हिजाब,तीन तलाक,नागरिक संधोधन कायदा,समान नागरी कायदा, जमू- काश्मीरचे ३७० कलम हटविणे,लोकसंख्या नियंत्रण आदि कायदे नको अरतात. येथे मात्र त्यांना शरियानुसार कायदे पाहिजे असतात.पण शरियानुसार तर गुन्हेगारांना हात तोडणे, चौकात फाशी, गोळ्या घातल्या जातात. पण गुन्हेराबाबत मात्र भारतीय संविधान, कायदा आठवण करून मुस्लिम समाजाची दिशाभूल करतात. देशातील काही राजकीय पक्षाचे नेते, तथाकथित पुरोगामी,चाटूगार पत्रकारांना या गुंडाचा पुळका येतोय ? देशातील सर्व पक्षातील राजकीय नेत्यावर गंभीर गुन्हे आहेत, ही अतिशय लाजीरवाणी बाब आहे. राजकारणाचे खऱ्या अर्थाने शुध्दीकरण करावयाचे असेल तर भ्रष्ट, गुंड, गुन्हेगार प्रवृत्तींचा खात्मा करावा लागेल!

**आधुनिक केसरी**

**उत्तरप्रदेश पोलिसांच्या चकमकीत कुख्यात राजकीय गुंड अतिक अहमद याचा मुलगा असद अहमद व साथीदार गुलाम हे दोघे ठार झाले. अतिक हा गुंड, माफिया, बाहुबली नेता व आंतरराज्य गुन्हेगारी टोळीचा संचालक आहे. तरीही त्याला राजकीय पक्षांनी राजाश्रय दिला. त्यामुळे त्याने राजकारणाचे गुन्हेगारीकरण करण्याचे धाडस केले. यातून आर्थिक साम्राज्य निर्माण केले.राज्यातील राजकीय नेत्यांनी हे कृत्य केले आहे ? ते आता उजेडात येवू लागलेले आहे, त्यावर पांघरण घालण्यासाठी आता स.पा. व बसपा. हे पक्ष या पोलीस चकमकीच्या चौकशी मागणी करत आहेत. तर ए. आय. एम.आय एम. नेते गुन्हेगारी प्रवृत्तीतही 'धर्म' शोधत आहेत. ते जीना विचाराचे व 'दुतोंडी मांडूळ'आहेत. त्यांना सोयीनुसार देशात कायद्यानुसार कायदे हवेत. त्यांना कधी शरियाप्रमाणे तर कधी भारतीय संविधान व कायदे आवडतात .या घटनेतून मुस्लिम समाजाची सहानुभूती मिळवायची आहे, ही त्यांची राजकीय मानसिकता आहे.**




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

श्रेयसचा मार्ग खडतर, काटेरी असतो. तो त्यावर वाटचाल करण्यासाठी धैर्य, निर्धार यांची आवश्यकता असते. सहनशीलतेची आणि कष्टांची परीक्षा असते. या परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्याला यशाचा, समाधानाचा आणि साफल्याचा अमृतकुंभ हाती गवसतो. गौतमाचा सारथी आणि सखा छन्न मात्र त्याच्या घोड्यामागोमाग ऊर फुटेस्तोवर धावत होता. कोणतीही अपेक्षा न ठेवता खरा मित्र शेवटपर्यंत साथ देतो. प्रसंगी प्राणांचीही पर्वा करीत नाही. छन्नाने तेच केले. गौतमाने अनेक वेळा सांगूनही तो परत फिरला नाही. सिद्धार्थ अनोमा नदीच्या काठावर येऊन पोहोचला. ज्या कंथक नावाच्या अश्वावर स्वार होऊन सिद्धार्थ इथपर्यंत पोहोचला होता, ते मुके पण इमानी जनावर आता थकले होते. सिद्धार्थाने प्रेमाने त्याच्या अंगावरून हात फिरवला. त्या मुक्या जनावरालाही जणू आपल्या प्राणप्रिय धन्याचा होणार वियोग समजला होता. सिद्धार्थाने छन्नाची कशीबशी समजूत घातली. 'मित्रा, माझे ऐक. तू कपिलवस्तू नगरीला परत जा. महाराज शुद्धोधन आणि यशोधरेची समजूत घाल. मी त्यांच्यावर नाराज होऊन बाहेर पडलो नाही असं त्यांना सांग.' छन्नाजवळ आपले दागिने आणि राजमुकुट सिद्धार्थाने दिले. मोठ्या नाराजीने आणि खिन्न मनाने छन्न परत निघाला.

पुढील भागात गौतमाने केलेले तप, त्याला माराने दाखवलेले प्रलोभन किंवा मार सेनेशी त्याचा झाला सामना याचे जे चित्रीकरण अजिंठा लेण्यात आढळते, त्याबद्दल माहिती घेऊ या.



## आनंदी पहाट

## आपल्या जीवनात सहजीवनाचं महत्व

आधुनिक केसरी


विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्याला आयुष्य जगण्यासाठी सद्यःस्थितीत पैसाच लागतो, पण जीवन आजमावण्यासाठी कोणाचीतरी साथ, सोबत, संगत लागत असते. तुझं माझं जमेना, पण तुझ्याविना करमेना, अशी स्थिती असली तरीही आपल्याला मान्य होतं.

आपल्यापैकी प्रत्येकाला सहजीवनाची गरज भासतेच. कदाचित, प्रत्येकाची तशी मानसिकता आयुष्यातील निरनिराळ्या टप्प्यांवर येत असेल. अर्थात, प्रत्येकाच्या मानसिक पातळींवर होत असलेल्या निरनिराळ्या स्थित्यंतरांवर ही गरज कमी- अधिक होत असेल. आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक अथवा शारीरिकदृष्ट्या जरी एकटं आयुष्य जगणं एखाद्यानं पसंत केलं अथवा स्वीकारलं तरीही त्याला मानसिकदृष्ट्या काहीवेळा, काहीबाबतीत जाणवणारा एकलेपणा मात्र आंतरिक अस्वस्थता निर्माण करण्यास कारणीभूत ठरतो, मानसिक ताण-तणावाचा अनाकलनीय दबाव उत्पन्न होत राहतो. प्रत्येक व्यक्तीला सहजीवनाची गरज, ही मानसिक पातळीवर अधिक आवश्यक असते. सहजीवनाच्या प्रवासाचा तेव्हाच प्रयास वाटत नाही, जेव्हा सकारात्मक दृष्टीकोनातून तो केला जात असतो. आपल्या सुख-दुःखांत, आयुष्यातील चढ-उतरांत सह-प्रवासी देखील आपली साथ-सोबत करणारा असणं योग्य ठरतं. ती साथ-सोबत देखील जीवन के साथ भी; जीवन के बाद भी, अशीच असणं अभिप्रेत असतं. सकारात्मक सहजीवन जगता येणं ही केवळ कला नसून ते एक शास्त्र आहे, असं म्हंटलं तर वावगं ठरणार नाही. ह्या शास्त्रात संवाद, सहवास, सहभाग, सहकार आणि सम-भोग या बाबींचा कृतीशील विचार करावा लागतो, त्यांचा अंगीकार करणं आवश्यक ठरतं. सहजीवन सकारात्मक आणि आनंदी करण्यासाठी साथ-सोबत करणाऱ्या प्रत्येकानं कर्तव्यापोटी स्वीकारलेली जबाबदारी समसमान घेतलेली असणं अभिप्रेत आणि अपेक्षित असतं. तशी जाणीव होणं महत्वाचं ठरतं.

## कौतुकाची थाप...

आधुनिक केसरी

शालेय अभ्यासक्रमाप्रमाणे खेळाचाही अभ्यास करावा लागतो .खेळायला ही सराव हवा असतो. उत्तम मार्गदर्शक, गुरु खेळासाठी हवा असतो. खेळातसुद्धा यश अपयश असतेच.कधी हार तर कधी जीत असतेच. "हरणं म्हणजेच जिंकणं असतं" हे हसत स्वीकारता आलं पाहिजे. हरणाऱ्या खेळाडूंनी जिंकणाऱ्या खेळाडूचे अभिनंदन केले म्हणजे ही त्याची खेळाडू वृत्ती आहे.खरं तर हरणाऱ्या खेळाडूची स्टेजवर सुद्धा आधी अभिनंदन केले पाहिजे. कारण तो हरतो म्हणूनच दुसरा जिंकतो. खेळ हा आपल्या जीवनातील अविभाज्य भाग आहे. त्यामुळे बुद्धिमत्ता विकसित होते. विचारांना चालना मिळते. शरीर शक्तिशाली बनते .खेळासाठी वय नसते.

संस्कारधन

सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515
भाग-70

सगळ्या वयात वेगवेगळे खेळ आपण खेळू शकतो. खेळामुळे भेटीसाठी होतात. संवाद होतो.मानसिक तणावापासून आपण दूर राहतो .शरीर व मन उत्साही होते .खेळामुळे शरीर निकोप होते. त्यामुळे मन ही निकोप होते. लहानपणाच्या खेळात शिस्त नसते. फुलपाखरांसारखे ते स्वच्छंदी असतात. पुढे खेळात शिस्त असते .ती तशीच आपल्या जीवनालाही वळण लावते. खेळांनी व्यायाम होतो. शरीर बळकट होते. तर जीत संयम आणि नम्रतेने स्वीकारण्याची सवय लागते. नव्हे ती आपण लावली पाहिजे. खेळताना डोळे मेंदू मन शरीराच्या प्रत्येक अवयवाचा वापर होतो. त्यामुळे मनही संतुलित राहते .मैदानावरील किंवा बैठे खेळ खेळावे. संगणक किंवा मोबाईल वरचे खेळ नको. त्यातील काही विचित्र खेळ मुलांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त करतात .हे कसले जीवघेणे खेळ ?? या खेळापासून मुलांना वेळीच रोखा .काही बाबतीत मुलांना थोडी कडक शिस्त हवीच. घरात कोणाचा तरी धाक असावाच .आपणही कुणाचा तरी धाक धरावा. मुलांना आपोआप सवय लागेल .अभ्यासासोबत जीवनात खेळायलाही खूप महत्त्व द्यावे. खेळामुळे मनोरंजन सुद्धा होते. स्वस्थ शरीरातच स्वस्थ मनाचा विकास होतो. त्यासाठी पालकांनी सुद्धा मुलांसोबत खेळ खेळावे. खेळाविषयी चर्चा व्हावी. मुलांची अधिकची ऊर्जा खेळात खर्ची होते. मग ते घरात जास्त त्रास देत नाही .संघर्ष करायला ते शिकतात .संघ भावना तयार होते. जबाबदारीची जाणीव होते .आत्महत्या करण्याचे विचार येत नाहीत .चला तर मग मुले नातवंडा सोबत खेळ खेळूया...

## हत्ती आणि ससाची पंचतंत्र कथा

आधुनिक केसरी

एका दाट जंगलात हत्तींचा कळप राहत असे. हत्ती एका तलावाजवळ एका ठराविक ठिकाणी राहत असत आणि त्यांना बाहेर जाण्याची गरज नव्हती. काही काळसाठी पाऊस नसल्यामुळे तलाव कोरडा होऊ लागला. काही हत्तीं हत्तीराजाला भेटले आणि म्हणाले, महाराज, आमच्याकडे पुरेसे पाणी नाही. आमची लहान मुलं मृत्यूच्या मार्गावर आहेत. आपल्याला आणखी एक जागा शोधायला पाहिजे जिथे मुबलक पाणी असेल तेथे . थोड्या वेळाने विचार केल्यावर हत्ती राजा म्हणाला, “मला माहित आहे एक जागा जेथे खूप मोठा सरोवर आहे, ती जागा अजूनही पाण्याने भरलेली आहे. चला तिथे जाऊ . दुसऱ्या दिवशी सकाळी ते जागा शोधण्यासाठी निघाले . पाच दिवस आणि पाच रात्री प्रवास केल्यानंतर हत्ती शेवटी त्या जागेवर पोचतात. तेथे खरोखरच एक मोठा तलाव होता. तो पाण्याने भरला होता. सरोवराच्या सभोवतालच्या जागेवर असंख्य छिद्र होते, ज्यात सशांचा समूह जिवंत होता. जेव्हा हत्तींनी तलावामध्ये इतके पाणी पाहिले तेव्हा ते आनंदी झाले आणि जगाची पर्वा न करता पाण्यात उडी मारण्यास सुरवात केली. अचानक, सर्व हत्तींनी उडया मारल्यामुळे बऱ्याच छिद्रांचा नाश झाला, अनेक ससे हत्तीखाली पायदळी तुडवले गेले, तर अनेकांचा मृत्यू झाला, तर बरेच जण गंभीर जखमी झाले. परंतु ससा हे दुःख थांबवण्यासाठी काहीही करू शकला नाही, केवळ पळालेले सशे स्वतः ला वाचवू शकले. संध्याकाळी हत्ती निघून गेले तेव्हा पळून गेलेले ससे परत आले. ते दुःखाने एकत्र जमले आणि एकमेकांशी बोलू लागले, “प्रिय! सर्वत्र पाण्याअभावी येथे हत्ती रोज येतील. आपण काहीतरी विचार केला पाहिजे, अन्यथा उद्या आपल्यातील बरेच जण चिरडले जातील. आपण शक्तिशाली हत्तींविरुद्ध काय करू शकतो? जगण्यासाठी आपण हे ठिकाण सोडले पाहिजे. त्यातील एक ससा सहमत नव्हता, तो म्हणाला- **क्रमशः**

## निरूपण

आधुनिक केसरी

जानासि सकलं मातः
त्वं मदपेक्षया च मे |
मूढोऽहं च विमूढोऽहं
वदामि त्वां पुनः पुनः || 7 ||
हे माते, माझ्यापेक्षा माझे सर्व काही तू जाणतेस. मी मूढ आहे. मी विमूढ आहे, म्हणून तुला पुनः पुन्हा सांगतो.


डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

अचल हिमालय सम रहे, विघ्न आय अरु जाय ।
उद् विग्न नहिं दृढ़ रहे, धीर स्वभाव कहाय
।।२४।।(स्वर्वेद तृतीय मण्डल द्वितीय अध्याय) ०३/०२/२४

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :

संकटात किंवा आपत्तीत हिमालयासारखे स्थिर होउन दृढ रहावे , उद्विग्न होऊ नये. भलेही विघ्ने येवोत अथवा जावोत. असा धैर्यवान पुरुषाचा स्वभाव सांगितला आहे.


स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## देवदर्शन

आधुनिक केसरी


1) विश्व सत्य आहे परब्रम्ह सत्य नाही.
2) विश्व सत्य आहे परब्रह्म ही सत्य आहे. स्थलकालांनी बांधलेले विश्व मरणाच्या स्वाधीन आहे. ते सत्य असणे शक्य नाही. त्याच्या पलीकडे काही गुढतत्व असणार आहेत ते सामान्य विचाराच्या लोकांना समजणार नाही. त्याला खूप ज्ञानवंताची गरज असणार आहे. 3) विश्व सत्य नाही परब्रम्ह मात्र सत्य आहे. ज्ञानी पुरूषांना हा पर्याय मान्य आहे. विश्व सत्य नाही पण ते असत्य देखील नाही. मग ईथे प्रश्न पडतो की हे निरामय विश्व अनादि, अनंत, एकसुरी, एकजिनसी, निष्क्रिय, निर्गुण, आणि अव्यक्त परब्रम्हा बरोबर मात्र बहुआयामी, सक्रिय, सगुण, व्ययुक्त आणि व्यक्त विश्व कसे निर्माण झाले असेल. हा एक चमत्कार म्हणावा लागेल. ब्रम्हज्ञानी पुरूषाला सत्य ज्ञानमय, अनंत, अपार, निर्गुण व परब्रह्म खरे आहे असे वाटते. निरंतर ध्यानाने अखंड उपासनेने किंवा अत्यंत खोल सतत ब्रम्ह विचाराने ज्याचे मन केवळ ब्रम्हस्वरूपातचं रहायला शिकते,समाजातील दुराचारी, दुष्टबुध्दीन लोकांच्या बद्दलही त्यांच्या मनात अपार करूणा भरलेली असते. भेदभावाच्या व देहच्या पलीकडे जो परमात्मा आहे त्याच्या अस्तित्वावर त्यांचा पूर्णपणे विश्वास असतो. त्यांना "मी ब्रम्हच आहे" असा साक्षात्कार होतो. विश्वाच्या अस्तित्वावर देखील या लोकांचा विश्वास नसतो. अशी विलक्षण माणसे ब्रम्हपदाला पोहचलेली असतात. मित्रांनो आपल्या सारखी सामान्य माणसं यांच्या पेक्षा वेगळी असतात. खरं सांगायचं तर आपले मन या अवस्थेला पोहचले नाही. **क्रमशः**


सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## भक्तांची काळजी सद्गुरुला असतेच

आधुनिक केसरी

नारायण नावाचा एक फार मोठा सरकारी अधिकारी होता.तो मनापासुन स्वामी भक्ती करायचा.त्याची पत्नी,आई आणी मुलगा पण धार्मिक होते पण त्या लोकांची स्वामीवर श्रद्धा नव्हती. त्यांच्या मते स्वामी म्हणजे काय एका मनुष्यच, कोणी देव नाही.नारायण स्वामींच्या दर्शनाला येतो.आशीर्वाद घेऊन परतताना त्याच्या लक्ष्यात येतं की स्वामींना भेट म्हणुन आणलेली शाल द्यायची राहिली आहे.
रस्त्यात त्याला गौराबाई अडवतात.गोराबाई म्हणजे काय जणू दुसऱ्या सुन्दाराबाईच.
स्वामींना शाल देईन,असं म्हणुन शाल घेतात,पण स्वामींना काही देत नाही.
इकडे नारायणाला एका सरकारी कामा निमित्य अपरात्री बाहेर गावी जायचं असतं.नारायणाची आई आज किंकरांत आहे असं म्हणुन त्याला जाण्यापासुन परावृत्त करते. तरी नारायण "स्वामींचा सेवक नाही भयं चिंता" असं म्हणुन बाहेरगावी जातो. इकडे स्वामी थंडीनी कुड कुडतात.समोर शेकोटी असली तरी.भुजंग,आणी चोळप्पाला घोंगडी सुद्धा पांघरु देत नाही.
गौराबाई तेथे येते.स्वामी तिला रागावून नारायनणानी दिलेली शाळे बद्दल जाब विचारतात. गौराबाई निमुटपणे स्वामींना शाल आणून देते. रस्त्यात त्याला दोन वाटमारे अडवतात आणी मारहाण करुन गाठोडी हिसकून घेतात. नारायण रक्तबंबाळ होऊन तिथेच धरतीवर कोसळतो,व कसा - बसा स्वामी - स्वामी म्हणत राहतो.



या जागेच्या काही अंतरावरून दोन पोलीस जात असतात.त्यांना एक मुस्लीम व्यक्ती येऊन,'मागे एकाला दुखापत झाली आहे' असं सांगतत. तरी ते पोलीस आम्हांला वेळ नाही असं सांगून पुढे जातात. पुढे गेल्यावर त्यांना एक हिंदू वृद्ध भेटतो आणी तीच सूचना देतो,तरी ही पोलीस आपल्या वाटेला पुढे जातात. काही अंतरावर गेल्यावर त्यांना स्वामी प्रत्यक्ष येऊन तीच सूचना देतात.
मात्र या वेळेला स्वामींच्या तेज आणी रुबाबा मुळे पोलिसांना नाही म्हणता येत नाही आणी ते दुखापत झालेल्या नारायणाला मदत करायला परततात. सांगायची काही गरज नसावी की मागचे दोन व्यक्तीच्या रुपात स्वमीनीच सूचना दिलेली असते. नारायणाला पाहिल्या बरोबर पोलीस अधिकारी त्यांना लगेचच ओळखतो आणी घरी आणून सोडतो. वैद्याचा उपचार करण्यात येतो आणी नारायणाची प्रकृती हळू हळू सुधरते. नारायणाची आई नारायणाला म्हणते -"स्वामी स्वामी,करुन काय मिळालं? किंकरांती च्या दिवशी नको जाऊ म्हटलं तरी गेला! काय केलं स्वामींनी?" नारायणाचा तरी ही स्वामीवर विश्वास अढळ राहतो. काही दिवसांनी तोच पोलीस अधिकारी नारायणाचे हाल - हवाल विचारायला येतो. नारायण विचारतो -"तुम्हांला मला दुखापत झाल्याची सूचना कोणी दिली हो?" पोलीस म्हणतो - आम्हांला एका वृद्ध माणसांनी सूचना दिल होती. नारायण विचार करतो,त्या दिवशी अपरात्री च्या वेळी,ते पण किंकरांतीच्या दिवशी कोणी त्या सामसूम जागेत आपल्याला पहिले असावे? नक्कीच स्वामीनीच काही केलं असावं. तो आपल्या मुलाकडून स्वामींचं चित्र मागवतो आणी पोलिसांना विचारतो - "काहो! हेच का ते, ज्यांनी तुम्हांला सूचना दिली? पोलीस अधिकारी म्हणतोः-"हो! हो! हेच ते." नारायणाला गहिवरून येतं.त्याच्या घरच्यांना सुद्धा स्वामीकृपेची प्रचीती येते.पण त्यांना प्रश्न पडतो की स्वामींनी अपघात व्हायचाच का नाही टाळला? तितक्यात स्वामी तिथे प्रगट होतात. स्वामी म्हणतातः-"अरे तुम्हांला काय वाटलं की आम्ही मनुष्य आहे म्हणुन काही करू शकणार नाही?" "अरे भगवंताला कोणत्या ही रुपात भक्ताची काळजी असतेच. नारायणाच्या नियतीत मारहाण होतीच.आम्ही नियती बदलत नाही पण भक्ताची त्यातून सुटका कशी करावी,याचं धोरण ठेवतो. अरे खुद्द प्रभू श्रीरामांनी आपलं वनवास चुकवायचा प्रयत्न केला नाही. नियती स्वताच्याच कर्मानी बनलेली असते,तिला चुकवता येत नाही पण त्या नियतीच्या तडाख्यातून आपल्या भक्ताला कसं सोडवावं याच्यावरच सद्गुरूचं लक्ष्य असत."

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

तुका म्हणे त्यागें । विण चुकीजेना भोगें ॥३॥
व्याल्याविण करी शोभनतांतडी । चार ते गधडी करीतसे ॥१॥
कासया पाल्हाळ आणिकांचे देखी । सांगतां नव्हे सुखी साखरेसि ॥ध्रु.॥
कुंथाच्या ढेकरें न देवेल पुष्टी । रूप दावी कष्टी मळिण वरी ॥२॥
तुका म्हणे अरे वाचाळ हो ऐका । अनुभवेंविण नका वाव घेऊं ॥३॥

रविवार, १६ एप्रिल २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -२२३
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●SUNDAY 16 APRIL 2023 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-223 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-16 ●PRICE-5


# हे गंगा भागीरथी उपाधीचे नाटक आता कशाला..?

## विधवा आणि गंगा भागीरथी उपाधी वादः आधुनिक केसरी जनचर्चेत महिलांच्या सडेतोड प्रतिक्रिया

आधुनिक केसरी

**छत्रपती संभाजीनगर : राज्यातील विधवा महिलांना सन्मान मिळवून देण्याऐवजी विधवा शब्दाऐवजी गंगा भागीरथी हा शब्द वापरावा यासाठी शासनाने प्रयत्न सुरू केले. वास्तविक मुलभूत मुद्द्यावर काम करायचे सोडून युगानुयुगाची गुलामी तर सरकार लादत नाही ना? असा प्रश्न या निमित्ताने पडतो. अशा विविध संबोधनापेक्षा स्त्रियांच्या हक्कांबददल विचार होणे जास्त गरजेचे आहे. म्हणूनच असल्या नामांतरात खूप रस असणाऱ्यांनी बुरसटलेले विचार सोडावेत तसेच "हे गंगा भागीरथी उपाधीचे नाटक आता कशाला..?" अशा सडेतोड प्रतिक्रिया आधुनिक केसरीच्या जनचर्चेत महिला वाचकांनी मांडल्या.**

**विषमता निर्माण करणारी उपाधी नको**



जन्मतःच "ती" एक स्वतंत्र व्यक्ती आहे. कुमारी, सौभाग्यवती, विधवा या नवरा असणं अथवा नवरा नसणं या आधारावर तिला कोणतीही उपाधी लावू नये. या स्त्रीयांमध्ये सुद्धा भेद निर्माण करणाऱ्या उपाध्या आहेत. माणूस म्हणून तिचा सन्मान असावा. ती झगडते, लढते अस्तित्व निर्माण करते आहे. तिला स्वतःच्या पायावर उभं राहण्यासाठी संधी उपलब्ध करुन द्यावी. विषमता निर्माण करणारी उपाधी नको. स्त्री-पुरुष समता साधण्यात अडथळा निर्माण होईल असे काही नको. कौटुंबिक, सामाजिक, भावनिक, वैचारिक, असुरक्षितता निर्माण होऊ नये स्त्रीयांमध्ये सुद्धा भेद निर्माण होऊ नये ही काळजी घ्यावी लागेल..!
**- डॉ.सोनिया कस्तुरे सांगली.**
**मोबाईल- 9326818354**



**प्रगतीची उलटी 'गंगा'वाहू नये :** कुठल्याही उपाधीपेक्षा 'तिचे' स्वतंत्र अस्तित्व महत्वाचे असते.त्यामुळे काय म्हणून संबोधावे यापेक्षा 'तिला' समाजात सन्मान,स्वातंत्र्य आणि एकसमान दर्जा मिळणे गरजेचे आहे.त्यासाठी विविध स्तरावर भरघोस प्रयत्न व्हायला हवे.महात्मा फुले,सावित्रीबाई,डॉ.बाबासाहेब आंबेडकर,महर्षी कर्वे आणि इतर अनेकांच्या कार्याचे विस्मरण होवू देता कामा नये.प्रगतीची उलटी 'गंगा'वाहू नये एवढेच.
**डॉ. ज्योती कदम, नांदेड. मोबाईल- 9604466696**



**...त्यांनाही समान वागणूक मिळू द्या :** आजच्या आधुनिक युगात, स्त्री-पुरुष समान असं आपल्याला नेहमीचं सांगितलं जातं. गंगाभागीरथी असं लेबलं तिच्या नावासमोर लावून आपण तिला विधवेपणाची जाणीव तर करून देत नाही ना ? प्रत्येक विधवेला हे लेबल लावलेच पाहिजे का ? ज्याप्रमाणे पूर्वीच्या काळी विधवांच्या बाबतीत अनिष्ट रूढी राजाराम मोहन राय यांनी बंद केल्या होत्या. विधवा स्त्रीला विधवा किंवा गंगाभागीरथी, अशी विशेषण लावण्याची गरजच नाही. **सौ. सीमा देशमुख, अमरावती, मोबाईल- 7498568386**



**आत्मसन्मानतेचा मान देण्यासाठी पुढाकार घ्या :** मुळातच 'विधवा' या शब्दात दूरावा, तिरस्कार असल्याची जाणीव होते. पुन्हा गंगा भागीरथी शब्दासाठी चाललेला खेळ अस्वस्थ करतो. जुन्या जोखडातून ती मुक्त होत असताना तिला सतत काहीतरी उपाधी लावण्याचे नवनवे प्रयोग तिच्या आत्मसन्मानाला ठेच पोहोचवत आहेत. अशा उपाधींचा खेळ थांबवून तिला आत्मसन्मानतेचा मान देण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे.
**- शशीकला भडके, नागपूर, मोबाईल- 9511757018**



# दिंडोरी तालुक्याला गारांचा तडाखा

## गारांचा आकार मोठा असल्याने पिकांचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**लखमापूर : दिंडोरी तालुक्यातील असंख्य गावांमध्ये शनिवार, दि.१५एप्रिल रोजी दुपारी ४.३० वाजेनंतर अवकाळी पाऊस व गारा पडल्याने बळीराजांवर आता डोक्याला हात लावण्याची वेळ आल्याने तालुक्यातील सर्व शेतकरी हतबल झाले आहे. शनिवारी सकाळी पासून सुर्याने जोरदार आग ओकायला सुरुवात केली होती. त्यामुळे दुपारनंतर पाऊस येतो की काय? असे वातावरण तयार झाल्याने नेमके तेच घडले.**

अचानक दिंडोरी तालुक्यातील लखमापुर, म्हेळुसके, ओझे, करजंवण, दहेगाव, वागळुद, ओझरखेड, वणी,पांडाणे, पुणेगाव, फोफसी, दहिवी, पिंपरखेड, कोंशिबे,परमोरी, वरखेडा, अंबे, दिंडोरी, मोहाडी, कोराटे,पालखेड बंधारा, इ.ठिकाणी अवकाळी पाऊस व गारा पडल्याने शेतकरी वर्ग मेटाकुटीला आला आहे. विशेष म्हणजे ज्या गारा पडल्या त्यांचा आकार मोठा असल्याने कांदा पिकांची पाथील मोठ्या प्रमाणावर धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे अगोदरच कांद्याच्या कमी भावाने शेतकरी वर्गाच्या डोळ्यात अश्रू आणले असतांना आता अवकाळी पाऊस व गारा पडल्याने संपूर्ण पिके उत्पन्न धोक्याची घंटा वाजवित असल्याने बळीराजांला या अवकाळी ने मोठ्या प्रमाणावर आर्थिक संकटात सापवडले आहे.

गारांचा पाऊस व अवकाळी स्थिती यामुळे तालुक्यातील बळीराजां संपूर्ण पणे हतबल झाल्याने बळीराजांला सावरण्यासाठी लवकरात लवकर शासनाने पंचनामे करून मोठ्या प्रमाणावर शासकीय मदत मिळुन द्यावी जेणेकरुन बळीराजांचे आर्थिक कोंडीतील संकट मालिका खंडित होईल . व जगाचा पोशिंदा शेतकरी या संकटातून वाचला जाईल .
**वाल्मिक मोगल .(प्रगतशील शेतकरी लखमापुर ता .दिंडोरी )**

द्राक्षे पिकांची अगोदर च वाट लागलेली असताना जे काही द्राक्षे पिके राहिली होती. ती गारांच्या पावसाने झोडपल्यामुळे अशा द्राक्षांच्या मण्याना तडे गेल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळे आता बळीराजाला जीवन जगण्यासाठी कोणत्या मार्गाचा अवलंब करावा. हे एक मोठे कोडे होऊन बसले आहे.

# पॅसिफिक महासागराला लागली गळती

आधुनिक केसरी

**नवी दिल्ली :** पॅसिफिक महासागराच्या तळाशी ९६५ किमी लांबीच्या फॉल्ट लाइनमध्ये एक छिद्र आढळलं आहे आणि त्यामुळे अमेरिकेच्या किनारपट्टीवर ९ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप होऊ शकतो, असे मत संशोधकांनी व्यक्त केले आहे. 'पायथियास ओएसिस' नावाच्या छिद्रातून ४ किमी खाली अडकलेला द्रव समुद्रात सोडला जात आहे. हा द्रवपदार्थ टेक्टोनिक प्लेट्समध्ये लुब्रिकंट म्हणून काम करतो. हे छित्र विनाशकारी भूकंपाची सुरुवात करू शकते, अशी भिती शास्त्रज्ञांनी व्यक्त केली आहे. या तीव्र भूकंपामुळे अमेरिकेच्या वायव्येकडील शहरे नष्ट होतील. उष्ण द्रव पदार्थ बाहेर पडत असलेले छिद्र ओरेगॉनच्या किनाऱ्यापासून ५० मैल अंतरावर आहे, जे कॅस्केडिया सबडक्शन झोन म्हणून ओळखलं जातं. या छित्रामुळे तब्बल ९ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंक येऊ शकतो, अशी भिती वैज्ञानिकांनी व्यक्त केली आहे. या छिद्रातून द्रव पदार्थ बाहेर पडण्याचे दृष्य सर्वात आधी २०१५ मध्ये पाहायला मिळाले होते. या द्रव पदार्थामुळे प्लेट्सला सहज हलवता येतं, परंतु याशिवाय दाब निर्माण होऊन विनाशकारी भूकंप होऊ शकतो. हे छिद्र कॅस्केडिया सबडक्शन झोनच्या सीमेवर आहे आणि रासायनिकदृष्ट्या वेगळे द्रव सोडते. दरम्यान, संशोधकांनी जाहीर केलेल्या पेपर्समध्ये अहवाल दिला आहे की, ऑरेगॉनच्या किनाऱ्यापासून ३,२८० फूट खाली समुद्रसपाटीपासून खाऱ्या, उच्च-तापमानाचे, खनिज-समृद्ध पाण्याचे गिझर शोधणं आता अर्थहीन वाटते.






# सत्याग्रही समाजवाद




प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**आधुनिक भांडवलशाही नवउदारमतवादाने अविकसित राष्ट्रासमोर उभे केलेले प्रश्न आणि सामान्य माणसाचे भांबावलेपण असेच कायम टिकणार की त्यास काही पर्याय असू शकतो, विचार करणे आवश्यक आहे. काळाची चाके पुन्हा मागे वळवणे शक्य नाही परंतु समस्तांचे कल्याण आणि सुविधा या अंगाने समजून घेतल्यास प्रमुख तीन उपाय आपल्यासमोर उपलब्ध होतात. नवउदारमतवाद अर्थकारणाला केंद्रक मानते, हे केंद्रीभूत तत्त्व मनुष्यकेंद्री होईल तेव्हाच आपला पर्याय योग्य ठरू शकेल. अन्यतः व्यवस्थात्मक प्रश्न आणखी गुंतागुंतीची होण्याची संभावना नाकारता येणार नाही.**

कारण सक्षम पर्यायाच्या अभावी आहे तेच काय वाईट आहे मग? असाही सामान्यांचा सूर असू शकतो, जो की चुकीचा नसेल. नवउदारमतवाद जागतिक भांडवलदारांचे हितरक्षण करताना काही एतद्देशीय सुधारणा घडवून आणते, ज्याचा फायदा आपल्याकडील उच्चभ्रूंना होतो, पण सामान्यांसाठी अशा सुधारणा झाल्या काय किंवा नाही झाल्या काय काही फरक पडत नाही. उदाहरण म्हणून आपल्याकडे बांधले जाणारे मोठमोठे हायवे गावातल्या माणसासाठी काय फायद्याचे. कारखान्यातील उत्पादित माल ताबडतोबीने हलवण्यासाठी त्याचा उपयोग. त्याच वेळेस ग्रामीण रस्त्याकडे तेवढ्याच गांभीर्याने लक्ष दिले असते तर कोणाची बाजू घेतल्याचा आरोप निश्चितच झाला नसता. परंतु जे काही करायचे ते मोठ्या प्रमाणात ह्या भांडवली तत्त्वानुसार बदल होईल पण हा झालेला बदल त्यात भारतीयत्व नसलेला असेल. आपला प्रत्येक गाव पूर्वी आपल्या गरजा स्थानिक पातळीवर पूर्ण करण्यास बहुतांश सक्षम होता. शेतीपूरक आणि गावपातळीवर चालणारे उद्योग यांना लागणारे तंत्रज्ञान तेथेच तयार व्हायचे, परंतु उद्योगीकरणाने या व्यवसायाकडे आपणास घृणास्पद पहावयास शिकविले. त्यास प्रतिष्ठा मिळवू दिली नाही. हे सर्व करण्यासाठी त्यांनी जातीयतेचा आधार घेतला. जेवढे व्यवसाय तेवढ्या जाती. पण या जाती एकमेकांचा दुस्वास करणाऱ्या नव्हत्या. त्यांची रचना उभी नसून आडवी होती, पण जाणीवपूर्वक आपणास त्या उभ्या असल्याचे भासविण्यात आले. इथला शेतकरी, सुतार, कुंभार, चांभार, न्हावी, माळी किंवा अशा शेकडो जाती एकमेकांवर आधारित होत्या, एखादा सुतार छान बैलगाडी तयार करत असे, आज कारखान्यांमधून मोठ्या प्रमाणात लोखंडी गाड्या तयार होतात. त्या पूर्वीच्या कारागिरास आपण प्रतिष्ठा देऊ शकलो नाही. भांडवली व्यवस्था आली म्हणून गाडीची चाके चौकोनी झाले नाहीत किंवा आपण फुंकून चहा पिणे सोडले नाही. ही व्यवस्था नाविण्यापेक्षा घाऊकतेवर भर देणारी आहे. हिंद स्वराजमध्ये महात्मा गांधी यांनी एका प्रश्नाच्या संदर्भात उत्तर देताना म्हटले आहे की, समजा इंग्रजांनी आपल्या देशातून पैसा तिकडे न्यायचे बंद केले, चांगल्या हुद्द्यावर आपल्याकडील मंडळींना संधी दिली तर आपण त्यांना घालवण्यासाठी प्रयत्न करणार नाही का? नक्कीच करणार कारण वाघ कितीही बदलला तरी त्याचा मूळ गुणधर्म सोडत नसतो. तद्वतच भांडवलशाही नवउदारमतवाद आपला गुणधर्म सोडणार नाही. महात्मा गांधींनी कोणत्याही अन्याय अथवा जुलुमाच्या विरोधात उभे राहण्यासाठी अहिंसक अशा स्वरूपाचे सत्याग्रहाचे शस्त्र सामान्यांच्या हाती दिले आहे. भारतीय संस्कृती आपण म्हणतो तशी चातुर्वर्ण्य स्वरूपाची नसून द्विवर्ण पद्धतीची आहे. ब्राह्मण आणि शूद्र हे दोन वर्ण. इतर दोन वर्ण कल्पितो ते केवळ समाधानासाठी. ही द्विवर्णव्यवस्था म्हणजे दोन विचारधारा होत. यात मग आधुनिक काळात कोणीही सामील होऊ शकेल. जी मंडळी काळाची पावले ओळखून परिस्थितीनुसार स्वतःत बदल घडवून आणण्यात सक्षम असतात त्यांना काळ कोणताही असला तरी ते व्यवस्थेचे लाभार्थी असणारच. खरा प्रश्न आहे ते शूद्रांचे भले करण्याचा. काही मंडळी नवउदारमतवादास मार्क्सवाद हे उत्तर असू शकते अशी मांडणी करतात, पण डॉ. राममनोहर लोहिया यांनी मार्क्सवादाच्या तीन प्रमुख मर्यादा सांगितल्या आहेत. यात स्थिर किंवा शाश्वत मूल्यांना अजिबात स्थान नसल्यामुळे नीतिशास्त्राच्या दृष्टीने केवळ सापेक्षतावादी तत्त्वज्ञान बनले आहे. दुसरी मर्यादा म्हणजे उत्पादनपद्धती तशीच ठेऊन फक्त



## क्षितिजापल्याड

मालकी बदलण्याकडे असलेला कल आणि तिसरी महत्त्वाची मर्यादा म्हणजे आर्थिक घटनेच्या स्थापणेवर अधिष्ठित व्यवस्था निर्माण करण्याने सामाजिक ध्येये आपोआप भरभराटीस येतील, हा भ्रम होय. त्यामुळे भारतीय परिप्रेक्षात नव्या आव्हानाला सामोरे जाताना महात्मा गांधी आणि भारतीय संविधान यांची सांधेजोड करण्याशिवाय पर्याय नाही. सत्याग्रह हे सामान्य माणसांस पेलणारे, सहजसोपे आणि आकलनसुलभ शस्त्र आणि त्याच्या जोडीला संविधानात अंतर्भूत केलेले समाजवाद हे तत्त्व घेऊन येत्या काळात सत्याग्रही समाजवाद आपणास समजून घ्यावा लागेल. त्याशिवाय बहुजनांना मान्य होईल किंवा सर्वांना सोबत घेणारे दुसरे शास्त्र असू शकत नाही. आचार्य जावडेकरांनी हा सत्याग्रही समाजवाद कसा असेल आणि त्याची कार्यप्रणाली कोणत्या पद्धतीची असणार आहे, याचे साद्यंत वर्णन त्यांच्या साहित्यामधून केले आहे. यात कोणाचा दुस्वास नसून सर्वांना समन्यायी स्वरूपाने एकत्र घेऊन कष्ट, निवडणूक आणि त्याग या माध्यमातून बदल घडवता येऊ शकतो. किंबहुना हा बदल भारतीयत्व जपणारा असेल. नवउदारमतवादाचे प्रवक्तेपण ज्या अमेरिकेकडे आहे, तेथे बारावीपर्यंतचे शिक्षण मोफत असते, पाठयपुस्तके शाळा पुरवतात हे किती जणांना माहीत आहे. खाजगीकरणाच्या सपाट्याखाली आपण या शिक्षण व्यवस्थेचे काय हाल करून ठेवले आहेत, हे पाहतोच आहोत. शेकडो प्रकारच्या चाचण्यांच्या फिसमधून हजारो कोटी रुपये सरकार जमा करते आहे आणि रोजगाराचा पत्ता नाही. आज गावं उद्ध्वस्त होऊन शहरे गर्भगळीत झाली आहेत. एकीकडे काही व्यक्तींचा वाढदिवस साजरा करण्यासाठी अडीचशे कोटी रुपयांचा चुराडा होतो आणि दुसरीकडे आपला चरितार्थ कसा चालवावा ही विवंचना सतावते. ही असमानता सत्याग्रही वर्गविग्रहाच्या रूपाने सोडविण्याचा मार्ग शोधावाच लागेल. अन्यतः जगातील तीस टक्के तरुण भारतात असताना ही ऊर्जा नाहक सडली जाईल. या सडलेपणाच्या गॅसचा स्फोट होऊ नये असे वाटत असेल तर ही ऊर्जा सकारात्मकतेकडे वळवणे आणि सर्वांना सामावून घेणारे धोरण अवलंबणे राष्ट्रहिताचे ठरेल.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# सावरकरांचा अपमान करणाऱ्याला मातोश्रीवर पायघड्या का ?



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**उद्धव ठाकरेची शिवसेना ज्या मानसिकतेतुन प्रवास करते आहे त्यावरून एक लक्षात येतं भांबावलेली मानसिकता कधी हिंदुत्ववादाचा उदो उदो तर कधी धर्मनिरपेक्ष पुरोगाम्याचा उदो उदो. आम्ही प्रखर राष्ट्रभक्त आहोत हे दाखवण्याचा प्रयत्न त्याहुन अधिक मालेगावच्या जाहिर सभेत उद्धव ठाकरेजींनी भीमगर्जना केली. सावरकरांचा अपमान आम्ही सहन करणार नाहीत. पण तो केवळ दिखावा होता असं हळुवार आता स्पष्ट होत आहे. कारण भीमगर्जनेच्या दुसऱ्याच दिवशी काँग्रेस नेते राहुल गांधींनी दिल्लीतल्या पत्रकार परिषदेत माफी मागायला मी काही सावरकर नाही असं म्हणत राष्ट्रभक्ताचा नाही म्हटलं तरी दहाव्यांदा अपमान केला. असं वाटलं होतं उद्धव ठाकरे निश्चितच काही तरी फर्मान काढतील पण घडलं ते निराळेच.**

खा.संजय राऊतांनी दिल्लीत जावुन राहुल गांधींची गळाभेट घेतली आणि आता काय तर म्हणे ते मातोश्रीवर भेटायला येणार आहेत. त्या दृष्टीने स्वागताची तयारी मातोश्रीवर सुरू असुन ज्यांनी अपमान केला त्यांचं स्वागत करण्यासाठी पायघड्या टाकण्याचे काम नव्हे तर कदाचित चांदीच्या ताटात जेवणावळीसुद्धा झाली नाही तर नवल काय? राजकारण किती गंमतीशीर असतं आणि मग स्वअस्तित्व टिकवण्यासाठी पक्षाचे नेते लोकांच्या मैदानात एक बोलतात बाहेर गेल्यानंतर दुसरंच करतात. ज्याला आतुन किर्तन बाहेरून तमाशा असं म्हटल्या जातं. संदर्भ यासाठी की मागच्या महिन्यात मालेगावात ठाकरे शिवसेनेचे प्रमुख उद्धवजीची जाहिर सभा संपन्न झाली. वास्तविक पहाता सावरकरांचा विषय काढण्याची सभेत गरज नव्हती. पण संभाव्य राजकारण आणि लेचीपेची भुमिका घेताना आम्ही प्रखर हिंदुत्ववादी कसे? त्याहुन अधिक राष्ट्रभक्ती कशी आमच्यात भिनली? हे दाखवण्यासाठी त्यांनी सभेतच भीमगर्जना अगदी हातवारे करून स्टाईलने केली. उजवा हात आणि अंगठ्याजवळच बोट बाहेर काढत उद्धवजी म्हणाले, सावरकरांचा अपमान आम्ही सहन करणार नाहीत. अर्थात त्याच वेळी सभेतुन विचारणा झाली मग तुम्ही काय करून दाखवणार? अपमान सहन करणार नाहीत याचाच अर्थ ज्यांनी सावरकरांचा अपमान केला त्या राहुल गांधींच्या विरोधात ठाकरे शिवसेना भुमिका घेणार असा तर्क वितर्क प्रसंगी काढला. पण राजकारण किती नाटकी असतं? आणि जे नाटक आता ठाकरे पिता-पुत्रांना सोबत संजय राऊतांना देखील करावं लागतं हे वेळोवेळी सर्वसामान्य लोक पाहु लागतात. दुसरी बाजु अशी जाहिर सभेत ठाकरेंनी अपमान सहन करणार नाही ही भुमिका घेतल्यानंतर अवघ्या बारा तासात राहुल गांधींची एक पत्रकार परिषद होती. ज्यात माफी मागायला मी काही सावरकर नाही असं म्हणत त्यांनी सावरकर आणि त्यांच्या विचाराचा अपमान केला. मुळात राहुल गांधींनी सावरकरांचा एकदा नव्हे दोनदा नव्हे तर दहा वेळा अपमान केला. जणु काही सावरकर काँग्रेस पक्षाचे शत्रुच या भुमिकेत काँग्रेसवाल्यांनी सावरकर विषयी भुमिका कधीच सोडली नाही. खरं तर लिखाण करताना एक आठवण निश्चित झाली. एकेकाळी मणिशंकर अय्यर या देशद्रोही काँग्रेस नेत्याने सावरकरांच्यावर गरळ ओकली होती. पण स्व.बाळासाहेब ठाकरेंनी क्षणात प्रतिक्रिया दिलेली आजही आठवते. पण असो. बाळासाहेब हे बाळासाहेबच होते. त्यांची बरोबरी वारसदारांना करणे शक्य नाही तो भाग वेगळा. राहुल गांधींनी अपमान केल्यानंतरही खा.संजय राऊतांनी काही वेळातच त्यांना दिल्लीतल्या निवासस्थानी जावुन गाठले. दोघांमध्ये चर्चा पण झाली. पण असं काही कानावर पडलं नाही की राऊतांनी राहुल गांधींना निवासस्थानी भेटीत काही सुनावलं. त्या बैठकीत मुंबईत मातोश्रीवर भेट देण्याचा निर्णय झाला. ज्याची वेळ उद्या परवा आल्याची माहिती स्वतः राऊतांनी माध्यमांना दिली. महाविकास आघाडी स्थापन करण्यापासुन आणि आता टिकवुन ठेवण्यासाठी राऊतांची मुंबई, दिल्ली वारी सुरू निश्चित आहे असं म्हणावे लागेल. कारण अलीकडच्या काळात वज्रमुठ नावाखाली एकी दाखवण्याचा प्रयत्न सुरू असला तरी महाविकास आघाडी अंतर्गत असलेली धुसफुस चव्हाट्यावर आली असुन कुठल्याही क्षणी आघाडीत फुट पडु शकते असं चित्र सद्या तरी दिसतं. काँग्रेस प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांच्या नेतृत्वाला अनेक जेष्ठ काँग्रेस कार्यकर्ते वैतागले असुन सुरू असलेली वाताहत त्याचाच एक भाग दिसतो. सुरूवातीला म्हटल्याप्रमाणे ज्या राष्ट्रभक्त सावरकरांचा अपमान राहुल गांधींनी नेहमीच केला. अगदी देशात पदयात्रा काढल्यानंतर महाराष्ट्रात त्यांची यात्रा भ्रमंती झाली पण सावरकरांच्या कर्मभुमीत येवुन मी त्यांचा अपमान करू शकतो हे दाखवताना खरंच



अगदी वेगवेगळ्या प्रश्नाला धरून त्यांनी अपमान केला. मग काळ्या पाण्याची शिक्षा, तुरूंगातील ती खोली एवढेच नव्हे तर अगदी खालच्या पातळीवर जावुन अनेकदा त्यांच्या स्वभाव गुणाचे वेगवेगळे पैलु द्वेषात्मक उकल करून लोकांच्या समोर मांडले. कधी कधी असं वाटतं की एवढी बदमाशगिरी राहुल गांधींची कशामुळे? कारण खरा भारतीय अशा प्रकारे सावरकरांचा अपमान करणारच नाही. पण हा माणुस गरळ ओकल्याशिवाय रहात नाही. वास्तविक पहाता त्यांच्या पक्षाची वाताहत महाराष्ट्रात आणि देशात होण्यामागच्या कारणापैकी हे प्रमुख एक कारण निश्चितच म्हणावे लागेल. कारण आजही राष्ट्रभक्त सावरकरांचं नाव उच्चारताच अंगावर राष्ट्रभक्तीच्या रखरखत्या ज्वाला आणि प्रेरणा देणाऱ्या विचाराचे शहारे उमटतात. पण अपमान करणाऱ्या नेत्याच्या बुद्धीची दिवाळखोरी आणि मग राष्ट्रभक्ती यावरही प्रश्नचिन्ह उभा रहातात. कदाचित मातृ संस्कार परदेशी असल्याचाही परिणाम वर्तनात असु शकतो. असो निमित्ताने सांगायचं झालं तर मालेगावच्या जाहिर सभेत उद्धवजींनी केलेली भीमदेवी गर्जना आठवली कारण सकाळी टिव्हीवर खा.संजय राऊतांनी जाहिर केलं की, दोन -चार दिवसात राहुल गांधी मुंबई दौऱ्यावर येत असुन मातोश्रीवर उद्धवजी यांची भेट घेणार आहेत. राहुल गांधींचा दौरा देशातल्या विरोधी पक्षातल्या एकत्रीकरणाच्या पार्श्वभुमीवर जरी असला तरी सावरकरांचा अपमान करणाऱ्याला आगमनानिमित्त मातोश्रीवर पायघड्या घालण्याचं जे राजकिय नाटक सुरू आहे त्यावरून खऱ्या अर्थाने उरलेल्या शिवसेनेची राष्ट्रभक्ती हिंदुत्व निश्चित लक्षात येतं. कदाचित चांदीच्या ताटात मिष्टान्न राहुल गांधींना भरवल्या जाईल. भव्य स्वागतही होईल. मग पुन्हा मालेगावात जाहिर सभा घेवुन उद्धवजींना प्रामाणिकपणे सांगावे लागेल की मागच्या महिन्यात मी तुम्हाला सावरकरांचा अपमान सहन करणार नाही असं म्हणालो पण ज्यांनी अपमान केला त्याच राहुल गांधीला आम्ही आता ऱ्हदयात घेतलं असुन ते सावरकरपेक्षाही श्रेष्ठ झाले आणि असं केलं तर प्रामाणिक राजकारणाची दाद जनताही दिल्याशिवाय रहाणार नाही. राजकारणात भविष्याचा वेध घेवुन पक्षाचे प्रमुख नेते संघटना चालवत असतात. राहुल गांधी मातोश्रीवर येणार असल्याचे राऊतांनी जाहिर केलं. पण जाणार नसल्याचंही सांगायला नाना पटोले मागे राहिले नाहीत. याचाच अर्थ उद्या राज्य काँग्रेसमध्ये देखील नेतृत्वाने मातोश्रीवर जावं का नाही? याबाबत खलाखल होईल. कारण मातोश्रीवर जाणं हे निष्ठावान काँग्रेस नेत्याला रूचेलच असे नाही. बाकी काही असो. सद्या तरी राहुल गांधींच्या जोरदार स्वागताची मातोश्रीवर लगीनघाई सुरू झालेली दिसते.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# लॉकडाऊनचे दिवस



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195


आधुनिक केसरी

**२०२० हे साल सगळ्यांसाठी भयंकर अनुभव देणारं साल होतं. ध्यानीमनी नसताना अचानकपणे संपूर्ण जगावर कोरोनानामक संकट आलं आणि सगळं जग स्तब्ध झालं. आता सगळं सुरळीत सुरु असताना नुसते कोरोनाचे नाव जरी घेतले तरी मनुष्य उद्विग्न होतो, इतकी त्याची दाहकता होती. कोरोनामुळे जगण्याचे नियम बदलले. लॉकडाऊन लागल्याने सगळे घरात बंदिस्त झाले.रस्ते, कार्यालये ओस पडली, मास्कची सक्ती, कोरोना होईल की काय याची भीती, सतत हात स्वच्छ करणं, वर्क फ्रॉम होम इत्यादी.**

.. अशा बऱ्याच गोष्टींचा अनुभव सर्वांनी घेतला आहे. रोज नवीन काही नियमावली जाहीर व्हायची, सतत रुग्णवाहिकेच्या सायरनचे आवाज, कोविड पेशंट, कोणीतरी मृत्यू पावल्याची बातमी कानावर येणं, सर्दी, खोकला झाल्यावर घरगुती उपाय करणं इ. मुळे मनावरील ताण वाढला होता.

हळूहळू शिथिलता येत गेली, लसीकरण सुरु झालं आणि सगळं पूर्वपदावर आले. या काळात बऱ्याच गोष्टी, व्यक्ती गमावल्या हे खरेच.

वरील सर्व अनुभव प्रत्येकाचे आहेत, पण लेखक सुनील पांडे यांनी या अनुभवांना शब्दरूप देऊन पुस्तक रुपात आणले आहे. 'लॉकडाऊनचे दिवस' ही आत्मकथनात्मक कादंबरी. या कादंबरीतून त्यांनी कोरोना काळातील कटु - गोड आठवणींचा लेखाजोखा मांडला आहे. कादंबरीच्या शीर्षकातच विषयाचे सार समजून येते. प्रथमपुरुषी निवेदन, साधी - सरळ भाषाशैली आणि कादंबरीला एक गतिमान प्रवाह लाभला आहे. कादंबरीचे निवेदन ओघवते असल्याने लेखक वाचकांशी मन मोकळे करत आहेत, असे जाणवते. लेखक सुनील पांडे हे पुणे महानगरपालिकेत कार्यरत आहेत. ते नीरा गावी वास्तव्यास असतात. रोज नीरा ते पुणे मनपा असा प्रवास ते करतात. पण अचानक लॉकडाऊनमुळे सर्वत्र बंदची स्थिती निर्माण झाली. तेव्हा वाहतूक व्यवस्था बंद असताना कार्यालयात जाताना आलेल्या अडचणी, सतत वाहन बदलणे, इतर वाचनाची मदत घेणे, कार्यालयात काम करताना येणाऱ्या अडचणी इत्यादी आठवणीं लेखकानी अगदी सूक्ष्मपणे मांडल्या आहेत. लॉकडाऊनच्या काळात त्यांनी इतर पुस्तकांची प्रूफ तपासणे, नवीन लेखन करणे अशा पद्धतीने आपला वेळ सत्कारणी लावला. नकारात्मकतेतही सकारात्मकता शोधता यायला हवी, याचं आदर्श उदाहरण लेखकाने घालून दिले आहे. या कादंबरीत




फक्त कोरोनाचे किस्से नाहीत तर काही खास व्यक्तिमत्त्वांची ओळखही वाचकांना करून दिली आहे. लेखकाने आपल्या कार्यालयातील सहकारी , कर्मचारी यांच्या आठवणीं, त्यांचे स्वभाव , एकमेकांशी असलेले ऋणानुबंध या सर्व स्मृती जपल्या आहेत. मनपा कार्यालयातील गोविंद राजुडिया यांच्या सोबतच्या आठवणींना उजाळा दिला आहे. कामाप्रति निष्ठा, प्रामाणिक वृत्ती, सगळ्यांना सामावून घेणे, सहकाऱ्यांना चहा पाजणे, खाद्यपदार्थ आणणे, स्वतःसाठी नाही तर इतरांसाठी जगणारे राजुडिया सरांचे हे स्वभावविशेष वाचताना आपल्या सहकाऱ्यांना त्यांनी किती जीव लावला , हे समजते. पुणे महानगरपालिकेतील ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालयातील खातेप्रमुख दयानंद सोनकांबळे सरांनी कमी कालावधीत आपले एक वेगळे स्थान निर्माण केले होते. सहकाऱ्यांना तसेच हाताखालील सेवकांना त्यांनी नेहमीच समानतेची वागणूक दिली, त्यांच्या कलागुणांचे कौतुक केले. समोरच्या व्यक्तिची गुणवत्ता पाहून त्याच्याकडून कोणतीही गोष्ट शिकताना सरांना कधीही कमीपणा वाटला नाही. अशा सोनकांबळे सरांचे अचानक जाणे जिव्हारी लागते. हे सगळे प्रसंग लेखकाने अत्यंत संवेदनशील आणि भावपूर्ण भावनेने शब्दबद्ध केले आहेत. या आठवणी लिहिताना लेखकाच्या मनात आठवणींचे जे काहूर माजले असेल, त्याची कल्पना करणेही कठीण जाते. कोरोनामुळे जगण्याचे परिमाण बदलले हे खरे. नकारात्मकतेसोबत सकारात्मक बदलही दिसू लागले. लेखकाने आपल्या आत्मकथनात्मक कादंबरीतून या संमिश्र आठवणी आणि वास्तव एकत्रितपणे मांडले आहे. पुस्तकाचे यथार्थ मुखपृष्ठ संतोष धोंगडे यांनी साकारले आहे. पुस्तकाची पाठराखण स्नेहवर्धन प्रकाशनच्या प्रकाशक डॉ. स्नेहल तावरे यांनी केली आहे.

**( लॉकडाऊनचे दिवस – आत्मकथनात्मक कादंबरी / लेखक सुनील पांडे / प्रकाशक : स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे / मूल्य : १५० रुपये )**

## पानांवरल्या शिरा..

सुकलेल्या पानांवरच्या
किनाऱ्यावरून चालताना
गतींची सीमा कळली नाही
समजले जेव्हा तोल जाताना..

आडवळणाच्या रस्त्यामध्ये
ब्रेक एकदम लागून गेला
संकटांचे दिवे चमकत
काळ वेळ जुळूनी आला..

भिर भिर वाऱ्यांच्या वेगाने
तट आता ढासळू लागला
पानांवरल्या शिरानांही
वेदनेचा कहर समजला..

कधी चढ तर कधी उतार
वळणवाट ही सहन केली
थेंब टपोऱ्या पावसाचे
रडगाणे सांगू लागली..

असेल जगणे उघड्यावरती
कित्येकांचे म्हणणे ऐकले
पानांवरल्या शिरांचे गाणे
सांगा कोणी कितपत पाहिले ?

– दिलीप नामदेव धायगुडे
मो.बा. ७७३८०३९१९५

# विनोदाचा बादशहा चार्ली चॅप्लिन



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**जगातला सर्वात लोकप्रिय अभिनेता, विनोदाचा बादशहा चार्ली चॅप्लिन याची जयंती आहे. पहिल्या महायुद्धाच्या अगोदाच्या काळात मुकपटात अभिनय करून आपल्या आगळ्या वेगळ्या शैलीने प्रेक्षकांना मनमुराद हसावणाऱ्या चार्ली चॅप्लिन यांचा जन्म १६ एप्रिल १८८९ रोजी लंडन येथे झाला. चार्ली चॅप्लिन यांनी आपल्या अभिनयाची सुरवात शालेय जीवनापासूनच केली. वयाच्या नवव्या वर्षी शाळेतल्या नृत्यपथकात त्यांची निवड झाली.**

या नृत्यपथकाद्वारे सादर होणाऱ्या कार्यक्रमात ते अभिनय आणि नृत्य करत. त्यांची आई मानसिक आजाराने त्रस्त असल्याने वयाच्या तेराव्या वर्षीच त्यांना शाळा सोडावी लागली. अर्थाजनासाठी ते लहान मोठे कामे करू लागले. घरची परिस्थिती हलाखीची असूनही त्यांनी आत्मविश्वास कमी होऊ दिला नाही. परिस्थितीने उलट त्यांना खंबीर बनवले. त्यावेळेच्या परिस्थितीबद्दल चार्ली चॅप्लिन आपल्या आत्मचरित्रात म्हणतात "मला त्या परिस्थितीचे चटके फार काळ सहन करावे लागले नाही कारण आम्ही त्या परिस्थितीतून सतत वाटचाल करत होतो आणि लहान असल्यामुळे हा त्रास मी सहज विसरून जायचो." त्यांचा आत्मविश्वास कणखर होता छोटीमोठी कामे करूनही ते कधीही आपल्या ध्येयापासून ढळले नाहीत. मोठा अभिनेता होण्याचे ध्येय पूर्ण करण्यासाठी ते नाटक कंपन्यांना नित्यनियमाने संपर्क साधत. त्यांच्या मेहनतीला फळ मिळाले त्यांना अनेक नाटकात भूमिका मिळू लागल्या. पुढे मोठया पडद्यावर देखील त्यांना संधी मिळत गेली. पडद्यावरील त्यांचे मस्तमौला आगळेवेगळे रूप प्रेक्षकांना खूप भावले. पडद्यावर त्यांची इन्ट्री झाली की प्रेक्षक खळखळून हसत. एक टाईट कोट, छोटी हॅट, मोठे शूज आणि चेहऱ्यावरील छोटीशी मिशी असं त्यांचं पडद्यावरील वेडगळ रूप प्रेक्षकांना खूप भावले. हे वेडगळ रूप प्रेक्षकांना इतकं आवडलं की पुढं हेच त्यांचं वेडगळ रूप त्यांची ओळख बनली. या व्यक्तिरेखेबद्दल ते आपल्या आत्मचरित्रात म्हणतात " ज्या क्षणी मी तो पोशाख केला, मेकअप केला, त्याच क्षणी मी ती व्यक्तिरेखा अनुभवू लागलो. मी त्याला ओळखयचो आणि रंगमंचावर असेपर्यंत तो माझ्यात भिनलेला असायचा." चार्ली चॅप्लिन यांनी आयुष्याचं सार पडद्यावर अनेक तऱ्हेने जगपुढे मांडले. खिल्ली उडवण्यासाठी दुःख हे कारण असतं. खिल्ली उडवणे



म्हणजे प्रतिकार करणे निसर्गाच्या शक्तीपूढे स्वतःच्या हतबलतेतही आपण हसत राहिले पाहिजे. प्रतिकुलतेचा हसत हसत सामना केला पाहिजे, नाहीतर मानसिकरीत्या खचून जाल असे ते म्हणत म्हणूनच त्यांच्या आयुष्याच्या जवळचा चित्रपट ' द कीड ' याचं ओपनिंग टायटल होतं" अ पिक्चर विथ अ स्माईल अँड परहॅप्स अ टियर." स्वतःच दुःख विसरून आईचे स्वप्न साकार करण्यासाठी त्यांनी पडद्यावर वेडगळ भूमिका करुन जगभरातील प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले. भाषेच्या बंधनाविना पडद्यावरून तो कुठल्याही प्रेक्षकांशी संवाद साधू शकला त्यासाठी त्यांनी वापरलेले साधन म्हणजे भरपूर हासू आणि थोडेसे आसू. चार्ली चॅप्लिन यांच्या अभिनयाचे वैशिष्ट्य म्हणजे ते प्रेक्षकांना गडबडा लोळायला लावून हसवत आणि दुसऱ्याच क्षणी डोळ्यात पाणी आणून रडवत. आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी अनेक युक्त्या करून त्या पडद्यावर साकारल्या आणि गाजवल्या. जागतिक पटलावर महानायक म्हणून ते आयुष्यभर वावरले. पहिल्या महायुद्धाच्या काळातही त्यांनी लोकांना हसवण्याचे कार्य केले. २५ वर्षानंतर जागतिक मंदी आणि हिटलरच्या काळातही त्यांनी प्रेक्षकांना हसवण्याचे कार्य थांबवले नाही. लोकांना ज्याकाळात मनोरंजनाची आणि हास्याची अधिक गरज होती त्याकाळात चार्ली चॅप्लिन यांनी लोकांसाठी उत्तम भूमिका बजावल्या. २५ डिसेंबर १९७७ रोजी प्रेक्षकांना खळखळून हसवणारा हा महान अभिनेता पप्रेक्षकांना दुःख सागरात लोटून काळाच्या पडद्याआड गेला. चार्ली चॅप्लिन यांना जयंतीदिनी भावपूर्ण आदरांजली.

महाराष्ट्र Business Katta












# क्रियाशील साहित्य उपक्रमातून जय मिळवणारे 'धनंजय'

आधुनिक केसरी

**अ.भा. शिक्षक साहित कला क्रीडा मंडळाचे पहिले विभागीय शिक्षक साहित्यसंमेलन दि.१६ रोजी माहूर येथे संपन्न होत आहे . या संमेलनाचे अध्यक्ष, प्रसिद्ध साहित्यिक व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य धनंजय गुडसूरकर यांच्या अध्यक्षीय भाषणाचा हा गोषवारा.**

माहूर येथे होणाऱ्या विभागीय शिक्षक साहित्य संमेलन अखिल भारतीय शिक्षक क्रीडा व साहित्य मंडळाच्या वतीने या संमेलनाचे आयोजन करण्यात येत आहे . दि. १९ एप्रिल वार बुधवार रोजी हे साहित्य संमेलन होणार आहे . या संमेलनाच्या अध्यक्षपदी धनंजय गुडसूरकर निवड ही सार्थ व विश्वसनीय आहे. ते नामवंत साहित्यिक, आघाडीचे वक्ते व उत्कृष्ट स्तंभलेखक आहेत.

धनंजय गुडसूरकर यांचा उदगीर येथील गुडसूर सारख्या छोट्या गावात जन्म झाला. लहानपणापासून त्यांना वाचनाची आवड होती. वडील शिक्षक होते. घरातील वातावरण अत्यंत सुसंस्कृत व अत्यंत शिस्तीचे होते. वडिलांच्या शिस्तीचा व जीवन शैलीचा प्रभाव लहान वयातच त्यांच्यावर पडत गेला. ग्रामीण जडण घडण व ग्रामीण भागातील नौकरी यामुळे तेथील जनजीवन व त्यांच्या समस्या कळत गेल्या. तेथील सामाजिक जीवनाचे लेखन त्यांच्या हातून घडत गेले. शिक्षकाची नौकरी करत लेखक, वक्ता, मुक्त पत्रकार, एकपात्री कलावंत येथून ते महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचा सदस्य इथपर्यंतचा त्यांचा प्रवास अत्यंत कष्टदायी , प्रेरणादायी व रोमांचकारी आहे. ते ग्रामीण जीवन व तेथील वास्तव यावर कटाक्षाने लेखन करत असतात. सलग तीस वर्षांपासून साहित्य चळवळीत थडपडत असतात. महाविद्यालयीन जीवनापासून अनेक संमेलने, व्याख्याने यांतून सामाजिक प्रबोधनाचे महत्तम कार्य केले. त्याच कार्याची पेरणी आज त्यांच्या कार्याचा गुणगौरवात होत आहे. त्यांच्या कष्टप्रद व सेवाभावी कार्य आज फळा रुपाला येत आहे. जीवनमूल्य, अनुभव निरीक्षणे, मानवी मनाचा तळ शोधण्याची धडपड यातून त्यांच्यातील संवेदन व धडपडणारा साहित्यिक घडत गेला. साहित्यिक मित्रांना बरोबर घेऊन त्यांनी प्रबोधन साहित्य परिषदेची स्थापना केली. याद्वारे लेखन कार्यशाळा, काव्यवाचन, कथाकथन यासारखे असंख्य कार्यक्रम घेत गेले. या साहित्य परिषदेने लिहीते करीत एक सांस्कृतिक जाण असणारी पिढी घडवली. परिषदेला मिळालेल्या या अफाट प्रतिसादामुळे पुढे पाहिल्या लातूर जिल्हा मराठी साहित्य संमेलनाची जबाबदारी धनंजय गुड सूरकर यांनी सहजपणे पेलली. तेव्हापासून त्यांच्या कार्याची घौडदौड अविरत चालू आहे. ती याहीपेक्षा पुढे पुढे जाईल. साहित्य क्षेत्र समृद्ध व सुसंस्कृत बनवण्यात त्यांचा हातभार लागेल यात दुमत नाही.

त्यांच्या साहित्य क्षेत्रातील आलेख खालील कामातून व त्यांच्या कार्यातून दिसून येईल.त्यांची असंख्य वर्तमानपत्रातून विविध विषयांवरील ५०० पेक्षाही जास्त लेख प्रकाशित आहेत.आकाशवाणी केंद्रावरून अनेकवेळा त्यांच्या कार्यक्रमांचे प्रसारण झालेले आहे.चिवचिवाट हा बालकवितासंग्रह , भाऊबीज व पुनर्भरण हे कथासंग्रह व निखाऱ्यावरचा प्रवास ही ग्रंथ संपदा त्यांच्या नावे प्रकाशित आहे. तसेच त्यांनी 'त्याग आणि वंदन, अभिवादन, कौतिकामृत या ग्रंथाचे संपादनही केलेले आहे. मुक्तीची पहाट, पहिला नंबर नको, पत्रास कारण की ही त्यांची नवीन पुस्तके प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. त्यांनी जवळपास २२ ग्रंथांना प्रस्तावना व पाठराखण लिहून नवसाहित्यिकांच्या लेखनास एकप्रकारे बळ दिले आहे . मराठी साहित्याच्या प्रांतातील अनेक नियतकालिकांमधून त्यांचे लेखन प्रसिद्ध झाले आहे. त्यांची व्यक्तीचित्रण लिहिण्याची हातोटी वेगळी आहे. ती व्यक्ती आपल्या समोर प्रत्यक्ष उभी राहते व आपणासोबत भाष्य करत आहे की काय असे वाटते. त्यांचे भाषण ऐकणे हा तर एक लहान थोरांसाठी एक उत्तम अनुभव असतो. शालेय विद्यार्थ्यांसाठीच्या कथाकथनात व कथाकथनातील एकपात्री अनुभव हे विद्यार्थ्यांना प्रेरक व मंत्रमुग्ध करणारे असतात.

शालेय व महाविद्यालयीन जीवनापासून लेखणी हाती घेतलेल्या गुडसूरकर यांची सामाजिक लेखननिष्ठा प्रेरक व प्रेरणादायी आहे. स्वतः लिहितानाच इतरांना लिहितं करणारी साहित्य चळवळ अनेक वर्षांपासून चालवत असतात. समाज, देश , साहित्य व शिक्षण चळवळीतील समर्पित व्यक्तीमत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

श्रमहर्षी बाबा आमटे यांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने लिहिलेल्या 'निखाऱ्यावरचा प्रवास' ही लेखमालिका वाचकांना भावली नोव्हे तर यातून बाबा आमटे यांचे कार्य घराघरात पोहचले. त्याचबरोबर बाबा आमटे यांच्या कार्यावर महाराष्ट्रातून विविध ठिकाणी शंभर व्याख्याने देऊन बाबांना आगळी वेगळी आदरांजली वाहिली. या कार्यक्रमातूनपंचविस ते तीस हजार विद्यार्थ्यांपर्यंत श्रममूल्याची पेरणी केली. या कार्याची दखल घेत आनंदवन येथील पु.ल. देशपांडे रगमंचाचे



रंगभूमीचे उदघाटन करण्याचा सन्मान त्यांना डॉ.विकास आमटे यांच्या कडून मिळाला.

महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रभर १५० व्याख्यानाचे आयोजन त्यांनी केले. संपूर्ण देशात राबिवल्या गेलेल्या या एकमेव उपक्रमातून १८५ ठिकाणी म.गांधींचे विचार पोचवण्यात आले.सुमारे पस्तीस हजार विद्यार्थ्यांना व २० वक्त्यांना या अभियानात जोडून वेगळाच विक्रम त्यांनी केला. विद्यार्थी हित व समाजसेवा हा त्यांचा मुळ पिंड आहे.ते उदगीर येथे पार पडलेल्या ९५व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने ९५ शाळांमधून कथाकथनाच्या उपक्रमांची आखणी केली. हा उपक्रम नांदेड, परभणी , लातूर या जिल्ह्यासह सीमावर्ती तेलंगणा व कर्नाटक प्रांतातही राबविला गेला. संमेलनाच्या अनुषंगानेच 'संमेलन आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत विविध साहित्यिक व कवींच्या मुलाखतींचा कार्यक्रम घेऊन संमेलन साहित्यिक वातावरण निर्माण केले.

साहित्य संमेलनाच्या निमित्तानेच 'पडघम' या लेखमालिकेचे लेखन करून या परिसराचे साहित्यिक व सांस्कृतिक संचित त्यांनी शब्दबद्ध करुन ठेवले . उदगीर येथे संपन्न झालेल्या ४० व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे कार्यवाह म्हणून धनंजय यांनी उत्तम कामगिरी बजावत संमेलन कमालीचे यशस्वी व लौकिक केले. बहिःशाल शिक्षण केंद्राच्या माध्यमातून त्यांनी पुढाकार घेत ३०० व्याख्यानाचे आयोजन केले.उदगीर येथील गुडसूर या एका छोट्या गावात अशा प्रकारची होणारी व्याख्याने यावरूनच गावातील बौद्धिक पक्वता लक्षात येते. 'स्मरण स्वातंत्र्यलढ्याचे 'या पदयात्रा आयोजन समितीचे सचिव या नात्याने धनंजय यांनी नांदेड व लातूर जिल्ह्यातील अनेक गावांत पदयात्रेचे आयोजन करून स्वातंत्र्य विरांच्या कार्याला उजाळा दिला. प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे यांच्या संकल्पनेतील या पदयात्रेतून राष्ट्रीय विचारांची मांडणी तर केलीच पण जनसामान्यांच्या प्रश्नांनाची सोडवणूक केली व त्यांच्या अनेक प्रश्नांना आवाज मिळवून दिला.

'श्यामची आई' या अजरामर संस्कार ग्रंथातील घटना, प्रसंगांचे धनंजय गुडसूरकर यांनी सादर केलेले एकपात्री प्रयोग हृदयस्पर्शी होते. या प्रयोगाला आजही संपूर्ण महाराष्ट्रातून मागणी आहे.

धनंजय गुडसूरकर यांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. त्यात दलित साहित्य अकादमी पुरस्कार, मानव संसाधन विकास मंत्रालयाचा नेहरू युवा पुरस्कार, साने गुरुजी पुरस्कार, पंचायत समितीचा आदर्श शिक्षक पुरस्कार, लोकराज्य प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय शैक्षणिक पुरस्कार, डॉ ना .य .डोळे स्मृती व जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार, फलटण येथील साहित्यलेखन पुरस्कार, इंदिराबाई गायकवाड ट्रस्ट मुंबईचा शैक्षणिक कार्याचा पुरस्कार, अंनिसचा उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार, यासह विविध पंचवीस पेक्षाही अधिक पुरस्कार प्राप्त झाले आहेत . म्हणून त्यांच्या कार्याबाबतीत साहित्य धडपडीतून जय मिळविणारे धनंजय असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

तसेच शासनाच्या वेगवेगळ्या समित्यावर त्यांनी काम केले आहे. महाराष्ट्र राज्य प्रौढ शिक्षण संस्थेचे निमंत्रित लेखक ,महाराष्ट्र शासनाच्या डी. एड.अभ्यासक्रम पुनर्रचना समितीचे सदस्य म्हणून सन्मानित झालेल्या गुडसूरकराची महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळावर सदस्य म्हणून निवड करून त्यांच्या साहित्यिक कारकिर्दीचा सन्मान केला आहे. या माध्यमातून साहित्य संस्कृतीच्या उपकमांची त्यांनी केलेली मांडणी अत्यंत महत्वाची व उत्कृष्ट आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळावर निवड झालेले ते राज्यातील पहिले शिक्षक आहेत. सांस्कृतिक मंडळाचे सदस्य या नात्याने महाराष्ट्रभर सध्या धनंजय साहित्याचा जागर ते घालीत आहेत . मागील पंचवीस वर्षात या उदगीर परिसराची साहित्य चळवळ गतिमान झाली . तसेच साहित्यिक व साहित्य रसिकांची भूमी म्हणून उदगीर पुढे आले .

त्यांच्या कार्याचा व धडपडीचा गौरव माहूर येथे होणाऱ्या विभागीय शिक्षक साहित्य संमेलन व अखिल भारतीय शिक्षक क्रीडा व साहित्य मंडळ या संमेलनाच्या वतीने झाला. ते त्या संमेलनाचे अध्यक्ष आहेत.या संमेलनाच्या माध्यमातून नांदेड येथील साहित्य संस्कृतीचा लेखाजोखा मांडतीलच पण त्याबरोबरच किनवट येथील दुर्गम भाग , तेथील संस्कृतीचा उहापोह करतील. अशी निश्चित खात्री आहे. ग्रामीण शेतकरी, शेतमजूर, आदिवासी, बंजारा, दुर्गम व डोंगरी भागातील रहिवासी , त्याच्या समस्या व तेथील शिक्षण यांचा आढावा त्यांच्या अध्यक्षीय भाषणातून होईल अशी आशा बाळगतो. त्यांच्या भावी वाटचालीसाठी अनेक शुभेच्छा...

**व्यंकटेश सोळंके, नांदेड**
संपर्क ९९२२६५४७३२

# इतुकेची बळ अंगी यावे फक्त

आधुनिक केसरी

**साडेतीन पीठापैकी एक असलेल्या माहुरनगरीत होत असलेल्या या शिक्षक साहित्य संमेलनाच्या उद्घाटक व नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक वर्षा ठाकर-घुगे मॅडम, जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी सन्माननीय प्रशांतजी दिग्रसकर साहेब व डॉ सविता बिरगेजी , तहसीलदार किशोरजी यादव, गटविकास अधिकारी सुरेशजी कांबळे ' उपशिक्षणाधिकारी दिलीपजी बनसोडे, अ भा शिक्षक साहित्य कला व क्रीडा मंडळाचे अध्यक्ष नटराजजी मोरे, विभागीय अध्यक्ष रमेशजी मुनेश्वर व उपास्थित सुहृदजन...**

शिक्षकांचे साहित्यसंमेलन असा वेगळा पायंडा घालणाऱ्या आपणा सर्व मंडळींचे मी मनापासून अभिनंदन करतो. आपल्या मराठी साहित्य विश्वात वेगवेगळ्या प्रकारची साहित्य संमेलने होत असतात. मुख्य प्रवाहाच्या साहित्य संमेलनात सर्वच बाबी समाविष्ट होतात असे नाही. त्यामुळे अशा संमेलनांची गरज अधोरेखित होते. शिवाय अशा संमेलनामुळे त्या त्या भागात होणारी साहित्याबद्दलची जाणिव महत्वाची ठरते! आज माहूर नगरीत जर हे संमेलन झाले नसते तर इथे होणारी साहित्य व शिक्षण विषयक चर्चेपासून आपण दूरच राहिलो असतो. अशा संमेलनातून विशिष्ट विषयाला धरून होणारी चर्चा व होणारे विचारमंथन दिशादर्शक असते. शिक्षण व साहित्य या दोन्ही विषयांच्या अनुषंगाने मांडला जाणारा विचार आज महत्त्वाचा आहे. अलीकडच्या काळात विशेषतः या दशकात शिक्षण क्षेत्रात होणारे बदल आपल्यालाही अचंबित करणारे आहेत. ' जमाना बदलला' असं एका वाक्यात याचं उत्तर देऊन आपण मोकळे होतो. पण जमाना बदलला म्हणजे काय झालं ? याचा विचार आपण गांभीर्याने करत नाही. स्वातंत्र्योत्तर कालखंडात खूप मोठे शैक्षणिक बदल झाले. अभ्यासक्रमातील पाठ्यपुस्तके बदलली. शिक्षणाचा आकृतीबंध बदलला. यंत्रणा राबविणारी माणसं बदलली, गुरुजी बदलले आणि विद्यार्थीही. कुडांच्या शाळा ते समृद्ध भौतिक सुविधा असणाऱ्या शाळा असा बदल झाला. पण आपल्या मुख्य उद्दिष्टात बदल झाला नाही. विद्यार्थी विकास हे उद्दिष्ट घेऊन तुम्ही आम्ही कार्यरत आहोत. शिक्षक के .जी .चा असेल की पी.जी.चा! विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास हेच त्याचे उद्दिष्ट असते आणि असायला हवे.हे एकदा निश्चित झाले की मग पुढचा मार्ग सुकर होतो. ही निश्चिती करण्यासाठी आम्हाला वेगळं काही करण्याची गरज नाही. कारण शिक्षकी पेशात पाऊल टाकतानाच आम्ही या उद्दिष्टाला बांधले गेलो आहोत.

शिक्षक हाच साहित्याचा मोठा वाहक आहे. याबद्दल कोणाच्याही मनात शंका असण्याचे कारण नाही. शाळा हे समाजाचे संक्षिप्त रूप असते तर समाज हा शाळेचे विस्तारीत रूप असतो. या संक्षिप्त आणि विस्तारीत अशा दोन्ही घटकात शिक्षक आणि साहित्यिक हे दोघेही महत्वाचे असतात. अनेकदा एवढे पूरक असतात की आपल्याला त्यांना वेगळे काढता येत नाही. शालेय स्नेहसंमेलनात कोणत्याही बडबड गीतावर किंवा बालगीतावर नृत्य करणाऱ्या विद्यार्थ्याला त्या गाण्याचा कवी किंवा गीतकार कोण आहे ? असं विचारलं तर तो निरागसपणे आपल्या बाईंचं किंवा गुरुजींचं नाव घेतो. त्याच्या दृष्टीने त्याचा कवी/ लेखक 'हा वर्गातच असतो. शिक्षण व साहित्य या क्षेत्रात समर्पणाच्या भावनेने काम करणारे मराठीतील एक नामवंत कवी प्रभाकर साळेगावकरांचे एक विधान खूप भावणारे आहे. ते म्हणतात," शिक्षक हा विद्यार्थ्यांचा साहित्यिक असतो आणि साहित्यिक हा समाजाचा शिक्षक असतो." मला वाटतं आपल्या संमेलनाच्या आयोजनामागचं सार आपल्याला या शब्दांत सापडतं. त्यामुळे कोणत्या शिक्षकाने मी साहित्यिक नाही असं वाटून घेण्याची गरज नाही.तुम्ही त्या चिमुकल्यांच्या विश्वातले साहित्यिक असता. त्याने टाकलेला हा विश्वास म्हणा किंवा श्रध्दा म्हणा, ती सिद्ध करण्याची जबाबदारी शिक्षक म्हणून तुमची आमची असते. प्रत्येक शिक्षक हा साहित्यिक असणे गरजेचे नाही पण त्यानं किमान साहित्य रसिक असावयास काय हरकत आहे ? बाल साहित्य व शिक्षण या क्षेत्रात काम करणारे कृतीशिल शिक्षक डॉ. सुरेश सावंत आपल्या चिंतनात म्हणतात, "भाषेच्या शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या भाषाभ्यासाचा प्रवास आवडीपासून अभिरुचीपर्यंत विकसित करावा आणि हा प्रवास करताना त्याने नकळत विद्यार्थ्यांच्या मनावर साहित्यमुल्ये बिंबवावीत अशी अपेक्षा असते. बहुश्रुत आणि साहित्यप्रेमी शिक्षक वर्गाचे रूपांतर स्वर्ग करु शकतो."

या चिंतनाचा विचार आपण केल्यास आपणास निश्चित काय करावयाचे आहे याचा अदमास येऊ शकतो.

साहित्यप्रेमी असण्याचा पहिला निकष म्हणजे आमच्या वाचनाची' यत्ता' कोणती आहे याचा विचार होणे महत्वाचे आहे, यातूनच मग आपल्या ईयत्तेच्या वर्गाचे वाचन आपण सांगू शकतो. कोरीनाकाळाने शिक्षणासाठी म्हणून विद्यार्थ्यांच्या हाती मोबाईल दिला आणि उरलेसुरले वाचनही संपून गेल्याची आजची स्थिती आहे. दोन वर्षाच्या शैक्षणिक खंडानंतर आपण अध्ययन स्तर वाढविण्याच्या प्रयत्नात राहिलो. त्यामध्ये आता बऱ्यापैकी यश आले असताना अध्ययन क्षमतांचा विचार आपण करतो आहोत . आपल्याला पाठ्यपुस्तकांच्या बाहेर जाऊन विद्यार्थ्यांचे अवांतर वाचन कसे वाढवता येईल यासाठी विशेष प्रयत्न करावे लागणार आहेत. उच्चभ्रू आणि उच्चशिक्षित अथवा मध्यमवर्गीय पालकांना सुध्दा आपल्या घरातील कपाटात चार वाचनाची पुस्तकं असावीत असं वाटत नाही. मग तुम्ही आम्ही ज्या क्षेत्रात काम करतो त्या पालकांकडून आपण काय अपेक्षा करणार आहोत ? या पार्श्वभूमीवर शाळा याच साहित्याच्या वहनाचा केंद्रबिंदू झाल्या पाहिजेत. शिक्षकाने यात भूमिका घेण्याची गरज आहे. शासन आदेशानुसार शालेय विद्यार्थ्यांसाठी वाचनीय पुस्तके विद्यार्थ्यासाठी उपलब्ध करून देण्याचे आदेश सार्वजनिक वाचनालयांना देण्यात आले आहेत याचा उपयोग आपण किती सकारात्मकपणे करतो हे महत्वाचे आहे. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने नायक असणाऱ्या शिक्षकाने या आपल्या



वर्तनातून वाचनाचे संस्कार करण्याची गरज आहे.

या वाचनाच्या ईयत्तेची पुढची पायरी म्हणजे लेखन आहे. ते साऱ्यांनाच जमते असे नाही, पण ज्यांना जमते त्यांना प्रोत्साहनाची गरज आहे. तुमच्या आमच्या लेखनाला अधिकारी सरकारी, समाज प्रोत्साहन देईल. पण बालकांच्या प्रतिभेचं काय ? हा प्रश्न उरतोच. सुदैवाने नामदेव माळी, तृप्ती अंधारे ,व्यंकटेश चौधरी असे अधिकारी प्रा. डॉ. भगवान अंजनीकर, प्रा. डॉ. सुरेश सावंत, शिवाजी अंबुलगेकर यांच्यासारखे शिक्षक यांनी विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला न्याय देण्यासाठी केलेले प्रयत्न आपल्यासमोर पथदर्शक आहेत. महाराष्ट्रात या दृष्टीने काम करणाऱ्या शिक्षकांची संख्या बऱ्यापैकी आहे. विस्तार भयास्तव ही उदाहरणे इथे उद्धत करता येत नसली तरी त्याची नोंद आपण विस्तृतपणे घेत आहोत. शाळा, केंद्र, तालुका असा निश्चित भाग निवडून यासाठी गांभीर्यपूर्वक व रचनात्मक आणि सकारात्मक प्रयत्न झाले तर यामधून बालप्रतिभेचा नवा उन्मेश समोर येणार आहे. या संमेलनाचा अध्यक्ष म्हणून यासाठीचे योगदान देण्याची ग्वाही मी आपणास देतो.

शिक्षक आणि साहित्यिक म्हणून समाजासमोर असणाऱ्या एका महत्वाच्या प्रश्नाकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. मोबाईलचा वापर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीतच अडथळा ठरत नाही तर त्यांच्यावर शारीरिक बाबीवरही दुष्परिणाम करीत आहे. यासाठी पहिल्यांदा जेष्ठांनी याबाबत गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. 'मोबाईल उपवास' संकल्पना आम्ही राबविली त्याचे चांगले परिणाम दिसून आले आहेत. प्रथम स्वेच्छेने आणि होत नसेल तर सक्तीने या विषयात काम करण्याची गरज निर्माण झाली आहे-.प्रायोगिक तत्वावर का होईना याची सुरुवात करणे आता आवश्यक झाले आहे, याचा गांभीर्याने आपण विचार कराल असा विश्वास आहे.भारतीय स्वातंत्र्याची पूर्ती करणा-या हैहाबाद मुक्तीसंग्रामाचे हे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. आपल्या प्रदेशाला स्वातंत्र्य मिळवून देणा -या लढ्याचा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोचविण्यासाठी किमान या वर्षात आपण काही निश्चय पावलं उचलून त्यासाठी व्यापक प्रयत्न करु या.अनाम वीरांनी दिलेल्या बलिदानातून हैद्राबाद मुक्तीसंग्रामाचा लढा आपण नव्या पिढीसमोर आणण्याची गरज आहे. त्या दृष्टीने आपल्यातला साहित्यिक व शिक्षक जागृत ठेऊ या.. कोणताही काळ प्रश्नांशिवाय नसतो.या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे सामर्थ्य तुम्हा आम्हांजवळ असायला हवे. यासाठी रमेश इंगळे उत्रादकर या शिक्षक असणाऱ्या साहित्यिक बांधवाने मागलेला हे पसायदान आपण निर्मिकाजवळ मागू या ..

**इतुकेची बळ अंगी यावे फक्त**
**खडूत रक्त उतरावे**
**उतरावे आणि देह व्हावा मुग्ध**
**खडूतून दूध स्त्रवताना**

# जिल्हा बँक कार्यकारी संचालक नियुक्ती.. चौकशीचे आदेश



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**जिल्हा बँका या शेतकऱ्यांच्या बँका म्हणून ओळखले जातात. अर्थातच शेतकरी त्यांना वाटप होणारे कर्ज सहकारी बँक असल्यामुळे सहकाऱ्यांची भावना तसेच अशा या बँकेचा कार्यकारी संचालक म्हणून ज्याची नेमणूक होते त्याला बँक ध्येय धोरण आर्थिक व्यवहाराचे आकलन तसेच त्याच्याजवळ क्षेत्राची पदवी तसेच क्षमताही असावी लागते. परंतु आता जळगाव जिल्हा बँकेच्या कार्यकारी संचालकाच्या नेमणुकीविषयी जो वाद निर्माण झाला आहे व तक्रार करण्यात आली आहे यावरून सहकार क्षेत्रात खळबळ माजली आहे आणि वरिष्ठ पातळीवरून आता संपूर्ण महाराष्ट्रातील सर्वच जिल्हा बँकांच्या कार्यकारी संचालकाच्या नेमणूक चौकशीचे आदेश निघाले आहेत.**

बँकेची ध्येय धोरणे ठरवण्यात तसेच बँकेची आर्थिक परिस्थिती बघून बँकेचा कारभार चालवण्याची मुख्य जबाबदारी ही कार्यकारी संचालकाचीच असते, परंतु बऱ्याच वेळा संचालकांना अडचणीचे ठेरु नये म्हणून त्यांच्याच मर्जीतील कार्यकारी संचालकाची निवड केली जाते आणि त्यामुळेच संचालकांनी एखादा निर्णय घेतल्यास त्याला विरोध कार्यकारी संचालक करू शकत नाही.

थोडक्यात संचालक करतील या गोष्टीला होय बा म्हणणे एवढेच काम असते. असे म्हणायला हरकत नाही. त्यामुळेच अशा नियुक्त्या करतांना शैक्षणिक पात्रता आणि क्षमता हा विचार गौण असतो. थोडक्यात काय तर हो भाऊ साहेब, हो दादासाहेब, हो नानासाहेब,हो आप्पासाहेब, हो ताईसाहेब, एवढेच कार्यकारी संचालक करू शकतो. एखाद्या चांगल्या गोष्टीसाठी विरोध करून संचालकांची नाराजी पत्करीत नाहीत. अर्थातच संचालकाच्या मीटिंगमध्ये फारच थोड्यावेळा त्याला तोंड उघडावे लागते.

गेल्या महिन्यात जळगांव जिल्हा बँकेचे कार्यकारी संचालक जितेंद्र देशमुख यांची नियुक्ती बेकायदेशीर असल्याची तक्रार संजीव मुकुंदराव पाटील यांनी जिल्हाउपनिबंधकां कडे केली. वरिष्ठांना डावलून त्यांची नियुक्ती झालेली आहे, त्यांच्याकडे बँकिंग क्षेत्राशी निगडित किंवा संबंधित कोणतीही पदवी नाही. ती निवड किंवा नेमणूक योग्य नसल्यामुळे ती रद्द करण्याची तक्रार केलेली आहे. या तक्रारीची किंवा वादाची सहकार विभागाने दाखल घेतली असून त्यांची पात्रता व क्षमता तपासण्यासाठी शासनाकडून विभागीय सहनिबंधक ( जॉईंट रजिस्ट्रार ) नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली पाच जणांच्या समितीची नेमणूक केली आहे. ही समिती 13 एप्रिल पर्यंत चौकशी करून 18 एप्रिल पर्यंत नाशिक विभागीय समितीच्या सभेत सादर करेल असे आदेश विभागीय सहनिबंधक यांनी काढले असल्याची बातमी वाचण्यात आली. कार्यकारी संचालक जितेंद्र देशमुख हे बँकेच्या क्षेत्राशी संबंधित नसून ते डिप्लोमा इन कॉम्प्यूटर आहेत. परंतु काही संचालकांना हाताशी धरून राजकीय संबंधातून ही बेकायदेशीर नियुक्ती झालेली आहे व यात शासनाची फसवणूक झालेली आहे. तेव्हा या पदावर काम करत असताना त्यांनी घेतलेले वेतन भत्ते व इतर सुख सोयी लाभ व्याजासह वसुल करण्यात याव्यात याबाबत संजीव पाटील यांनी सविस्तर तक्रार केलेली आहे. चौकशीसाठी जी समिती गठीत करण्यात आली आहे त्यात विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था. लेखापरीक्षक नाशिक. सदस्य सचिव म्हणून जिल्हाउपनिबंधक सहकारी संस्था जळगाव. जिल्हा विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था जळगाव. जिल्हा विकास अधिकारी व्यवस्थापक नाबार्ड. यांचा समावेश आहे. या समितीने देशमुख यांची पात्रता व क्षमता तपासणीसाठी नाबार्ड रिझर्व बँकेच्या नियमा नुसार दहा मुद्दे निश्चित केले आहेत व याचा अहवाल सादर करायचा आहे. हे मुद्दे कोणते ते सुद्धा सगळ्यांसाठी जाहीर व्हायला हवे. आता देशमुखांन विरुद्ध तक्रार सहकार खात्याकडे गेल्यानंतर याविषयीची चौकशी सुरू झाली, परंतु ज्या वेळेला त्यांची या पदावर नेमणूक झाली तेव्हा त्यांची शैक्षणिक पात्रता त्यांना बँकेच्या कामाचा सखोल माहिती आहे किंवा नाही आर्थिक व व्यावसायिक व्यवहार हाताळण्याची त्यांची कुवत आहे का ? या सर्व गोष्टी आता तपासल्या जात आहेत. खरंतर सहकार क्षेत्रात अशा प्रकारे नंतर चौकशी करण्याचे प्रकार योग्य नाही. अर्थात राजकीय लागेबांधे आणि नातेसंबंध हेच याला कारणीभूत आहे असे म्हणावे लागेल. आणि म्हणूनच इतके दिवस चौकशी झाली नाही.

गेल्या काही वर्षापासून जिल्हा बँकांविषयी वर्तमानपत्रात अनेक लेख प्रसिद्ध झाले आहेत. आणि त्यात जिल्हा बँका डबघाईला का आल्यात ? किंवा बँकेला घरघर का लागली आहे ? याविषयी सविस्तर मुद्दे मांडले गेले आहेत. अशा प्रकारे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने लिखाण माध्यमाद्वारे वृत्तपत्राद्वारे आले असते त्याची दखल त्याचे विभागाने

घेणे आवश्यक असते आणि जिल्हा माहिती विभागाने सुद्धा सदरची माहिती त्या विभागाला पुरवायला हवी असे वाटते. अर्थातच अशा लेखनाची दखल जिल्हाउपनिबंधक तसेच विभागीय सहनिबंधक विभागीय आयुक्त, यांनी घ्यायला हवी असते. परंतु जळगावच्या प्रकरणात तशी दखल घेतलेली दिसत नाही आणि म्हणूनच अशा प्रकारे संजीव पाटील यांच्या तक्रारी मुळे अपात्र कार्यकारी संचालकाची नेमणूक हा मुद्दा समोर आला. उशिरा का होईना सहकार विभागाला जाग आली हेही नसे थोडके.

राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेसह राज्य सहकारी बँकेच्या कार्यकारी संचालकांची मुख्य




कार्यकारी अधिकारी यांची शैक्षणिक अनुभव पात्रता तपासण्याचे आदेश राज्याचे सहकार आयुक्त यांनी दिले असून त्यासाठी प्रत्येक विभागात विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था यांच्या अध्यक्षतेखाली पाच जणांचे समिती नेमण्यात आली आहे. राजकीय हितसंबंध नातेसंबंध यातून कार्यकारी संचालकाची निवड होत असल्यामुळे पार्श्वभूमीवर अर्थातच जळगाव जिल्हा बँकेचा मुद्दा समोर आल्यानंतर ही तपासणी केली जात आहे. सहकार आयुक्त महाराष्ट्र राज्य यांनी याबाबत आदेश जारी केला आहे आणि त्यात सर्वच जिल्हा मध्यवर्ती बँकेतील मुख्य कार्यकारी अधिकारी पदावरील व्यक्ती नियुक्ती चौकशी होणार आहे. रिझर्व बँक तसेच नाबार्डच्या सूचनेप्रमाणे पात्रता व क्षमता हे आवश्यक आहे. बँकांच्या स्तरावर सूचनेची कार्यवाही होत नाही तेव्हा सूचनानुसार अशीच व्यक्ती नेमणूक व्हावी किंवा होणे आवश्यक आहे असे म्हटले आहे एप्रिल 2023 अखेर तपासणी होऊन अहवाल सादर व्हायला हवा आहे. डिसेंबर अखेरच असे आदेश काढले होते परंतु मार्च वर्ष अखेर मुळे मागे पडले. असे त्यांनी म्हटले आहे .परंतु आतापर्यंतच्या अपात्र लोकांच्या नेमणुका त्याची जबाबदारी कोण घेईल ? हा एक मोठा प्रश्न आहे .इतके दिवस या गोष्टी जिल्हा निबंध किंवा विभागीय सहनिबंधक यांच्या निदर्शनाला आले नव्हते का काय ? किंवा माहिती असूनही त्या दुर्लक्षीतच राहिल्या हेही बघायला हवे.

मी स्वतः हा मुद्दा अनेक वेळा, अनेक वृत्तपत्रातून, जसे सामना-मुंबई, पुणे,संपूर्ण महाराष्ट्र. महाराष्ट्र टाइम्स पुणे, गावंकरी नासिक,आ.केसरी -छ.संभाजी नगर, विदर्भ मतदार-अमरावती,बुलढाणा, अकोला, यवतमाळ, वाशीम. जनशक्ती-जळगांव, प्रभात-पुणे, नगर. नवशक्ती,दैशोन्नती,नांदेड एकजूट,यात माझ्या लेखनातून हा मुद्दा मांडला होता. जिल्हा सहकारी बँका डबघाईला का आल्या ? असे त्या लेखाचे शीर्षक होते .जर सहकारी बँका विषयी असे लिखाण वर्तमानपत्रात येत असतील तर त्याची दखल ही सहकार विभागाने वेळी घ्यायला हवी होती. परंतु तसे काही झाले नाही. त्या लिखाणातील कार्यकारी संचालकाच्या विषयीचा मुद्दा ह्याप्रमाणे होता... सहकारी संस्थेचे लेखापरीक्षण होते. दोषांची पूर्तता योग्य वेळी योग्य सादर केली जात नाही. सहकार खात्यावरही शासनाचे विशेष लक्ष नाही असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही... मुद्दा असा आहे की ज्या वेळेला जिल्हा बँकेचे सरकारी लेखापरीक्षण होते किंवा नाबार्डचे तपासणी होते त्यावेळेला कार्यकारी संचालकाच्या नेमणुकीचा मुद्दा त्यात येत नाही का ? किंवा ती नेमणूक जर योग्यरित्या झाली नसेल तर त्याची जाणीव करून त्याचा पूर्तता अहवाल का घेतला गेला नाही ? हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

बँक संचालक आणि बँक अधिकारी कर्मचारी यांच्यातील दुवा म्हणजे कार्यकारी संचालक. त्याला बँकिंग व्यवहाराचे पूर्ण ज्ञान हवे. बँकेचे अद्ययावत आर्थिक परिस्थिती काय आहे याचे सखोल ज्ञान हवे. आजची जिल्हा बँकेतील परिस्थिती अशी आहे की नातेसंबंध, राजकीय हितसंबंधातून, या नेमणुका होतात. बऱ्याच वेळी कार्यकारी संचालकास पुरेसे ज्ञान नसल्यामुळे एखादा सीनियर व्यवस्थापक ज्येष्ठ व्यवस्थापक त्याचे काम बघतो.( जळगांव बँक संदर्भात अशी चर्चा होती. )

शासनाने हस्तक्षेप करून चार्टर्ड अकाउंटंट ग्रेड व्यक्तीची व बँकिंग क्षेत्राची सखोल माहिती असणाऱ्या व्यक्तीची नेमणूक करण्याचे बंधन घालून द्यावे म्हणजे तो बँकेच्या हिताचे निर्णय घेईल.

मुद्दा असा आहे की प्रत्यक्षात असे होत नसते आणि नेमणूका होत असतात. त्याच्यामुळे संचालकांशी पुढे पुढे करून आपले स्थान टिकवणे यालाच अशी मंडळी प्राधान्य देतात, बँकेचे हित नंतर....

जिल्हा बँका विलीनीकरणाचा मुद्दा समोर आला त्यावेळेला कार्यकारी संचालकाच्या नेमणूक त्याची शैक्षणिक पात्रता संचालकाचा कार्यकाळ तसेच त्याची शैक्षणिक पात्रता आधी मुद्द्यावरून त्यावेळेला खूप विरोध झाला होता. जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कार्यकारी संचालकाच्या नियुक्तीवरून निर्माण झालेल्या वादामुळे व चौकशीमुळे आता संपूर्ण महाराष्ट्रातच सर्व जिल्हा बँकांच्या कार्यकारी संचालकांच्या नेमणुकीची चौकशी होणार आहे निदान आता तरी पारदर्शक चौकशी होऊन योग्य ती कारवाई आणि कार्यवाही होणे अपेक्षित आहे. कारण प्रत्येक जिल्हा बँकेवर दृश्य अदृश्य स्वरूपात कुठल्यातरी पक्षाचा झेंडा असल्याचे दिसून येते. शेतकऱ्यांचे बँकेत राजकारण आडवे येवू नये अशी अपेक्षा करु या.!

# डॉ. विजय पांढरीपांडे; एका संशोधकाचा सार्थक प्रवास..

आधुनिक केसरी

तुमच्या संशोधनाची सुरुवात कुठे कशी झाली?



मी आय आय टी खरगपूर ला एम टेक साठी प्रवेश घेतला. या पदवीच्या दुसऱ्या वर्षात प्रोजेक्ट, प्रबंध असतो. त्या सुमारास म्हणजे ७१-७२ साली सर्व जुन्या पाच आय आय टी ला संरक्षण मंत्रालयातर्फे मोठे प्रकल्प मंजूर झाले.संरक्षण प्रयोग शाळा, डी आर डी ओ ला भविष्यात निर्माण करायच्या अत्याधुनिक रडार प्रणाली संबंधी हे प्रकल्प होते. आमचे एम टेक चे प्रबंध याच विषयाशी संबंधित होते. सुरुवात तिथून झाली. तुमच्या संशोधनाचे नेमके क्षेत्र,विषयाचे स्वरूप काय आहे? ढोबळपणे सांगायचे तर माझ्या अध्ययन,अध्यापन,संशोधन या तिन्ही चे क्षेत्र मायक्रो वेव्ह, रडार इंजिनियरिंग शी संबंधित आहे. एम टेक झाल्या नंतर मी मुंबईच्या टी आय एफ आर मधील मायक्रोवेव्ह विभागात वैज्ञानिक अधिकारी होतो. तिथेही श्रीहरिकोटा च्यास्पेस रिसर्च सेंटर साठी एका प्रकल्पावर काम केले.याच काळात मी माझ्या एम टेक प्रबंधा वर आधारित पेपर लिहिला. तो दिल्लीच्या राष्ट्रीय जर्नल मध्ये प्रकाशित झाला. मुंबईहून मी परत आय आय टी ला रडार सेंटरमध्ये लेक्चरर म्हणून जॉईन झालो. शिकवताना पीएच. डी.चे कामही सुरू होते. ते चार वर्षात पूर्ण झाले.

**-आय आय टी चा संशोधन दर्जा अन् इतर विद्यापीठातील संशोधन यात फरक जाणवतो?**

- निश्चितच खूप फरक आहे. तिथले मार्ग दर्शक प्राध्यापक कडक असतात. दर्जाच्या बाबतीत कसलीही तडजोड चालत नाही. आंतर राष्ट्रीय स्तरावरील जर्नल मध्ये तीन चार फुल पेपर प्रकाशित झाल्याशिवाय प्रबंध लेखनाला परवानगी मिळत नाही!हे काम सोपे नसते.कारण तुमचा पेपर परदेशातील तीन तज्ञ मंडळी तपासतात.त्याच्या कॉमेंट्स चा आदर करून योग्य त्या सुधारणा कराव्या लागतात. त्या काळी इंटरनेट,ईमेल या सुविधा नव्हत्या.त्यामुळे यात खूप वेळ खर्च होतो. पण या प्रक्रियेत खूप काही शिकायला मिळते. गुणवत्तेशी तडजोड न करण्याची जिद्द वाढीला लागते. पी एच डी साठी केलेले संशोधन हे मूलभूत स्वरूपाचे संशोधन असते. माझे त्यानंतरचे संशोधन हे अपलाईड स्वरूपाचे होते.

**- हे थोडे विस्ताराने सांगता येईल?**

- आय आय टी खरगपूर ला असताना मी नऊ वर्षे स्पेस सेंटर, इस्रो,डी आरडी ओ यांनी फडींग केलेल्या प्रायोजित प्रकल्पावर काम केले. अती उच्च फ्रिकवेनसी म्हणजे दहा वर नऊ शून्य, सायकल प्रती सेकंद,मायक्रोवेव्ह ब्यांड च्याअंटेना वर हे काम होते. जुनी रडार प्रणाली आधुनिक युध्दात उपयोगी नव्हती. त्यात बऱ्याच मर्यादा होत्या. यात सुधारणा करायची तर आंटेना नव्या पध्दतीने डिझाईन करणे गरजेचे होते. आपल्या गच्ची वरील तव्या सारख्या दिसणाऱ्या आंटेना शी आपली ओळख असतेच.आधुनिक रडार साठी अगदीच नव्या, संपूर्ण आधुनिक प्रणालीची गरज असते.त्यावर आम्ही संशोधन केले. यासाठी संरक्षण विभागाचे पूर्ण अर्थ सहाय्य होते.याच प्रकलपा अंतर्गत संरक्षण प्रयोग शाळा तील वैज्ञानिक अधिकारी,आर्मी, एअर फोर्स,नेव्ही चे अधिकारी आय आय टी ला एम टेक साठी येत. त्यांना शिकविण्याची संधी मिळाली. यापैकी अनेक जण पुढे आपापल्या संस्थेचे डायरेक्टर झालेत. याचा मला शिक्षक म्हणून अभिमान वाटतो.या विद्यार्थी अधिकाऱ्या कडून खूप काही शिकायला मिळालं. आपण इतर देशाच्या तुलनेत तंत्रज्ञानाक्षेत्रातकिती मागे आहोत हेही समजले.अमेरिका,रशिया सोडा,पण चीन,जपान, इस्रायल सारखे देश देखील आपल्या किती तरी पुढे आहेत.

**-आय आय टी तून तुम्ही उस्मानिया विद्यापीठात प्राध्यापक म्हणून आलात.या प्रवासाबद्दल काय सांगाल?**

- माझ्या आयुष्यातील बहुतेक स्थित्यंतर ही अचानक ,अनपेक्षित अशीच घडली आहेत.माझे उस्मानिया विद्यापीठात येणे असेच आकस्मिक घडले.एरवी आय आय टी सारखी संस्था कोण सोडतो?

- **हाच प्रश्न अनेकांना पडतो. तुम्ही आय आय टी का सोडली?**

उत्तर सोपे आहे.वयाच्या अवघ्या चौतिसाव्या वर्षी मला प्राध्यापकाच्या सर्वोच्च पद मिळाले. तेही मुलाखतीला न जाता.कारण त्यावेळी मी एका परिषदेसाठी इंग्लंडला गेलो होतो. त्यामुळे गैर हाजरीत माझी निवड झाली.या निवडीचे कारण होते.त्या दरम्यान उस्मानिया विद्यापीठाला भारत सरकारच्या इलेक्ट्रॉनिक विभागातर्फे नेव्हिगेशनल इलेक्ट्रॉनिक विषयाचा फार मोठा प्रकल्प मिळाला होता.त्यात मायक्रोवेव्ह विभागा साठी मला निमंत्रित करण्यात आले. मूळ निवड इंजिनियरिंग कॉलेज साठी इलेक्ट्रॉनिक कामुनिकेशन विभागात होती. म्हणजे अध्यापन,संशोधन दोन्हीत छान संधी होती.शिवाय हैदराबाद येथे अनेक डी आर डी ओ प्रयोगशाळा आहेतच. त्यांच्या साठी काम करण्याचं आव्हान होत.कारण या प्रयोग शाळेतील डॉ कलाम यांच्या सह अनेक अधिकाऱ्या शी खरगपूर पासून संबंध होते.ते आता दृढ झाले. इथे आल्यावर मी सी एस आय आर, डी आर डी ओ,इस्रो , डी एस टी अशा अनेक संशोधन प्रकल्पावर काम केले.या लाखों च्याअनुदानातून आधुनिक प्रयोग शाळा उभारता आल्या. त्याचा पदव्युत्तर, पी एच डी संशोधक विद्यार्थ्यांना खूप फायदा झाला.डॉ कलाम आमच्या नेव्हिगेशन सेंटर मध्येआडवयझरी बोर्डावर होते. त्यामुळे त्यांच्या शी जवळून संबंध आला.अनेक निवड समित्यांवर मी तज्ञ म्हणून त्यांच्या सोबत काम केले.माझ्या हाताखाली १४जणांनी पी एच डी चे संशोधन केले. त्यात संशोधन प्रयोगशाळेचे वैज्ञानिक ५०टक्के आहेत.ज्यात एक डॉ कलाम यांचे सहकारी देखील आहेत.हे बहुतेक संशोधन थेट या संरक्षण प्रयोग शाळांतील आधुनिक प्रकल्पा शी थेट संबंधित होते. ते आधुनिक भारतीय रडार प्रणाली साठी वापरले गेले.

**- अशा डिफेन्स संबंधी संशोधनाच्या काही अडचणी, मर्यादा असतात का?**

- निश्चितच असतात.हे काम आर्मी, नेव्ही, एअर फोर्स शी प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष संबंधित असल्यानं गुप्तता ठेवावी लागते. रिसर्च पेपर प्रकाशित करतांना अनेक मर्यादाचे पालन करावे लागते. दिल्लीहून परवानग्या घ्याव्या लागतात. त्यात वेळ जातो. पण मला या बाबतीत सर्वच क्षेत्रातून छान सहकार्य मिळाले.कारण संरक्षण प्रयोग शाळा च्या अनेक निवड समित्यांवर मी तीन दशकं काम केले तज्ञ म्हणून! हा रेकॉर्ड असेल कदाचित.हे तज्ञ दर पाच वर्षांनी बदलतात. पण मी या नियमाला अपवाद ठरलो. अगदी गेल्या वर्षी माझ्या मार्ग दर्शना खाली पूर्ण झालेले पी एचडी संशोधन आधुनिक रडार प्रणाली शी संबंधित असून त्याचे सिस्टीम टेस्टिंग इंडो चायना सीमेवर सुरू आहे. हे काम एका स्टार्ट अप इंडस्ट्री मधल्या इंजिनिअर ने केले आहे.

**- आपल्याकडे शैक्षणिक संस्था अन् संशोधन प्रयोगशाळा, किंवा उद्योग, आय टी इंडस्ट्री यांच्यात फारशी देवघेव होताना दिसत नाही.**

- हे खरे आहे. परदेशात अशी देवघेव फार मोठ्या प्रमाणात चालते. सरकारी प्रयोग शाळा, इंडस्ट्रीज यांच्या तर्फे तिकडे विद्यापीठांना भरीव योगदान मिळते. ती परस्परा विषयीची विश्वासार्हता आपल्या कडे दिसून येत नाही.पण उस्मानिया विद्यापीठातील आमच्या इलेक्ट्रॉनिक विभागाच्या मायक्रोवेव्ह क्षेत्रातील संशोधन कार्याची दखल घेऊन हैदराबादच्या अस्त्रा मायक्रोवेव्ह या इंडस्ट्री ने सेंटर फॉर एक्सेल्लेन्स इन मायक्रोवेव्ह इंजिनियरिंग च्या स्थापनेसाठी पाच वर्षे एक करोड पेक्षा जास्त अनुदान दिले.या केंद्रात संशोधन प्रकल्प तर राबविले गेलेच. पण देशातील हजारो वैज्ञानिक,प्राध्यापक,संशोधक यांच्यासाठी ट्रेनिंग कोर्सेस आयोजित करण्यात आलेत.या क्षेत्रात ट्रेनिंग देणारे देशातील हे एकमेव केंद्र ठरलेएक अत्यायावत आधुनिक प्रयोग शाळाआम्हीउभारू शकलो.याचा लाभ अनेक विद्यार्थी घेताहेत. हे मला समाधानदेणारे सर्वात मोठे योगदान वाटते. यामुळे निवृत्त झाल्या नंतर देखील उस्मानिया विद्यापीठाने,या संशोधन केंद्राने मला कार्यरत ठेवले आहे.निवृत्त होऊन १४वर्षेझाल्यानंतर देखीलमाझे ऑफिस, माझ्या नावाची पाटी कायम आहे.पर प्रांतातून आलेल्या प्राध्यापकाला मिळालेला हा बहुमान मलामोलाचावाटतो. एका ब्याचच्या माजी विद्यार्थ्यांनी देणगी देऊन माझ्या नवे एक रिसर्च ल्याब निर्मिली आहे.एका शिक्षकाला आणखी काय हवं असतं? शिक्षण क्षेत्रातही आपण असे काही प्रयोग राबविले का? निश्चितच.. जागतिक ब्यांकेने प्रायोजित केलेल्या दोन प्रकल्पाचा मी समन्वयक होतो. यासाठी करोडो रुपये अनुदान मिळाले.उत्तम इकविपमेंट्स संगणक, सॉफ्ट वेअर मिळाले.नवी अध्यापन पद्धती,नव्हे अभ्यासक्रम निर्मिती,परीक्षा पद्धतीत सुधारणा,आधुनिक प्रयोग शाळानिर्मितीउत्तम ग्रंथालय असे अनेक प्रयोग राबवता आले.उद्योगासाठी पोषक वातावरण,विद्यार्थ्यांची उपयोगिता वाढ हा या प्रकल्पाचा उद्देश होता. तंत्र शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र बदल घडविणारा हा प्रयोग होता.यासाठी स्विस डेव्हलपमेंट कोऑपरेशनचे देखील अर्थ सहाय्य होते. यासाठी संपूर्ण देशात उत्कृष्ठ कामगिरीचे पारितोषिक आम्हाला मिळाले.आज नव्या शैक्षणिक धोरणासजे अपेक्षित आहे त्याची सुरवात आम्हीदोन दशकांपूर्वीकेली!एकूणच हा अध्यापन संशोधनाचा प्रवास सुखदायी फलदायी ठरला. धन्यवाद..

आपल्या विस्तृत मुलाखती बद्दल मनपूर्वक आभार.

**डॉ. विजय पांढरीपांडे यांना मिळालेले सन्मान, पुरस्कार, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव,व्ही एन आय टी नागपूर चे कुलगुरू. दिल्लीच्या इन्स्टिट्युट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स टेली कम्युनिकेशन इंजिनियर संस्थेचे रामलाल वाधवा सुवर्ण पदकासह तीन राष्ट्रीय पुरस्कार इन्स्टिट्युट ऑफ इंजिनीअर्स ,आंध्र प्रदेश ( तेलंगणा) सरकारचा सर विश्वेश्वरया अवार्ड आचार्य अत्रे शिक्षण पुरस्कार पुणे आंध्र प्रदेश ( तेलंगणा)सरकारचा,तसेच उस्मानिया विद्यापीठाचा उत्तम प्राध्यापक पुरस्कार, इंडियन सोसायटी ऑफ टेक्निकल एज्युकेशनचा अण्णा युनिव्हर्सिटी राष्ट्रीय पुरस्कार, राष्ट्रीय आंतर राष्ट्रीय स्तरावरील जर्नल मध्ये १६० वर शोध निबंध प्रकाशित. मराठी साहित्यात ३३ पुस्तकं ( कादंबऱ्या, कथा, लेख, आत्म कथन) प्रकाशित.**

# युगप्रवर्तक महात्मा फुले



पंकज वसंत पाटील
मो. 9850439579

आधुनिक केसरी

**आपला महाराष्ट्र महान लोकांचे राष्ट्र म्हणून ओळखल्या जातो. महाराष्ट्रात वर्णव्यवस्था, जातीवाद, विषमता यांची बजबजपुरी माजली असताना, शिक्षणावर मूठभर लोकांची मक्तेदारी होती. तेव्हा समाजविघातक पुरातन धर्मकल्पना, जातीभेद, अज्ञान व स्त्री जीवनातील बंधनकारक प्रथांविरोधात आमरण झटणारे-झगडणारे, अज्ञ, अशिक्षित मूक शेतकरी-मजुरांचे वाचस्पती ठरलेले, रंजल्या-गंजल्यांच्या अभ्युदयासाठी सर्वस्व पणाला लावणारे अग्र महापुरुष म्हणजेच महात्मा ज्योतिराव फुले. त्यांचे पूर्ण नाव ज्योतीराव गोविंदराव फुले असून त्यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी पुणे येथे झाला.**

जोतिबांच्या वडिलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमणाबाई होते. शेवटच्या पेशव्यांच्या काळात महात्मा फुले यांचे वडील आणि दोन चुलते फुले पुरवण्याचे काम करीत असल्याने ते फुले म्हणून ओळखले जाऊ लागले. ज्योतिरावांच्या लहानपणी म्हणजे ते अगदी नऊ महिन्यांचे असतानाच त्यांच्या आई निवर्तल्या. त्यामुळे त्यांना मातेची माया मिळू शकली नाही. त्यांचा सांभाळ सगुणाबाई यांनी केला. सगुणाबाई दाई असल्या तरी त्या ज्योतीबाच्या आईच ठरल्या. जन्मदात्री आई आठवत नसली तरी ती उणीव आऊ सगुणाबाईने भरून काढत ज्ञानबोध करून कधीही कमी न पडणारी ज्ञानसंपत्ती दिल्याचे जोतीराव सांगतात. निर्मिकाचा शोध हे पुस्तक त्यांनी सगुणाबाईस अर्पण केले आहे.

१८४० साली त्यांचे लग्न सावित्रीबाईंशी झाले. देशाच्या शैक्षणिक व सामाजिक इतिहासात फुले दांपत्याचे कार्य क्रांतिकारक आणि अलौकिक आहे.

भारतातील स्त्री शिक्षणाचा पहिला प्रयोग महात्मा फुले यांनी आपल्या शेतावरील आंब्याच्या झाडाखाली केला. सगुणाबाई व सावित्री यांच्या शिक्षणाचा ज्योतीबांनी केलेला हा आरंभ म्हणजे भारतात केलेला स्त्रीशिक्षणाचा पहिलावहिला प्रयोग. स्त्री शिक्षणाच्या नव्या प्रवासाला येथूनच आरंभ झाला. स्त्रीशिक्षण कार्याची मुहूर्तमेढ तिथूनच रोवली गेली. ज्योतिबांनी विद्येचे महत्त्व ओळखून स्त्री शिक्षणास सर्वश्रेष्ठ स्थान दिले. पुरुषापेक्षा स्त्री शिक्षणाला विशेष महत्त्व आहे हे अचूक ओळखले. १८४८ मध्ये त्यांनी बुधवार पेठेतील भिड्यांच्या वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. या शाळेपासूनच सावित्रीबाई आणि ज्योतिबा या फुले दांपत्याचा युगप्रवर्तक क्रांतिकारक प्रवास सुरू झाला. १५ मे १८४८ रोजी त्यांनी पुणे येथे महारवाड्यात शाळा सुरु केली. ज्योतिबा फुले हे पुरुषांपेक्षा स्त्री शिक्षणाला अग्रक्रम दिला पाहिजे असे सांगणारे पाहिले भारतीय द्रष्टे होते. विद्येशिवाय कसल्याही प्रकारची प्रगती शक्य नाही हे अचूक ओळखून तळागाळातील समाजाच्या व स्त्री शिक्षणाचे काम त्यांनी सुरू ठेवले. आर्थिक,सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक अशा सर्व प्रकारच्या गुलामगिरीत खितपत पडलेल्या समाजासाठी विद्या हे एकमेव रामबाण औषध आहे हे ज्योतिरावांनी ओळखले व शिक्षणाद्वारे समाज सुधारणेचे कार्य आरंभले. त्यांनी प्रथम पुणे परिसरात शाळा सुरू केल्या. शाळांची व्याप्ती वाढवत पाच वर्षात स्त्री व अप्रगत समाजासाठी जवळपास वीस शाळा काढल्याची नोंद मिळते. सामाजिक प्रतिकूलता आर्थिक चणचण अनंत अडचणी अशा संकटांवर मात करत ते शाळांची संख्या वाढवत राहिले.

महात्मा फुले व सावित्रीबाई यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव म्हणून विश्रामबाग वाड्यात इंग्रज सरकार मार्फत भरजरी शाली घेऊन या दंपतीचा केलेला जाहीर गौरव इंग्रज सरकारने केलेला भारत देशातील पहिला सत्कार समारंभ होता.

त्या काळी स्त्रियांना पुरुषांप्रमाणे कुठलीही हक्क नव्हते. त्यांनी शिक्षण घेऊ नये, बाहेर पडू नयेत, स्त्रिया दुर्बल अविश्वसनीय आणि कमी बुद्धीच्या असतात अशी सामाजिक धारणा होती. स्त्रियांचे स्वातंत्र्य पूर्णपणे हरवलेले होते. त्या गुलामगिरी प्रमाणे जीवन जगत होत्या. स्त्री- बालहत्या, बालविवाह असे प्रकार त्या वेळी घडत असत. विधवा स्त्रियांना खूप वाईट जीवन जगावे लागत असे, त्यांच्या डोक्यावरील केस काढण्यात येत होते. विधवा-पुनर्विवाहास खूप विरोध होता. विधवांना अपशकुनी मानले जात असे. एवढेच नव्हे तर अनेक वेळा त्यांच्यावर अत्याचार होत असत.

ज्योतिबांनी या सर्व चालीरीती बंद करण्यासाठी अथक प्रयत्न केले. विधवा पुनर्विवाह प्रोत्साहन दिले. काही विवाह स्वतः घडवून आणले व केशवपणास मनाई केली. ती पद्धत १८५२ साली पूर्णपणे थांबविली. धैर्याचा मेरूमणी असलेल्या फुल्यांनी त्यांना विरोध करणाऱ्या कोल्हेकोईला न जुमानता आपले अलौकिक कार्य ते करतच राहिले.

१८७३ ला सत्यशोधक समाजाची स्थापना करून त्यांनी आपल्या सामाजिक व नैतिक तत्वज्ञानाला संस्थात्मक स्वरूप दिले. १८७६-७७ मध्ये महाराष्ट्रात पडलेल्या दुष्काळात दुष्काळ निवारणासाठी निवारणासाठी त्यांनी मोलाचे कार्य केले. सत्यशोधक समाजातर्फे छात्रालये उघडून मुलामुलींची जेवणाची सोय केली.

उच्च जीवनमूल्यांच्या प्रस्थापनेसाठी व सर्वसामान्यांच्या हिताला प्राधान्य देऊन महाराष्ट्र महात्मा फुले जीव धोक्यात घालून जगले. गरिबांना मोफत शिक्षणाची देण्याची मागणी करणाऱ्या, शेतकऱ्यांच्या शिक्षणासाठी झगडणाऱ्या ज्योतिरावांनी १८८९ साली इंग्लंडच्या प्रिन्स ऑफ वेल्स यांना पुणे येथील सभेमध्ये 'भारत देश खेड्यात आहे, तो गरीब आहे, त्याची गरिबी घालवण्यासाठी सरकारने खटपट करावी आणि त्यांना शिक्षण द्यावे असा निरोप राणी साहेबांना सांगावा' असे ठणकावून सांगितले. 'सत्यमेव जयते' हे त्यांचे ब्रीद होते. देशाची बहुसंख्य जनता शेतकरी आहे, देशाच्या स्वातंत्र्य विचारात शेतकऱ्याला स्थान नसेल तर तो विचार अपुरा व एकांगी असल्याचे ज्योतिरावांनी वारंवार स्पष्ट केले.

ज्योतिबांनी वाट चुकलेल्या व दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडलेल्या काशीबाई या ब्राह्मण विधवेला वाचवून स्वतःच्या घरी सावित्रीबाईकडून त्यांचे बाळंतपण केले व त्यांच्या पोटी आलेल्या यशवंतला दत्तक घेऊन वारसदार ठरवणारे ज्योतिबा हे कर्ते सुधारक होते. त्यांनी सत्य आणि समता या तत्त्वांचा सक्रीय संदेश देऊन उन्नतीचा मार्ग जनतेला मोकळा करून दिला. आपले विचार तळागाळापर्यंत पोहचविण्यासाठी त्यांनी सतत लेखणीसुद्धा चालविली. त्यांनी दीन बंधू नावाचे पत्रक चालविले. तसेच गुलामगिरी, शेतकऱ्यांचा आसूड, इशारा, सत्सार, सार्वजनिक सत्यधर्म यासारख्या विचार प्रवर्तक व क्रांतिकारक पुस्तकांचे लिखाणही केले.

**विद्येविना मती गेली ।मतिविना नीती गेली ।**
**नितीविना गती गेली ।गतिविना वित्त गेले**
**वित्ताविना शूद्र खचले ।इतके अनर्थ अविद्येने केले**

असे सांगणारे ज्योतिबा स्त्री व शुद्रांच्या शिक्षणासाठी पोटतिडकीने टाहो फोडणारे देशातील पहिले कैवारी होते.

२८ नोव्हेंबर १८९० रोजी हा सत्याचा उपासक जग सोडून गेला. युगप्रवर्तक ठरलेल्या सामाजिक क्रांतीच्या या अग्रदूतास कोटी कोटी नमन.



# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना जयंती पुरते मर्यादित करू नये



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती संपूर्ण देशामध्येच नव्हे तर जगाच्या काण्या कोपऱ्यामध्ये मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. जागतिक पातळीवर वरती एवढ्या मोठ्या प्रमाणात साजरी होणारी एकमेव जयंती म्हणजे भिमजयंती होय. स्वयंस्पृतिने बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याची विचाराची जाणीव ठेवून साजरी करण्यात येते. अत्यंत आनंदी, उत्साही वातावरण निर्माण होऊन जल्लोषात जयंती साजरी होते. गावोगावी, खेडोपाडी, लहान मोठ्या शहरांमध्ये जयंतीनिमित्त सर्व समाज बांधव व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याची व विचाराची जाणीव असलेल्या बहुजन समाजातील लोक एकत्र येऊन मोठ्या थाटामाट्याने जयंती साजरी करतात या जयंतीचे अनेक वैशिष्ट्ये आहेत.**

जयंती मध्ये कोणत्याही राजकीय पक्षांचा किंवा सामाजिक संघटनेचा कोणताही हस्तक्षेप नसतो. समाजातील लोक एकत्र येऊन उत्सव समिती निर्माण करून त्या समितीमार्फत जयंतीला कोणतेही गालबोट न लागता जयंती उत्सव पार पाडण्याची जबाबदारी स्वीकारली जाते. अनेक ठिकाणी जयंती माध्यमातून रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, शैक्षणिक साहित्य वाटप, तरुणांच्या कलागुणांना वाव देणारे कार्यक्रम आयोजित केले जातात. याचा फायदा अनेक गरजू या लोकांना मिळत असतो. कोणतीही सामाजिक काम करताना गरजू लोकांची गरज भागवणे हेच असते, म्हणूनच त्याला सामाजिक कार्य असे म्हणतात. जयंतीनिमित्त गावोगावी, खेडोपाडी शहरा शहर अनेक ठिकाणी भव्य दिव्य व आकर्षक मिरवणुकीचे आयोजन सुद्धा केलेले असते. मिरवणुकी दरम्यान अनेक महिला, बालक, वृद्ध, तसेच जल्लोष करणारे तरुण एकत्र असतात. परंतु कितीही गर्दी झाली तरी मिरवणुकीमध्ये कोणत्याही प्रकारचा गैरकृत्य जसे चोरी, छेडछाडी, चंगराचंगरी होत नाही हे विशेष. अनेक ठिकाणी वैचारिक पुस्तके महापुरुषांचे फोटो विकून समाजामध्ये नवीन वैचारिक ऊर्जा भरण्याचे कामही केले जाते. अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून जयंती जवळ येत असताना किंवा जयंतीचा एप्रिल महिना हा पूर्ण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रभावित झालेला दिसतो. याच महिन्यात अनेक नवीन लिखाण, गाणी, कविता या सुद्धा निर्माण झालेल्या असतात. थोडक्यात काय तर आंबेडकरवादी लोकांसाठी एप्रिल महिना हा ऊर्जा, स्फूर्ती व उत्साह देणार आहे. वरील सर्व गोष्टी जयंती कार्यक्रमानिमित्त होत असतात आणि त्यांचे कौतुक करणे ही क्रमप्राप्त आहे. परंतु वरील कृती ही फक्त एप्रिल महिन्यापूर्वी मर्यादित किंवा भीम जयंती पुरते मर्यादित नसावी. ज्याप्रमाणे कोणत्याही नेत्याचे नेतृत्व न स्वीकारता, कोणत्याही नेत्याच्या नेतृत्वाचा पक्षाचा संघटनेचा गुणगौरव न करता जयंती कार्यक्रमांमध्ये एक अनुयायी म्हणून आपण सहभागी होतो व आपल्यामुळे जयंतीला कुठेही गालबोट लागू नये याची खबरदारी घेतो, जर आपण असे वर्षभर केले तर नक्कीच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित समाज व्यवस्था या ठिकाणी निर्माण होईल. जयंती कार्यक्रमाला एकी आणि शक्ती दाखवतो त्याच एकीची आणि शक्तीची गरज समाजाला वेगवेगळ्या प्रसंगी सामाजिक समता व सामाजिक न्याय यासाठी आवश्यक असते. आजही समाजामध्ये अनेक प्रकारचे अन्याय अत्याचार होत असतात. संविधानाच्या विरुद्ध अनेक काम या ठिकाणी केले जातात. ते थांबवण्यासाठी आणि सरकारवर दबाव निर्माण करण्यासाठी आपल्याला गरज असते ती एकत्र मनुष्यबळाची, त्यांच्या ताकतीची. म्हणून हीच कृती कायम ठेवून कोणत्याही राजकीय नेत्यांच्या भूलथापांना न भुलता आपण जर कायम ठेवली तर आपल्या कामासाठी अर्थात समाजाच्या कामासाठी नेते समोर येऊन समाजाचे मुद्दे मांडण्याचा प्रयत्न करतील. सध्याचे जर राजकारण बघितले तर राजकीय नेते समाजाचे मुद्दे, समाजाचे विषय यावर न बोलता वैयक्तिक विषयांवरती बोलून स्वहित साधून घेत आहेत. लाखो करोडो रुपयांचे बजेट दरवर्षी जाहीर करूनही सर्वसामान्य लोकांना एकही रुपयाचा फायदा होत नाही. उलट देशावरचे कर्ज दिवसेंदिवस वाढत आहे. देशातील सार्वजनिक संपत्तीचे अर्थातच लोकांच्या मालकीची जी काही संपत्ती होती ती संपत्ती भांडवलदारांच्या घशात ओतून सरकारने तिचे खाजगीकरण केलेले आहे. याचा परिणाम येणाऱ्या काळामध्ये भारतीय जनतेला खूप मोठ्या प्रमाणात भोगाव लागणार आहे. भविष्यामध्ये आमचे हक्क अधिकार स्वातंत्र्य व न्याय अबाधित ठेवण्यासाठी भीम जयंती ची एकी आम्हाला वर्षभर कायम ठेवणे आवश्यक आहे. तरच आम्ही समाजामध्ये सत्ता स्वातंत्र्य, न्याय, हक्क मिळवून देऊ शकतो. ज्याप्रमाणे जयंती साजरी करताना समाजामधून लोक



वर्गणी गोळा करून मोठ्या आनंदात, उत्सव साजरा करतो. त्याच पद्धतीने समाजाच्या हितासाठी जे सक्षम लोक आहेत त्यांच्याकडून लोकवर्गनीचे काम वर्षभर करायला कोणतीही हरकत नाही. परंतु लोकवर्गणीतून जमा झालेला पैसा फक्त नाचण्यावर उधळणे हे मात्र चुकीचेच आहे. लोकवर्गणीतून जमा झालेला पैसा शिक्षण, आरोग्य, रोजगार, सोशल मीडियाचा प्रचार आणि प्रसार यावर जर झाला तर समाजातील अनेक अडचणी दूर होतील. एक दिवस आरोग्य शिबिर घेऊन समाजातील आरोग्याचा प्रश्न मुळीच मिटणार नाही. परंतु जर समाजातूनच गोळा करून समाजासाठीच जर मोठे हॉस्पिटल उभारले तर त्या ठिकाणी समाजातील अनेक गोरगरीब श्रीमंत सर्व लोकांना एकाच छताखाली स्वस्ता मध्ये आरोग्य उपचार मिळतील व कोणत्याही गोरगरीब कुटुंबाला इमर्जन्सी आल्यानंतर न घाबरता इकडे तिकडे कोणत्याही प्रकारच्या पैशाचे व्यवस्था न करता समाजातील हॉस्पिटलमध्ये भरती केले तर त्यांचा चांगल्या पद्धतीने उपचार होऊ शकतो. हॉस्पिटलची फी ही कमी जरी ठेवली तरी समाजातील लोक त्या ठिकाणी उपचार घेण्यासाठी येतात आणि दरवर्षी समाजातील काही उत्पन्नाचा भाग हॉस्पिटल साठी जर खर्च करत राहलो तर प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी मोठमोठे व सुसज्ज हॉस्पिटल निर्माण होण्यास वेळ लागणार नाही. तीच बाब शिक्षण संस्थांविषयी सुद्धा लागू होते शिक्षणाचा बाजार जर आपण बघितला तर सर्वसामान्य लोकांना शिक्षण घेणे परवडणारे नाही. बाबासाहेबांनी संपूर्ण आयुष्य गोरगरीब शैक्षणिक व सामाजिक मागासलेल्या लोकांच्या शिक्षणासाठी खर्ची घातले. बाबासाहेबांच्या नंतर आम्ही सामाजिक पातळीवर जर आमच्या मोठ्या शिक्षण संस्था सुरू करू शकलो तर त्या ठिकाणी क्रांतीची एक ऊर्जा तर मिळेलच परंतु शिक्षणाचा बाजारीकरणाचा परिणाम सर्वसामान्य लोकांवर होऊन ते आपल्या मुलांना चांगल्या पद्धतीचे शिक्षण समाजातील शिक्षण संस्थेत देऊ शकतील. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर संपूर्ण देशाला नियंत्रित करेल, संपूर्ण देशाचा कारभार बघेल अशी रिझर्व बँक ऑफ इंडिया दिली. परंतु बाबासाहेबांच्या नंतर समाजातील अनेक लोकांकडे खूप मोठ्या प्रमाणात पैसा आला परंतु हा समाजाची एक मोठी बँक उभी करू शकला नाही. हीच मोठी शोकांतिका आहे. समाजातील पैसा समाज जातीलाच बँकेमध्ये जर जमा झाला तर प्रत्यक्ष अप्रत्यक्षरीत्या सर्वात मोठा फायदा हा समाजालाच होऊन अनेक लोकांना रोजगार मिळाला असता समाज आर्थिक दृष्ट्या संपन्न झाला असता. म्हणजेच समाजातीलच पैसा जेव्हा आपण नाच गाणे किंवा इतर निरर्थक बाबींवर खर्च करतो तोच पैसा चांगल्या बाबींवर जर खर्च केला तर खऱ्या अर्थाने आंबेडकरवादी चळवळ यशस्वी होत आहे हे दिसून येईल. आणि कोणतीही चळवळ यशस्वी व्हायची असेल तर त्या चळवळीला वृत्तपत्र आवश्यक असते वृत्तपत्र म्हणजेच प्रसारमाध्यम म्हणून समाजाने स्वतःचे कमीत कमी राज्य लेव्हलचे एक प्रसार माध्यम निर्माण केले तर, समाजातील घडामोडींवर त्या ठिकाणी चर्चा घडवून आणल्या जातात, आणि समाजाची सत्य परिस्थिती प्रसार माध्यमातून आपण समाजासमोर मांडू शकतो समाजातील अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी समाजाचा आवाज आपण सरकारपर्यंत पोहोचू शकतो. म्हणून जयंती कार्यक्रमाला जे आपण एकत्र येतो, एक होऊन पैसा गोळा करतो, तोच पैसा तीच एकी वर्षभर जर कायम ठेवली तर, शिक्षण, आरोग्य, पतसंस्था, रोजगार आणि प्रसार माध्यमे जर विकसित केले तर समाजाच्या अडीअडचणी दूर होऊन, समाजाचा एक प्रभावशाली दबाव सरकारवर निर्माण होईल. व यामुळे सरकारला समाज हिताविरोधात कोणतेही काम करण्याची हिम्मत होणार नाही. म्हणजेच संविधान वाचवण्यासाठी सुद्धा आपला हातभार लागेल समाजाची एकी म्हटल्यानंतर लोकशाही जिवंत ठेवण्यास सुद्धा आपला हातभार लागेल. या सर्व गोष्टी शक्य आहेत त्या फक्त आणि फक्त एकीमुळे संघटित राहिल्यामुळेच. म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी एक मोठा संदेश दिलेला आहे तो म्हणजे शिका, संघटित व्हा, आणि संघर्ष करा. या संदेशावर अंमल जरी केले तरीही समाजातील सामाजिक समस्या दूर करून संविधानाचे व लोकशाहीचे आणि संवर्धन करू शकतो हे नक्कीच. म्हणून जयंतीदिनी किंवा जयंतीनिमित्त जशी एकी आणि शक्ती निर्माण करतो व समाजाकडून पैसा गोळा करून मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्याचा प्रयत्न करतो, तर हेच सामाजिक काम वर्षभर जर केलेत तर समाजाचा विकास झाल्याशिवाय राहणार नाही. आणि खऱ्या अर्थाने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना तेच एक सर्वात मोठे अभिवादन असेल. वर्षभर जर आम्ही असे काम करून वेगवेगळ्या संस्था समाजाच्या नावे जर तयार केल्यात, समाजाच्या समस्या जर सोडवल्यात, तर जयंती साजरी करताना जो उत्साह, आनंद असेल तो कोणत्याही शब्दात मोजता येणार नाही. आणि म्हणून आता कृतीतून बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्याची वेळ आलेली आहे.

# आधार नोंदणीवर संच मान्यतेमुळे शिक्षक अतिरिक्त होतील..!



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांचे आधार नोंदणी आधारित संचमान्यता बंधनकारक केली आहे. मात्र, आधार नसलेल्या विद्यार्थ्यांची पटसंख्या गृहीत न धरता संच मान्यता केल्यास शिक्षकांची संख्या कमी होऊ शकते.राज्यातील अनेक प्राथमिक, मध्यामिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांची आधार नोंदणी सरल मध्ये झालेली नाहीत. आधार नोंदणी साठी शिक्षण विभागाने तारखा वाढवून दिल्या असल्या तरी अनेक विद्यार्थ्यां जवळ आधार कार्ड उपलब्ध नाही,ज्यांचे आहेत तर अपडेट नसल्याने सरल मध्ये नोंदणी करताना तांत्रिक अडचणी येत आहे परिणामी अनेक विद्यार्थी शिक्षणापासून व शिक्षण विभागाच्या विविध योजनांपासून वंचित राहू शकतात.**

त्यामुळे आधार नोंदणीवर संचमान्यता केल्यास अनेक शिक्षक अतिरिक्त होण्याची व अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतील. याचा शालेय शिक्षण विभागाने गांभीर्याने विचार करून ज्या विद्यार्थ्यांची नोंद सरल मध्ये झाली नसेल तरी त्यांचे प्रवेश ग्राह्य धरून संच मान्यता द्यावी. अनेक विद्यार्थी असे आहेत की ज्यांच्या जवळ आधार कार्ड नाही.फुटपाथवर जिवन जगणारे, डोंगराळ भागात राहणारे विद्यार्थीर् की ज्यांच्या जवळ आधार कार्ड नाही,मात्र त्यांचे प्रवेश शाळांमध्ये झालेले आहेत.यातील काहींचे प्रवेश झाले असलेतरी आधार कार्ड अपडेट नसल्याने सरल मध्ये नोंदणी होवूननहीं काही माहितीच्या अभावी व तांत्रिक कारणांमुळे सरल मध्ये मिस मॅच होत आहे. असे मिसमॅच विद्यार्थी धरले जाणार नसेल तर शिक्षक अतिरिक्त होतील.आधीच राज्यात अतिरिक्त शिक्षक आहेत.आता नवीन शिक्षण प्रणालीची अंमलबजावणी होत आहे,पुन्हा शिक्षक अतिरिक्त होण्याची भीती व्यक्त केली जात असतानाच आता परत एकदा आधार व्हॅलीडीटीवर संच मान्यता व शिक्षकांची पदे मंजूर होणार आहे.सरल प्रणाली नुसार संख्या जुळत नसेल तर वर्ग तुटणार व शिक्षक अतिरिक्त होणार म्हणजे शिक्षकांवर अतिरिक्त होण्याची टांगती तलवार लटकत असल्याने शिक्षक तणावाखाली आहेत.

राज्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांची आधार नोंदणी करण्याची मोहीम शिक्षण विभागाने हाती घेतली आहे. या आधार नोंदणीवर संच मान्यता केली जाणार आहे. परंतु, आधार नोंदणी करताना अनेक तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे .कधी नेटचा ,तर कधी साईड इफेक्ट्स मुळे विद्यार्थ्यांचा डाटा सेव्ह होत नाही.त्यामुळे सरल प्रणाली शिक्षकांसाठी ही मोठी डोकेदुखी ठरत आहे.

आधारकार्ड काढणे ही पालकांची जबाबदारी असताना शिक्षकांना त्यासाठी जबाबदार धरणात येत असून शिक्षक पदरमोड करत विद्यार्थ्यांचे आधारकार्ड काढत आहेत. यामुळे शाळा सोडून शिक्षकांना यासारखीच कामे करावी लागत असल्याने शिक्षण संवर्गातून मोठ्या प्रमाणावर संताप व्यक्त होत आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला मोफत शिक्षण देण्याची तरतूद शिक्षण हक्क कायद्याने केली आहे. शाळेत प्रवेश घेताना दाखला नसला तरी प्रवेश देण्याची तरतूद आहे, मात्र प्रवेश दिल्यानंतर आधारकार्ड सारख्या गोष्टींच्या आधारे विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे लाभ देणे सक्तीचे करण्यात आले आहे. तर आधारित संच मान्यता करण्याचा शासनाने प्रयत्न केल्यास शाळांना शिक्षक मिळण्यात अडचणी येणार आहेत. यामुळे शिक्षक वर्गातून नाराजी व्यक्त होत आहे.

सर्वोच्च न्यायालयाने WP (Civil) No 494/2012 या व इतर याचिकांमध्ये दिलेल्या निर्णयानुसार विद्यार्थ्यांना आधार नसल्यामुळे प्रवेशापासून वंचित ठेवता येणार नाही, असे स्पष्ट केले आहे. न्यायमूर्ती ए.के. शिकरी व न्यायमूर्ती ए. एम. खानविलकर यांच्या पीठाने याबाबतचा निर्णय दिला आहे. त्यामुळे आधार नसलेल्या विद्यार्थ्यांची पटसंख्या गृहीत न धरता संच मान्यता केल्यास सदर विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित करण्यात येईल. सदरची बाब ही शिक्षण हक्क कायद्याच्या व न्यायालयाच्या निर्णयाच्या विरुद्ध आहे. त्यामुळे आधार नोंदणी वरील संच मान्यतेचा निर्णय तात्काळ रद्द करावा, अशी शिक्षक संघटना करत आहे.

विद्यार्थ्यांना आधार मुळे प्रवेशापासून वंचित ठेवता येणार नाही, असा निर्णय न्यायालयाने दिला आहे. परंतु शालेय शिक्षण विभागाने आधार नोंदणीनुसारच संच मान्यता दिली जाईल, असे जाहीर केले आहे. मात्र, यामुळे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहिल्यास आणि शिक्षक अतिरिक्त झाल्यास आधार वरील संचमान्यतेला न्यायालयात आव्हान दिले पाहिजे. आधारशिवाय विद्यार्थ्यांना प्रवेश नाही

आधारशिवाय संच मान्यता दिली जाणार नसेल तर विद्यार्थी शाळेत दाखल करून संस्थेला त्याचा परिणाम सोसावा लागणार आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्याला लाभाच्या योजना देताना देखील आधार अनिवार्य करण्यात आले तर संबंधित विद्यार्थ्याला शासनाच्या योजनांचा लाभ मिळणार नाहीत हे बालकांच्या अधिकाराचे हणन आहे. बालकाच्या अधिकारासाठी कोणत्याहीप्रकारे आधारची सक्ती करण्याची गरज नाही. शिक्षणाचा अधिकार आहे त्यामुळे त्याला शिक्षणापासून वंचित ठेवता येणार नाही. ही बाब लक्षात घेता शासनाने वर्गातील विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षात घेऊन संच मान्यता द्यावी. शासनाने यासंदर्भात सकारात्मक भूमिका न घेतल्यास आधारशिवाय प्रवेशच नाहीत अशी भूमिका शाळांना घ्यावी लागेल. वंचित राहणाऱ्या विद्यार्थ्यांचा हक्क हिरावून घेतल्यास जबाबदारी शासनाची राहील.

अनेक ठिकाणी आणि विशेषतः ग्रामीण, आदिवासी, डोंगराळ क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे, फुटपाथावर राहणाऱ्या विद्यार्थ्या जवळ आधारकार्ड उपलब्ध नाहीत. अशा ठिकाणी पालकांना आधारकार्ड काढण्यास सांगितल्यास गरिबी दारिद्य्र यामुळे त्यांना शक्य होत नाही. प्रशासन सतत आदेश देऊन आधारकार्डची सक्ती करत असल्यामुळे शिक्षकांसमोर पर्याय उरत नाहीत. विद्यार्थ्यांना तालुक्याला घेऊन जाणे, तिथे आधार काढणे, त्यासाठी पैसा मोजणे या सर्व गोष्टींसाठी शिक्षक पदरमोड करत आहेत. त्यामुळे शिक्षक सतत तणावाखाली आहेत.

# मेक्सिको, बीजिंगनगरांना जल आणीबाणीचा धोका



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**पृथ्वीवर पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. दक्षिण आफ्रिकेची राजधानी केपटाऊन हे जल आणीबाणी घोषित करणारे जगातील पहिले शहर ठरले आहे. पाण्याअभावी येथे आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली आहे. जगातील पहिले पाणी नसलेले शहर बनले आहे. म्हणजेच येथे पाणी पूर्णपणे संपलेले आहे. सलग तीन वर्षांपासून शहराला दुष्काळाचा सामना करावा लागत आहे. नागरी प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे जलसंधारणही होऊ शकले नाही. झोपेतून जागे झालेल्या सरकारने येथे पाणी वाचवण्यासाठी अनेक पावले उचलली आहेत. पाणीपुरवठा योजनांच्या सुरक्षेसाठी लष्कर तैनात करण्यात आल्याची स्थिती आहे.**

केपटाऊनसारखी परिस्थिती केवळ आफ्रिकेतच नाही तर जगाच्या अनेक कानाकोपऱ्यात निर्माण होऊ शकते. जलसंधारणाबाबत आतापासूनच जागरूक होण्याची गरज आहे. केपटाऊनमध्ये अनेक हॉटेल्स, क्लब इत्यादींमधून नळ काढण्यात आले आहेत. याला पर्याय म्हणून सॅनिटायझरचा वापर करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. बागांमध्ये पाणी टाकण्यास, वाहनांची स्वच्छता करण्यास मनाई करण्यात आली आहे. पाण्याच्या अतिवापरासाठी दंड आकारले जात आहे. जितके जास्त पाणी वापरले तितके जास्त पैसे आकारले जातात. प्रति व्यक्ती प्रतिदिन 50 लिटर पाणी दिले जात आहे. जागतिक स्तरावर 3.6 अब्ज लोक म्हणजे जगातील निम्म्या लोकसंख्येला दरवर्षी एक महिन्यासाठी पाणी संकटाचा सामना करावा लागतो. 2050 पर्यंत पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या लोकांची संख्या 5.7 अब्जांपर्यंत पोहोचेल. एका शतकात पाण्याचा वापर सहापटीने वाढला आहे. केपटाऊनसारखी पॅरिस, बंगळुरू, बीजिंग, मेक्सिको अशा अनेक शहरांमधील जलसाठे संपुष्टात आले आहेत. बेंगळुरू, (भारत) - अनियोजित शहरीकरण आणि अतिक्रमणामुळे येथील जलसाठे 79 टक्क्यांनी कमी झाले आहेत. तर 1973 पासून शहराचा आकार 77 टक्क्यांनी वाढला आहे. दोन दशकांत पाण्याची पातळी 76-91 मीटरने खाली गेली. बीजिंग, (चीन) नकाशावर 200 नद्या आहेत पण सर्व कोरड्या आहेत. तीन दशकांपासून लोक भूजलाच्या आधारावर जगत आहेत. दरवर्षी एक मीटर या वेगाने भूजल कमी होत आहे आणि प्रदूषित होत आहे. मेक्सिको सिटी, (मेक्सिको) 700 वर्षांपूर्वी या शहराला 'नव्या जगाचे व्हेनिस' म्हटले जायचे.तरंगत्या बागा ही या ठिकाणची शान असायची. आता ना तलाव आहे ना पाणी. भूगर्भातील अतिदाबामुळे पाण्याची पातळी वर्षाला 40 सेमीने घसरत आहे. साना, (येमेन) - भूजलाचा शेवटचा थेंब शोषल्यानंतर, शहर इतर पर्यायांकडे पाहत आहे. शहर जलविरहित होईल, असा अंदाज आहे. नैरोबी, (केनिया) - पाण्यासाठी भूजलावर अवलंबून असलेले शहर. 75 टक्के लोक तिप्पट किमतीत पाणी विकत घेतात आणि पितात. इस्तंबूल, (तुर्की) - 2020 पर्यंत मागणी आणि पुरवठा यामध्ये 607 दशलक्ष घनमीटर पाण्याचे अंतर असू शकते. कराची, (पाकिस्तान) - शहराच्या केवळ 50 टक्के गरजांचा पुरवठा केला जातो. लोकसंख्या पाच टक्क्यांनी वाढत आहे. प्रदूषित पाण्यामुळे जलजन्य आजार वाढले आहेत.

पाण्याची टंचाई आपल्या देशाबरोबरच संपूर्ण जगाची समस्या बनली आहे.त्यामुळे आपल्याला घरातील वडिलधारी माणसे किंवा शाळेत पाठ्यपुस्तके, शिक्षक पाणी वाचवण्याचे फंडे सांगत असतात. टपकणारा नळ बंद कर, टाकीतील पाणी सांडू नकोस, यासारखे उपाय आपल्याला सांगितले जाते. आपल्याला लागेल तेवढेच पाणी ग्लासात घ्यायला किंवा पाणी घेण्यासाठी वगऱ्याळचा वापर करायला सांगितले जाते. जलसंरक्षणाचे हे प्रयत्न आवश्यकच आहेत. पण फक्त यामुळे जलसंकट हटणार नाही. आपल्या घरापर्यंत पाणी नदी,तलाव,कुपनलिका याद्वारे येत असते. जर यांचा जलस्तर कमी झाला तर मात्र तुम्ही घरात कितीही पाणी वाचवण्याचा प्रयत्न करा, शेवटी ते संपणारच! जर नदी,तलाव,जमिनीतीलच पाणी संपले तर काय? या गोष्टी गांभिर्याने लक्षात घेऊन काही देशांनी यावर जालीम उपाय शोधून काढले आहेत. यासाठी त्यांचा नव्या तंत्रज्ञानाचा वापर वाखाणण्यासारखा आहे.

आपल्याला माहित आहे, पृथ्वीचा 70 टक्के भाग हा पाण्याने व्यापलेला आहे. पण त्यातील फक्त तीन टक्के पाणी स्वच्छ आणि आपल्या वापरण्याजोगे आहे. स्वच्छ पाण्याच्या स्त्रोतांचा विचार केला तर पावसाचे पाणी हेच सर्वात स्वच्छ पाणी आहे.काही ठिकाणी हिमालयातील बर्फ वितळून पाणी उपलब्ध होते. जगभरात पेयजलचे संकट लक्षात घेता सऊदी अरब, इस्त्राईल, इराणसारखे देश जलसंरक्षणाचे हटके मॉडेल्सवर काम करीत आहेत.

सऊदी अरबमध्ये समुद्री पाण्याचे डिसॅलीनेशन

सऊदी अरब अनेक वर्षांपासून समुद्री पाण्याचे डिसॅलिनेशन ( अलवणीकरण ) द्वारे पाणी पिण्यालायक बनवत आहे. हा देश जगातला डिसेलायनेटेड वॉटरचा सर्वात मोठा उत्पादक देश आहे. महत्त्वाचे म्हणजे समुद्राचे खारे पाणी पिण्यालायक गोडे बनवताना ऊर्जा आणि आर्थिक यांचा मोठ्या प्रमाणात होणारा वापर लक्षात घेऊन सऊदी अरबने अलिकडेच सौर ऊर्जेवर चालणारे प्लांट बसवले आहेत. वाळवंटी प्रदेशाचा विस्तार लक्षात घेता सौर ऊर्जा इथे मुबलक प्रमाणात अनायसे उपलब्ध होते. जगातला सर्वात मोठा सौर ऊर्जेवर चालणारा डिसेलायनेटेड प्रकल्प अरब देशात आहे. हा प्रकल्प अल खाफजी शहरात असून 2019 पर्यंत संपूर्ण देशातले प्लांट सौर ऊर्जेने जोडण्याचा निश्चय केला आहे. इराणमधल्या मिलोंस बेटावर ज्वालामुखी आर्कच्या कारणामुळे भू-तापीय अक्षय ऊर्जा मोठ्या प्रमाणात मिळते. इथे मॅग्मा आसपासच्या मोठ्या दगडांना गरम करते. दगडांमध्ये निर्माण झालेले गरम पाणी जलवाहिन्यांद्वारा भूमिगत असलेल्या विहिरींमध्ये टाकले जाते.इथे त्याचे बाष्पात रुपांतर होते. त्यामुळे टर्बाइन सुरू होऊन ऊर्जा निर्माण होते. भू-तापीय ऊर्जाचा वापर समुद्राचे खारे पाणी गोड पाण्यात परावर्तित केले जाते. याचा उपयोग सिंचनासाठी आणि पिण्यासाठी केला जातो. यामुळे इराणमधील ही नवी जियोथर्मल डिसेलायनेटेड योजना एक आदर्श योजना म्हणून जगभरात नावाजलेली आहे.

युनायटेड किंगडम स्मार्ट वॉटर मिटरिंग टेक्नॉलॉजीचा वापर करत आहे. यामुळे इथल्या रहिवाशांना पाण्याच्या वापराविषयीची माहिती ऑनलाइन मिळते. या माहितीच्या आधारावर इथल्या लोकांना पाण्याच्या वापराबाबत खबरदारी घेता येते. लक्ष ठेवता येते. या स्मार्ट मीटरमुळे पाण्याबाबतची अगदी सुक्ष्म माहिती उपलब्ध होते. पाण्याचा वापर कसा आणि किती केला जात आहे. पाण्याचा वापर वाढला आहे का? त्याचबरोबर जलसंरक्षणाबाबत उपायदेखील सांगितले जातात. या सगळ्या गोष्टी वापरकर्त्यांना जाग्यावर ऑनलाइन समजून येतात. शिवाय पाणी संरक्षणासाठी त्यांना प्रोत्साहितही केले जाते. 2030 पर्यंत देशातल्या प्रत्येक घरात हे स्मार्ट मीटर बसवण्यात येणार आहे.

अमेरिकेतील कॅलिफोर्निया पुन्हा एकदा ऐतिहासिक दुष्काळाच्या तावडीत सापडला होता. त्यामुळे या प्रदेशाला वेस्टर्न हेमिस्फेयरच्या सर्वात मोठ्या डिसेलायनेटेड संयंत्र बसवण्यास भाग पडले. हे संयंत्र 10 मैलापर्यंत पाण्याची डिलिवरी जलवाहिनीच्यामाध्यमातून करते. हे संयंत्र रोज 50 दशलक्ष गॅलन समुद्री जलाचे स्वच्छ आणि गोड पाण्यात रुपांतर करते. कॅलिफोर्नियातील ही योजना जगातील सर्वात प्रगत योजनांपैकी एक आहे.

इस्त्राइल नेहमीच जलसंरक्षणाच्याबाबतीत सर्वात पुढे राहिला आहे. याला कारण म्हणजे येथील वाळवंटी प्रदेश! पण आज स्वच्छ पाण्याची गरज लक्षात घेता जवळपास 85 टक्के अशुद्ध पाणी शुद्ध करून पिण्यायोग्य बनवले जात आहे. हे तंत्रज्ञान इस्त्राइल अन्य देशांना विकून मोठ्या प्रमाणात आर्थिक लाभ उठवत आहे. इस्त्राइलचा अंदाज असा आहे की, 2020 पर्यंत त्यांच्या कृषी क्षेत्राला लागणारी 50 टक्के आर्थिक मदत फक्त पाण्याच्या रिसायक्लिंगच्या माध्यमातून मिळून जाईल. इस्त्राइलने असे तंत्रज्ञान शोधले आहे की, सगळ्यात घाण पाणी किंवा कसले तरी खारे पाणी असू दे,त्याचे पिण्यायोग्य पाण्यात रुपांतर करण्याची क्षमता आहे.विशेष म्हणजे हा देश दुसऱ्या देशांनादेखील पाण्याची निर्यात करतो.

आगामी काळात पाण्याचे वाढते संकट लक्षात घेऊन आपल्याही देशाला अशा तंत्रज्ञानाचा वापर करावा लागणार आहे. समुद्राचे खारे पाणी गोड करण्याचे संयंत्र बसवण्याचे काम आपल्या देशातही मोठ्या वेगाने सुरू आहे. समुद्र किनारी असलेल्या शहरांमध्ये यावर सध्या काम सुरू आहे. मात्र आपल्याकडे मिळणाऱ्या पावसाचे पाणी जिरवण्यावर अधिक भर द्यावा लागणार आहे.यासाठी अधिक आणि वेगाने काम करावे लागणार आहे.जलयुक्त शिवारसारखे प्रयोग महाराष्ट्रात राबवले जात आहेत. त्याला यहशी मिळत आहे,पण यातही अजून फार मोठे काम करावे लागणार आहे. शासनाचा सहभाग आणि लोकांचा सहभाग यातून फार मोठे काम होऊ शकेल,यासाठी शासन पातळीवर मोठे काम हाती घेण्याची आवश्यकता आहे.



## || जय भीम बोला ||

बांधवांचे हातं, केले बळकट
व्हारे म्हणी धीट, आतातरी ||

किती काळ असे, वाहणार बोजे
वर्णत्वाचे ओझे, डोईवरी ||

एक मोट बांधा, व्हारे एक मोळी
याचनेची झोळी, फेकूनी द्या ||

विद्येचे ते बोट, धरा तुम्ही हाती
अंधत्वाच्या काती, दूर सारा ||

पंचशील तत्वे, करा अंगीकार
मनी काय घोर, बाळगीता ||

संविधान दिले, तुम्हा हाती अस्त्र
कायद्याचे शास्त्र, तुम्ही जाणा ||

एकीनेच चढा, सत्तेची पायरी
हक्काची सोयरी, तीच आहे ||

एक एक मत, त्याचे मूल्य जाणा
प्रसंगी तो मेना, खाली खेचा ||

ममत्वाचा त्याग, केला
तुम्हासाठी
जीवाची कसोटी, लाविली मी ||

हटू नका मागे, पुढे पुढे चला
जय भीम बोला, बाबासाब ||

-भानुदास धोत्रे
परभणी
7972625086

## भाकरी

नको माथी नटवे आकाश
नको रम्य ताऱ्यांची ओसरी
शोधीत फिरतेय गुलाम भूक
चंद्रात माझ्या भाकरी...

बिलगली इथे गोर गरिबी
म्हणून सौंदर्य चंद्र विक्री
विझविण्यास पोट अग्नी
वासनेच्या चुलीवर भाकरी...

कुणी तुच्छ म्हणून हिणवी
नाचगाणी झाली मजबुरी
ओवाळल्या रुपड्यावरी
शेकते रोज माझी भाकरी...

चोळीपल्याडचा निशाणा
जातो रोज आरपार जहरी
घुसळून कोमल काया
मुखी पदरातली भाकरी...

ओहोटी कशी कधी.. ? हो
वखवखलेल्या सागर लहरी
सन्मानपूर्वक मिळेल केंव्हा
मज ताटातली भाकरी...

कल्पना म्हापूसकर



## तेच असे मम कोकण सुंदर !!

पश्चिमेला अथांग सागर,
निसर्ग शोभा अतीव सुंदर,
बाग फुलांचे फुलती मनोहर,
जेथ होती मम भाव अनावर,
तेच असे मम कोकण सुंदर ||१||
सिंधु किनारी धीवर वसती,
मत्स्य पकडुनि अमाप आणती,
कष्टांची त्या नाही गणती ,
निर्मल ज्यांचे असते अंतर,
तेच असे मम कोकण सुंदर ||२ ||
सभोवताली वाड्या वसती,
भूमिपुत्र हे तेथे श्रमती,
गाळुनिया घामाचे मोती,
बहरे सुपिक पिकांनी परिसर,
तेच असे मम कोकण सुंदर ||३||
ताड ,माड ,पोफळी सभोवती,
नारळी बागा बहु शोभती ,
हे आंबे, फणस तर झाडागणती,
असती कोकम चविष्ट सुमधुर,
तेच असे मम कोकण सुंदर ||४||
मानवी बोल भासती परखड,
जशी दिसे फणसाची फोड,
भासती कठोर परि अंतरी गोड,
साधी भोळी जणु मायेचा सागर,
तेच असे मम कोकण सुंदर ||५||
अनुराधा भोगले
बोरीवली.. मुंबई...



## या सावल्या दुपारी...

गेल्या रुसून येथे या सावल्या दुपारी
पायात थांबलेल्या या सावल्या दुपारी

जाता वरात त्याची माथ्यावरून जेव्हा
लाडात पांगलेल्या या सावल्या दुपारी

घाटात थांबलेली झाडे उभी दमाने,
रस्त्यात गोंदलेल्या या सावल्या दुपारी.

तोडीत माणसांनी केली उजाड राने,
तेथे अनाथ झाल्या या सावल्या दुपारी.

पाऊस येत नाही गेली सुकून झाडे,
ढाळीत नेत्र गेल्या या सावल्या दुपारी.

ओसाड वाळवंटी जावे कुठे कळेना,
वाळूत दग्ध झाल्या या सावल्या
दुपारी.

मोहात पाडणाऱ्या सूर्यास भेटताना,
पोळून पेटलेल्या या सावल्या दुपारी.

- संजय बिडगर, नाशिक

## संजीवन

आई बापाविना जगी
कोण पुसतो जीवन ?
अनमोल जीवनात
मंत्र रुपी संजीवन...

आयुष्याच्या रंगमंची
तेच दाखवती वाट
प्रेम भरल्या डोळ्यांनी
सजवती गोड थाट...

त्यांच्याविना आयुष्यात
थोडा ना उरतो राम
तुम्ही जरी जीवनात
किती मोजलेत दाम ?..

त्यांच्याविना मानवाला
वाटे जीवन भकास
निराधार जीवनात
कसा कराल विकास ?..

तेच मौलिक विसावा
देई विचार नितळ
वेल गगनी भिडेल
जपे जीवन निर्मळ...

अनमोल ज्ञानपीठ
माया ममता सागर
विद्यादान विश्वासाने
भरे प्रेमाची घागर...

अनोळख्या जगतात
तेच विठ्ठल रखुमा
आयुष्यात प्रत्येकाने
जाणा प्रेमाने महिमा...

- सौ. प्रतिमा अरुण
काळे
निगडी प्राधिकरण पुणे,
४४

## स्वत:ला ओळख

स्वतःला ओळखून बघ
तुझ्यात सर्व काही आहे
इकडे, तिकडे शोधू नको
तुझ्यापाशी वेळ कमी आहे

तुझ्यात कलागुण आहेत
त्यांना ओळख आतातरी
धावू नको कोणाच्या मागे
संघर्ष करुन पोहोच शिखरावरी

तू सुशिक्षित आहेस
तू सर्वगुणसंपन्न आहेस
तू मेहनती, कष्टाळू आहेस
तू तर..हिंमतवान आहेस

स्वतःला ओळखल्या शिवाय
जगात तुझी ओळख होणार
नाही
तिथेच राहशील कायमचा
अशाही जगण्याला अर्थ नाही

वेळ वाया घालवू नको रे,
ओळख आतातरी स्वतः ला
संधीचे सोने करण्यासाठी
आतातरी लाग कामाला

- सौ.संगीता संतोष ठलाल
मु.कुरखेडा जि.गडचिरोली
७८२१८१६४८५



## श्रावण

मोती बरसत येतो श्रावण
वाजतगाजत येतो श्रावण
लाजत मुरडत येतो श्रावण.
निळसर डोंगर माथ्यावरही
मोती बरसत येतो श्रावण.
शेती माती अन दगडांशी
गप्पा मारत येतो श्रावण.
कडकड चपला मेघांसोबत
वरती गर्जत येतो श्रावण.
ओढे, नाले, भरतो धरणे
भरभर सरकत येतो श्रावण.
अवखळ वाऱ्यावर पक्ष्यांची
जिंकत शर्यत येतो श्रावण.
गल्ली, वाडे, गावांमधुनी
फिरकत फिरकत येतो
श्रावण.
रस्त्याकाठी बांधावरही
झाडे लावत येतो श्रावण.
गातो श्रावण, न्हातो श्रावण
तनमन भिजवत येतो
श्रावण.
® रज्जाकभाई शेख
9665778558

## लेक...

लेक मायेचा गं धागा,
लेक जिव्हाळ्याची जागा...
लेक दुसरी गं माय,
जणू दुधावरी साय...
लेक स्वप्नांचे गं गीत,
लेक लडिवाळ प्रीत...
लेक झाड आनंदाचे,
जणू सूर चैतन्याचे...
लेक वेल गं जाईची,
लेक ओढ गं आईची...
लेक इवली पणती,
जपे जिव्हाळ्याने नाती...

लेक उबदार शालं,
लेक संसाराची ढालं...
लेक शितल गं छाया,
जणू आतूरली माया...
लेक होऊन बहीण,
कधी जपते भावाला...
कधी होऊन वहिनी,
देते आसरा जीवाला...
साऱ्या लेकींना गं माझे,
गुज हेच मी सांगणे...
माय- बापाला स्मरून,
तुमचे असावे वागणे...

चार डोळ्यांच्या स्वप्नांची,
लेकी असतात ज्योती...
माता- पित्यांच्या नावाची,
होऊ नये अपकीर्ती...
तिच्या कर्तुत्वाचे गीत,
ज्याच्या -त्याच्या यावे
ओठी...
अन् वाटू नये कुणां,
लेक नको माझ्या पोटी...
लेक नको माझ्या पोटी...
-सौ. शारदा वानखेडे
चोपडे,.९८२३०६६६०६

## उन्हाळा

आला उन्हाळा उन्हाळा
मुलं झाडाखाली गोळा
झाड देते सावली
सोसूनी उन्हाच्या कळा
आला उन्हाळा उन्हाळा
नाही आता शाळा
ना गुरुजींची शिक्षा
ना पाटी, पुस्तक, फळा
आला उन्हाळा उन्हाळा
आईस्क्रीमवर सदा डोळा
येता जाता कैऱ्या खाऊनी
बसेल मग गळा
आला उन्हाळा उन्हाळा
मामाच्या गावाला पळा
चिरेबंदी वाड्यात
लपंडाव खेळा
आला उन्हाळा उन्हाळा
गोष्टींची पुस्तके करा गोळा
अंगत पंगत खेळूनी
पार पाडा सोहळा
- रविंद्र व्ही. चालीकवार
मु.पो.ता.महागाव जि.यवतमाळ
मो.9011559106

## माझे आजोळ ...!

उन्हाळ्याच्या सुट्टयात
गावाकडे आजोळी जातो,
चिरेबंदी वाडा पाहून
मनाला आनंद होतो.


नाही तिथे पुस्तक
नाही तिथे धडा,
लपाछपी खेळण्यास
मामाचा चिरेबंदी वाडा.

पुरणाच्या पोळीवर
साजुक तुपाची धार,
मामा खूप मायाळू
मामी सुगरण हुषार.

रात्रीला अंगणात
गोष्टीना येतो महापूर,
आजीजवळ गोष्टीचा
खजिना आहे भरपूर.

जीवाभावाचा मामा
जीव लावी आम्हावरी,
असे माझे आजोळ
न वाटते जावे घरी.

- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण.
मो. ९७६४३५०३७४



## मनवेलीवरची कळी

निस्तब्ध पहुडलेल्या त्या
एका
शांत स्तब्ध अशा वेळी,
मन वेलीवर डोकावणारी
ती नाजूक शी कळी,
अंतरी साचलेला दिव्य गंध
नकळे नकळत बहरतो,
विचार दवबिंदू अलगद
त्यावरी विसावतो.
तुषार एक तो नाजूक
पाकळी पाकळी
फुलवितो,
उत्कंठतेचे अन् अपुर्वाईचे
अत्युच्च शिखर
खुलवितो.
नि मग..
भारलेल्या त्या शांत वेळी
उमलते हळूवार ती कळी,
निसर्गाची एक सुंदर अशी
कलाकृती एक
आगळवेगळी.

©सौ. वैशाली महाडिक.
मोबा. -९७६७४३७९२३

## आधार काठी आयुष्याची

भरवसा नसलेल्या आयुष्याची
चिंता कशाला करायंची
आजचा दिवस मजेत जगांचा
उद्याची स्वप्ने कशाला बघायची...
हवा येते निघून जाते
जीवनाचेही तसेच आहे
जे आपल्या हातातच नाही
त्याची चिंता कशाला करायची...
धन दौलत पैसा माडी
गाडी इथेच सोडून जायची
स्वतः उपाशी राहून जिंदगी
दुसऱ्यासाठी कशाला जगायची...
काटकसर करून आयुष्यात
जगायचं शेवटी कुणासाठी
वृद्धाश्रमात जगावं लागतं
माती करुनही आयुष्याची...
सग्गे सोयरे नाती गोती
म्हातारपणी विसरून जातात
अर्धांगीणी शेवटी असते
आधार काठी आयुष्याची...
प्रा.डॉ.अभिमन्यू गवई
मो.न. 9860283241

# मुख्यमंत्री शिंदेंकडून शीतल गादेकर आत्महत्येची दखल

## धुळे पोलीस अधीक्षकांसह कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल होणार ?

आधुनिक केसरी न्यूज

**किरणकुमार आवारे**

**निफाड :** धुळे येथील औद्योगिक वसाहतीतील प्लॉट



बळकावल्याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांनी तक्रारीची दखल न घेतल्याने दि.२७ मार्च रोजी शितल रवींद्र गादेकर यांनी मंत्रालयासमोर विष प्राशन केले होते. दुर्दैवाने दि.२८ मार्च रोजी त्यांचा मृत्यू झाला होता.

अंनिसच्या नाशिक शहराध्यक्ष व मृत शितल यांची बहीण कोमल दीपक वर्दे, भटके विमुक्त हक्क परिषदेचे मा.धनंजय ओंबासे, प्रतीक गोसावी यांच्यासह जे.जे.रुग्णालय गाठले असता पोलीस अधीकारी मरीन ड्राइव्ह, भायखळा पोलीस स्टेशन हे सर्व पोलीस फौजफाटा घेऊन शव ताब्यात घेण्यासाठी दबाव टाकत होते. मात्र घटना मंत्रालयासमोर घडली असल्याने मुख्यमंत्री स्वतः येत नाहीत तोपर्यंत शव ताब्यात घेणार नाही अशी ठाम भूमिका कोमल वर्दे यांनी घेतली. धनंजय ओंबासे यांनी दूरध्वनी वरून मुख्यमंत्री मा.शिंदे यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी सदर घटनेबद्दल दुःख व्यक्त करत सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले व तात्काळ मा.मुख्यमंत्र्यांचे प्रतिनिधी म्हणुन घटनास्थळी मा.आमदार यामिनीताई जाधव व त्यांचे पती मा.यशवंत जाधव पोहोचले. त्यांनी मुख्य आरोपी नरेश मुनोत यांच्यावर मुंबई वरुन संबंधित पोलिस अधिकारी यांस फोन करून गुन्हा दाखल करण्यास भाग पाडले. शितल गादेकर यांच्या तीन मुलांची जबाबदारी पूर्णपणे मा.मुख्यमंत्री साहेब व आम्ही घेणार आहोत व लवकरच मा.मुख्यमंत्री तुम्हाला भेट देतील असे आश्वासन दिले. त्यानंतर मा.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धनंजय ओंबासे यांना चार वेळा फोन करून या घटनेचा मागोवा घेतला. त्यानंतर दि.१२ एप्रिल २०२३ रोजी सखाराम धुमाळ, प्रतिक गोसावी, कोमल वर्दे, इंगोले, प्रथमेश वर्दे, प्रणव गादेकर यांच्या शिष्टमंडळाने मा.मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. मा.मुख्यमंत्र्यांनी शितल गादेकर यांच्या मुलाला शासकीय सेवेत सामावून घेणे, शासकीय मदत तसेच घर देण्याचे आश्वासन दिले.



शिष्टमंडळाने धुळे येथील औद्योगिक वसाहत भागातील ज्या प्लॉट साठी तिचा जीव गेला तो प्लॉट, तिच्या तक्रारीची दखल न घेणारे औद्योगिक वसाहत अधिकारी, पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, सहा. अधीक्षक किशोर काळे, पोलीस उपअधीक्षक ऋषिकेश रेड्डी, मोहाडीचे पोलीस निरीक्षक भूषण कोते व मुख्य आरोपी नरेश मुनोत या सर्वांवर कलम ३०६ अन्वये मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून शासकीय अधिकाऱ्यांना निलंबित करा ही मागणी केली असता मुख्यमंत्री मा.एकनाथ शिंदे यांनी तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश दिले.

मयत शितल गादेकर यांचे पती रवींद्र गादेकर यांचे नावे धुळे औद्योगिक वसाहतीत प्लॉट आहे. सन २०१० मध्ये तत्कालीन औद्योगिक वसाहत अधिकाऱ्यांनी संगनमत करीत खोटी नोटरी करून प्लॉट नरेश कुमार, मानकचंद मुनोत यांच्या नावावर केला. औद्योगिक वसाहत अधिकारी यांनी खरेदी खत न करता १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर बनावट सह्या करून रवींद्र गादेकर यांच्या छायाचित्राचा गैरवापर केला अशी महिलेची तक्रार होती. यासाठी २०२० पासून त्यांचा पाठपुरावा सुरू होता. त्यांनी मुख्यमंत्री मा.उद्धव ठाकरे, उद्योगमंत्री सुभाष देसाई, माजी मुख्य सचिव, प्रधान सचिव, पोलीस महासंचालक, पोलीस महानिरीक्षक तसेच स्थानिक पोलीस अधिकारी यांचेकडे तक्रार केली होती. मात्र दखल न घेतली गेल्याने त्यांनी २७ मार्च २०२३ रोजी मंत्रालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा दिला होता. मात्र त्याचीही दखल न घेतली गेल्याने त्यांनी मंत्रालयासमोरच विष प्राशन केले त्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

# पिंपरखेड येथे भाजप नेत्या पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते लवकरच होणार वारकरी भवनाचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज



**रामदास पटेकर**

**अंबड :** लोकनेते गोपीनाथ मुंडे हे आमचे प्रेणास्थान आहेत.राजकारणात समाजकरण कसे करावे, हे त्यांच्या कार्याकडे पाहून कळते. राजकारणाला अध्यात्माची जोड देऊन त्यांनी लोकल्याणकारी कामे होती आहेत. पिंपरखेड हे अतिशय धार्मिक गाव आहे. या परिसरात वारकरी मोठ्या संख्येने आहेत. त्यामुळे वारकऱ्यांसाठी भाजपा नेत्या पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते लवकरच वारकरी भवनाचे भूमिपूजन करण्यात येईल,असे आश्वासन समृद्धी शुगरचे चेअरमन तसेच भाजपा नेते सतीश घाटगे हे घनसावंगी तालुक्यातील पिंपरखेड येथील शेतकरी मेळावा तसेच भारतीय जनता पक्षाच्या शाखा उद्घाटन प्रसंगी बोलत होते. यावेळी भाजप नेते विश्वजित खरात,शिवाजी बोबडे,अंकुश बोबडे,अशोक जाधव,डॉ. रमेश तारगे,म्हेत्रे ताई,योगेश देशमुख,राहुल कनके,शिवाजी कंटुले,अमोल तोर,आर.व्हीं. छल्लारे,गणेश पघळ,बालाजी खोजे,विलास होंडे,महादेव टेहळे, वसंत खोजे,अरुण घुगे,प्रणित हर्षे यांच्यासह आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना घाटगे म्हणाले की,जे उसाचे राजकारण करत होते. त्यांचे उसाचे राजकारण संपत आले आहे.राजकारणापेक्षा समाजकारण महत्त्वाचे आहे.सत्तेसाठी राजकारणात आलो नाही. लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या विचाराने प्रभावित होऊन राजकारणात आलो आहे. शेतकऱ्यांचे सर्व प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करत आहे. शेतकऱ्यांनी उसाची लागवड करावी,ऊस नेण्याची जबाबदारी आमची आहे.

शेतकरी हा आमच्यासाठी विठ्ठल आहे. शेतकऱ्यांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. तो जे पीकविल तेच आम्हाला खायला मिळेल. तसेच गावाचा विकास करणे आवश्यक आहे. गावातील तरुणांना रोजगार उपलब्ध करून देणे, ही राजकारण्यांची मुख्य जबाबदारी असते.पण आज इतके दिवस सत्तेत असणाऱ्या लोकांनी कोणता एखादा प्रकल्प आणून रोजगारनिर्मिती केली का ? असाही प्रश्न याठिकाणी पडतो,असे ते म्हणाले. यावेळी विजय भांगे यांची ओबीसी जिल्हा चिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवाजी मिसाळ व भांगे नाना यांनी केले.या शाखा उद्घाटन प्रसंगी गावातील विद्यमान उपसरपंच,ग्रामपंचायत सदस्य यांच्यासह अनेकांनी भाजपामध्ये जाहिर प्रवेश केला. यावेळी रामेश्वर गरड,भगवान तोर,सुदर्शन राऊत,सचिन काळे,वाल्मीक अनापट,संभाजी भालशंकर,विठ्ठल खोजे,आकाश मिंधर,अंबादास गोरे,विठ्ठल खोजे,अक्षय खोजे,गणेश खोजे यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# वाशी शहरात "मटका बाजार फुलला तर गुटखा" वधारला, सद् रक्षणाय खल निग्रहणाय नावालाच....!

## शाळकरी मुलांवर होतोय परिणाम..!

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** जिल्ह्यातील वाशी शहरामध्ये अवैध धंद्याने चांगलाच धमकूळ घातला आहे.

वाशी शहरामध्ये अवैध धंद्यांना चांगलीच बरकत आली असून जागोजागी कोणाच्या आशीर्वादाने मटका चालविला जात आहे. हे मात्र शहरातील जनतेला कळायला मार्गे नाही. मागील महिन्यात एक_दोन मटका एजंट वर पोलीस प्रशासनाकडून दिखाव्यापूर्ती मार्च अखेर साठी कार्यवाही करण्यात आली होती.

आता पुन्हा शहरातील वरदळीच्या रस्त्यावर मटक्यांच्या पाट्या लावूनच मटक्याचा व्यवसाय सुरू आहे. रस्त्यावरून जाणारे शाळकरी मुले घरी जाऊन आई-वडिलांना विचारना करतात की, रस्त्यावरील दुकानांमध्ये त्या पाटीवर कसले गणित रोज लिहली जातात ? या प्रश्नांचे काय उत्तर द्यावा हा प्रश्न पालकांना कायम भेडसावत आहे.

शहरातील काही ठिकाणी पोस्ट ऑफिस परिसर, पारा चौक, शिवाजी चौक, लक्ष्मी रोड, वर्तक चौक चोहीकडे कल्याण, मिलन डे, मिलन नाईट, मुंबई आशा वेगवेगळ्या प्रकारचा मटका फोन वर व हिंडता फिरता टपरी मध्ये पाटीवर लावून सर्रास घेणे सुरू होते. सध्या तर शहरामध्ये ठिकठिकाणी मटका घेणाऱ्या एजंटच्या खुलेआम बुक्या सुरू आहेत. पोलीस प्रशासनाला याचा थांग पत्ता कसा लागत नाही,की सगळं बंद पकिटाचा खेळ आहे.याबाबतही उलट सुलट चर्चा वाशी नागरिकांमध्ये सुरू असते. सर्वच ठिकाणी आकडे लावल्याचा चिठ्या दिल्या जात आहेत. जागोजागी मटक्याच्या बुक्या राजरोसपणे चालू आहेत. त्यामुळे तरुण पिढी ही याकडे पैशाच्या लालसेपायी आकर्षित होत चालली आहेत.तसेच शेतकरी व शेतमजुरांना मिळणारा पैसा हा त्यांच्या घरी न जाता सर्व पैसा या मटक्याच्या आकड्यावर लावून शेतकरी व शेत मजूर बरबाद होत आहेत.त्यांच्या परिवारावर उपासमारीची वेळ येत आहे.

तर पर राज्यातून येणारा गुटखा यावर सहाय्यक पोलीस अधीक्षक एम रमेश यांनी उगारलेला कारवाईचा बडगा त्यामुळे धाराशिव जिल्ह्यात अनेक ठिकाणी गुटखा विक्री चांगलाच लगाम लागला आहे.

मात्र वाशी शहरात खुलेआम विकला जाणारा जाणारा गुटखा जिल्ह्यात इतर ठिकाणी झालेली कारवाई त्यामुळे जास्त आकारणी करत विकला जात आहे.

याकडे गांभीर्याने लक्ष देऊन वाशी शहरात जागोजागी खुलेआम चालू असलेला मटका व गुटखा बंद करून संबंधित मटका मालकावर व मटका घेणाऱ्या एजंट वर तसेच गुटखा विक्री पाठबळ देणाऱ्या एजंट वर त्वरित कडक कारवाई करावी व अवैधरित्या होत असलेली गुटखा विक्रीवर सहाय्यक पोलीस अधीक्षक एम रमेश यांनी तात्काळ कारवाई करावी अशी मागणी वाशी शहरातील सर्वसामान्य जनतेकडून वारंवार होत आहे.

जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक कुलकर्णी साहेब, यांनी जसे विशिष्ट समाजाला त्यांच्या वाड्या वस्तीवर जाऊन भेटी घेऊन गुन्हेगारी पासून दूर राहण्यासाठी समुपदेशन करत आहेत. त्याचप्रकारे वाशी पोलीस प्रशासनाने गुटक्यासारखे व मटक्यासारखे अवैध धंदे चालवणाऱ्या विशिष्ट समाजातील मुलांना त्यापासून रोखण्यासाठी समुपदेशित करावे.

## लय भारी सुगरण



सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.
संपर्क क्र. 9503434424

### खरबुजशेक

आधुनिक केसरी



तुम्ही म्हणाल आम्ही आपलं लाईक कमेंट करतो म्हणजे हि माहिती असणारीच रेसिपी शेअर करते पण आज जरा गडबड झाली... त्यात घरात पाहूणे....चैत्रगौरीचे हळदीकुंकू आज बऱ्याच मैत्रिणीकडे असल्यामुळे वेगळी रेसिपी करता आली नाही. पण रोजचा शिरस्ता मोडला जाईल म्हणून खरबूज शेक....घरात खरबूज होतेच.... पण तयारीचा फोटो काढलाच नाही गडबडीत सध्या खरबुज, कलिंगड यांनी बाजार फुलला आहे. फोडी चिरून खाण्यात मजा येते. पण काही तरी वेगळे करून खायला सगळ्यांना आवडतेच. उन्हाळ्यात शेक, लस्सी, आईसक्रीम, मिल्कशेक, सरबत करतोच. आज खरबूज शेक करून बघू.

साहित्य :

एक वाटीभर धूवून बारीक चिरलेल्या खरबुजाच्या फोडी, मीठ, साखर, मिरे, पाणी दूध इत्यादी.

कृती :

मिक्सरमध्ये घेवून त्यात दोन मिरे , चवीनुसार मीठ साखर घालून बारीक वाटून घ्या . आवडीप्रमाणे दूध किंवा पाणी घालून परत फिरवले. बर्फाचे दोन ते क्युब घालून थंडगार सर्व्ह करा . खरबुज शेक तयार.

### लेमनस्क्वॅश

एक मोठं रसरशीत लिंबू,एक वाटी साखर, पाणी,पिवळा / केशरी रंग, वेलदोड्याची पूड, भिजवलेले सब्जा बी, मीठ. कृती : एका पातेल्यात साखर बुडेल इतपत पाणी घालून मिश्रण उकळा. सव्वा तारी पाक तयार झाल्यावर त्यात, चवीनुसार मीठ, वेलदोड्याची पूड व पिवळा किंवा केशरी रंग घालून ढवळा व गॅस बंद करा. पाक थंड झाल्यावर लिंबाचा रस काढून यात मिसळा. बाटलीला घट्ट झाकण लावून फ्रिजमध्ये ठेवून द्या. सर्व्ह करताना --



एका ग्लासात पाणी व बर्फ टाका थोडा स्क्वॅश सब्जा बी , किंचित आले किसून तयार मिसळून सर्व्ह करा. ( टिप : लिंबाचा रस आधीपासून काढून ठेवल्यास कडवट होतो, तेव्हा ऐनवेळी टाकून मिसळा ).

# विना सिम चार्जिंग लावून, सोन्याच्या दुकानात चोरी; गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शहरातील सोनार गल्लीत असलेल्या वर्मा ज्वेलर्समध्ये एक व्यक्ती सोने खरेदीसाठी आला. साधा मोबाइल सोने दुकानात चार्जिंगसाठी लावून दुचाकी रस्त्यात लावली व थोडी बाजूला घेतो म्हणत दुकानाबाहेर पडून हातातील पंचावन्न हजार रुपये किमतीचे सोने घेऊन फरार झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी हरिश प्रकाश वर्मा यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोराविरुद्ध फुलंब्री पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोनार गल्ली येथे सोन्या-चांदीचे दुकान असून या दुकानात एक जण सोने खरेदी करण्यासाठी आला. माझा मोबाइल चार्जिंगला लावा म्हणत सोन्याचे दागिने पाहणे सुरू केले. त्यानंतर त्याने सोने हातात घेऊन पाहत असतानाच गाडी काम रस्त्यावर उभी असून ती बाजूला घेतो म्हणत साम दुकानाबाहेर पडला.



आपली दुचाकी काढून राब पोबारा केला. दुकानदाराला वाटले की हा अ गाडी बाजूला करून लगेच दुकानात येईल. आ त्याचा मोबाइलही दुकानात आहे, परंतु सदरील व्यक्तीची बाहेर जाऊन पाहणी केली क असता तो फरार झाल्याचे दिसून आले. त्यानंतर संबंधित दुकानदाराने त्याने चार्जिंगला लावलेल्या साध्या मोबाइलची तपासणी केली असता त्यात कोणत्याही प्रकारचे सिम कार्ड दिसून आले नाही. हरिश प्रकाश वर्मा यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तत्काळ फुलंब्री पोलिस ठाणे गाठून अज्ञात चोराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# आता तरी तुमच्या सेवेची संधी द्या...!

## भोकर बाजार समिती निवडणूक; मतदारांची मनधरणी

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** येथील डॉ. शंकरराव चव्हाण कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक जाहीर झाल्याने सर्वच राजकीय पक्षांनी कान टवकारले आहेत. गूरूवारी(ता.२०) अर्ज माघार घेण्यात येणार आहेत. दरम्यान अनेकांची "मनधरणी" करून विजयाचा मार्ग मोकळा करण्यासाठी "गोंजारले "जात असताना उमेदवारीवर शिक्का मोर्तब होण्या आधीच ऊत्साहि कार्यकर्ते प्रचारात गूंतल्याचे दिसून येत आहे."आतातरी तुमच्या सेवेची संधी द्या.." अशी विनवणी करीत आहेत.आगामी निवडणुकीची हि रंगीत तालीम असल्याने सर्वच पक्षांनी निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे.

मागील वर्षांपासून रखडलेली बाजार समितीची निवडणूक ऊशिरा का होईना जाहीर करण्यात आली आहे. भोकर विधानसभा मतदारसंघ हा माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचा मतदारसंघ असल्याने पूर्वी बाजार समितीवर काँग्रेसची एकहाती सत्ता होती. तर भाजपा व शिवसेनेनी खाते खोलले होते.कार्यकाळ संपल्याने निवडणुका होणार म्हणून सर्वच राजकीय पक्षांनी 'लंगोट "बांधली होती दरम्यान शासनाने समितीवर प्रशासक नियूक्ती केल्याने कार्यकर्त्यांचा हिरमोड झाला.



निवडणुक कधी जाहीर होईल यांच्या प्रतिक्षेत असताना अचानक निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यात आला. एकुण १८ जागेसाठी १९४ अर्ज दाखल झाली होती छाननीत १६ अर्ज अवैध ठरल्याने १७७ अर्ज शिल्लक आहेत.माघार घेण्यासाठी गुरूवारी ता. (२०) असल्याने यावेळी कीती उमेदवार माघार घेतील यानंतर खरे चित्र स्पष्ट होईल.यावेळी तालुक्यातील राजकीय समीकरण थोडंसं वेगळं राहण्याची शक्यता आहे.काग्रेस पक्षातील काहि असूतुष्ट मंडळी नव्याने आलेल्या भारत राष्ट्र समिती पक्षात प्रवेश करून राजकीय भवीतव्य उज्वल करणा-यासाठी नशिब आजमावत आहेत तर अंतर्गत गटबाजी आणि भाजप,एमआयएम, वंचीत बहूजन आघाडी, शिवसेना ( ठाकरे गट), शिवसेना (शिंदे गट)राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांचा सामना करताना काँग्रेस पक्षाला तारेवरची कसरत करावी लागणार आहे.राज्यात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि शिवसेना (ठाकरे गटाची) महाआघाडी आहे.स्थानिक पातळीवर हि युती कशी असेल यावर बरंच काही अवलंबून आहे.काग्रेसकडुन स्थानिक पातळीवर शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासोबत हातमिळवणी करण्याचा प्रयत्न केला जात आहे.जागावाटपाचा पेच सूटल्यानंतर युतीवर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे.भाजप, शिवसेना शिंदे गट आणि बिआरएस पक्ष,एमआयएम, वंचीत बहूजन आघाडी याची काय भूमिका असेल याकडे आता लक्ष लागून आहे. तालुक्यातील बाजार समितीत दरवर्षी कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असते. अशा ठिकाणी आपलाच ताबा असावा यासाठी सर्व राजकीय पक्षांनी हि निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे. अर्ज माघार घेतल्यावर खरे चित्र स्पष्ट होणार असेले तरी मलाच उमेदवारी मिळणार अशी स्वप्न रंगवत उमेदवार मतदारांना आतापासूनच गोंजारत असल्याचे दिसून येत आहे.पक्षश्रेष्ठिने अद्याप उमेदवार निश्चित केले नाहीत तरी प्रचाराचा धूमधडाका सूरू झाल्याने मतदार हि भावी उमेदवारांना झूलवत ठेवत असल्याचे समजते.

### माळ कुणाच्या गळ्यात

बाजार समितीत आता पर्यंत अनेक विषय चर्चेला आले होते . हायकमांडने त्यास योग्य वेळी समज देऊन गाडी रूळावर आणली .यावेळी जुन्याना सजवीणार की नव्याच्या गळ्यात माळ टाकणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे . विरोधक काँग्रेस पक्षाला कोंडीत पकडण्यासाठी आतापासूनच सावध भुमिका घेत असल्याने काँग्रेसला डोकेदुखी ठरणार आहे .राजकारणात तरबेज असलेले अशोक चव्हाण हे काय किमया करणार हे पाहणं औत्सुक्याच ठरणार आहे .



# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आचरणात आणा : आ. टोपे

आधुनिक केसरी न्यूज

**अंबड :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे वाचकप्रेमी होते. प्रत्येकांनी वाचन केलेच पाहिजे. वाचाल तर वाचाल डॉ. बाबासाहेबांचा विचार समाजाला उन्नतीकडे नेणारे आहेत. असे मत माजी मंत्री राजेशभैय्या टोपे यांनी भीम जयंतीनिमित्त अंबड येथे व्यक्त केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून माजी मंत्री आ.राजेश टोपे यांच्या हस्ते बहुजन महापुरुषांच्या ग्रंथाचे वाटप करण्यात आले. तसेच प्रत्येकांनी वाचन करणे गरजेचे आहे. वाचाल तर वाचाल हे डॉ. बाबासाहेबांचा विचार सर्व समाजाला उन्नतीकडे नेणारे आहेत. प्रत्येक व्यक्तीला जगाचे ज्ञान असणे गरजेचे आहे. म्हणून सर्वांनी नियमित वाचन करणे महत्वाचे असल्याचे यावेळी आ. टोपे यांनी सांगितले. यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाउपाध्यक्ष चंद्रकांत कारके,युवा नेते राहुल व्हि.खरात.सेवानिवृत्त पोलिस अधिकारी चंद्रकांत दिलपाक,माजी नगराध्यक्ष काकासाहेब कटारे,शहराध्यक्ष अफरोजभाई पठाण, अर्जुनभाऊ भोजने, मोसिनभाई हाश्मी, शिवप्रसाद चांगले,माजी प्राचार्य कुरणकर सर, चेअरमन चंद्रमणी खरात, प्रकाश नारायणकर, महेंद्रभाऊ खरात,गौतमभैय्या ढवळे, शाममहम्मद भाई, शकीलभाई पठाण, अकबर कुरेशी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

# येसगाव येथे आरोग्य शिबिराचे आयोजन..

आधुनिक केसरी न्यूज

**येसगाव :** आरोग्यवर्धिनी केंद्र स्थापन दिवस तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने आरोग्य वर्धीनी केंद्र येसगाव येथे आरोग्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी एकूण 153 नागरिकांनी या मेळाव्यात सहभाग नोंदवून आरोग्य तपासणी करून घेतली.

यावेळी 153 नागरिक यापैकी 38 व्यक्तींना उच्च रक्तदाब असल्याचे आढळून आले तर 23 व्यक्तींना अनियंत्रित मधुमेह असल्याचे निदर्शनात आले.

एका महिलेस स्तनांचा कर्करोग संदर्भात तपासणी करिता FRU कडे



संदर्भित करण्यात आले.

त्याचप्रमाणे क्षयरोग आणि कुष्ठ रोग याचे देखील स्क्रिनिंग करण्यात आले.

यावेळी दोन HIGH RISK ANC MOTHER ची तपासणी करण्यात आली.

त्याचप्रमाणे संशयित रक्तक्षय ग्रस्त रुग्णांपैकी एक महिला SEVERE ANEMIA (HB 6 )ने ग्रस्त आढळली.

एकंदरीत गावातील नागरिकांनी सदरील शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपल्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आवश्यक त्या उपाय योजना करण्याबाबत जाणून घेतले.

नागरिकांना सुदृढ आरोग्य साठी योग्य आहार आणि व्यायाम महत्त्वाचा असल्या संदर्भात माहितीपत्रक वाटण्यात आले.

यावेळी आरोग्य वर्धीनी येसगाव येथील डॉ वैभव बाविस्कर,श्री आहेर सर,श्रीमती शोभा खंडागळे आणि श्रीमती सुलताना आदींची उपस्थिती होती.

# डॉ. आंबेडकर यांना वडोद ग्रामस्थांतर्फे अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** फुलंब्री तालुक्यात असलेल्या वडोद बाजार येथे भारतरत्न महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास ग्रामस्थांच्या वतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. डॉ. आंबेडकर यांच्या 132 व्या जयंतीच्या निमित्ताने ग्रामस्थांच्या वतीने पूर्णाकृती पुतळ्यास सकाळी १० वाजता पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी वडोद बाजार पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास मोरे ग्रामपंचायतीचे सरपंच उपसरपंच व ग्रामविकास अधिकारी, सदस्य, रमेश पा वाघ, दादासाहेब काळे, पत्रकार हेमंत वाघ, शिवराम मस्के, कडूबा मस्के शांताराम तोरणमल, जना भाऊ शिंनगारे, साबेर पठाण गोविंद पांडेजी, शेख रजाकभाई , शेख राजिक, मिर्झा बेग, भाऊसाहेब जाधव, अरुण वायकोस, संजय वाघ, राधाकिसन कोलते, गणेश वाघ शुभम गंगावने, आजिनाथ वाघ, काशिनाथ वाघ, श्याम दुधे, प्रफुल शिंदे, राजिक शेख सचिन तोरणमल, कडूबा नवतुरे, प्रभाकर जाधव, दगडू हिवराळे, सचिन भिवसने, शामराव हिवराळे यांच्या सह यावेळी ग्रामस्थ उपस्थित होते0

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# लोकशाहीवरील दमदार भाषणानंतर 'भुऱ्या'चं नवं भाषण पुन्हा सोशल मीडियावर व्हायरल

आधुनिक केसरी न्यूज

**रामदास पटेकर**

**अंबड :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 132 व्या जयंती निमित्त अंबड तालुक्यातील रेवलगाव या आपल्या जिल्हा परिषद शाळेत भुऱ्या उर्फ कार्तिकने पुन्हा आपल्या दिलखुलास शैलीत भाषण केले आहे. आणी प्रजासत्ताक दिनी केलेल्या भाषणाप्रमाणेच त्याने केलेले हे भाषण देखील सोशल मीडियावर चांगलेच व्हायरल झाल्याने त्याचे सर्वत्र कौतुक होतांना दिसून येत आहे.

प्रजासत्ताक दिनी लोकशाहीवर आपल्या शैलीत भाषण ठोकणाऱ्या कार्तिक वजीर उर्फ भुऱ्या चांगलाच व्हायरल झाला होता. भाषण करण्याची त्याची विनोदी शैली मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह महाराष्ट्राला भावली होती. जालना जिल्ह्यातील रेवलगाव येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत पहिल्या वर्गात शिकणाऱ्या कार्तिकचे तेव्हा खूप कौतुक झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त देखील कार्तिक ने आपल्या शाळेत खुमासदार भाषण देखील सोशल मीडियावर व्हायरल होतांना दिसून येत आहे.

**पाहुयात भोऱ्या ने केलेलं संपूर्ण भाषण.**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आज १३२ वी जयंती आहे. यानिमित्त रेवलगाव येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात देखील सगळ्यांना कार्तिक च्या भाषणाची उत्कंठा होती. अपेक्षेप्रमाणे कार्तिकने त्याच्या अंदाजात खुमासदार भाषण केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला शिका, संघटित व्हा, आणि संघर्ष करा, असं सागितले. पण आपण शिकत नाहीत. शिकलो तर संघटित होत नाहीत. आणि जरी संघटित झालो. तर संघर्ष करण्यास घाबरतो. शेळी म्हणून शंभर दिवस जगण्यापेक्षा एक दिवस वाघ म्हणून जगा, गुलामापेक्षा



गुलामगिरी करणारा आणि अन्याय करणाऱ्या पेक्षा तो सहन करणारा जास्त दोषी असतो. त्यामुळे अन्याय विरोधात उभे राहण्याचा मोलाचं संदेश आपल्याला डॉ. आंबेडकरांनी दिला असल्याचे भोऱ्याने आपल्या भाषणात उपस्थित आपले ग्रामस्थ तसेच गुरुजन व विद्यार्थ्यांसमोर सांगितले.

# नवरंग नागरी सहकारी पतसंस्थेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**निधोना :** नवरंग नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित छत्रपती संभाजीनगर या संस्थेच्या शाखा निधोना येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 132 वी जयंती साजरी करण्यात आली यावेळी शाखेचे मॅनेजर विनोद पाटील गायकवाड व सर्व अधिकारी कर्मचारी व शाखेचे सभासद वर्ग खूप मोठ्या जनसंख्येने उपस्थित होते यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना विनोद पाटील गायकवाड हे म्हणाले की भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विचारसरणी आपण आपल्या डोळ्यासमोर ठेवून कार्य करत रहावे जे अधिकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपणास उपलब्ध करून दिलेले आहेत त्याचा आपण चांगल्या प्रकारे शिक्षण घेऊन फायदा घ्यावा आज जात पात धर्म भेदभाव श्री शिक्षणाचा विषय असेल महिला आरक्षणाचा विषय असेल यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी खूप मोठे मोलाचे कार्य केलेले आहेत असेही ते म्हणाले कि नवरंग नागरी सहकारी पतसंस्था ही नेहमी सभांसदांसाठी नेहमी वेगवेगळे योजना राबवीत असते जसे की मुदत ठेव योजना नवरंग दाम दीडपट ठेव योजना नवरंग दाम दुप्पट ठेव योजना नवरंग धनलक्ष्मी ठेव योजना नवरंग संचय ठेव योजना तसेच या संस्थेमार्फत गरजूंना कर्ज पुरवठा ही वेळोवेळी केला जातो जसे की स्थावर तारण कर्ज असेल नवरंग संचय ठेव कर्ज असेल सोनेतारण कर्ज असेल वाहन तारण कर्ज असेल मुदत ठेवतारण कर्ज असेल कुठल्याही प्रकारची कर्ज मागणी असेल तर वेळोवेळी मागताक्षणी उपलब्ध करून दिले जाते सभासदांना मुदत ठेवी वरती मंथली व्याज ही दिल्या जाते व ज्येष्ठ नागरिकांना होम सर्विस देण्याचे कार्य संस्थेने हाती घेतलेले आहेत तरी सदरील सर्व योजनेचा सभासदांनी तसेच पंचक्रोशीतील नागरिकांनी लाभ घ्यावा तसेच संस्थेच्या अध्यक्षा मा. सौ श्वेता पवन अधाने पाटील या नेहमी समाज कार्यामध्ये अग्रेसर असतात महा पुरुषांची जयंती असेल किंवा छोटे मोठे कार्यक्रम असेल नेहमी शाखेमध्ये साजरे केले जातात.






# शेतकरी जिनिंग प्रेसिंग संचालकपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल अभिनंदन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार येथील शेतकरी जिनिग प्रेसिंग सहकारी संस्थेचे संचालक पदी डॉ अनिल रंगनाथ वाघ, राजेंद्र एकनाथ पाथ्रीकर, रामदास संपत कोलते, गंगाधर संपतराव सोनवणे, राजू शंकर मस्के, यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल गावकऱ्यांच्या वतीने व तालुक्यातील विविध राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने पुढील कामास शुभेच्छा देऊन सत्कार करण्यात येत आहे त्यावेळी उपस्थित भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष माननीय श्री सुहास भाऊ शिरसाठ, माजी जिल्हा परिषद सदस्य शिवाजीराव पाथ्रीकर, माजी महिला बालविकास सभापती अनुराधाताई चव्हाण ,माजी बांधकाम सभापती जिल्हा परिषद किशोर नाना बलांडे, माजी पंचायत समिती सभापती सविताताई फुके , मंगल ताई कापरे, उपसरपंच डॉ गोपाल वाघ ,साबेर पठाण, राधाकिसन पाटील कोलते, आसाराम कोलते ,राजू तुपे मिठू पारखे, सुदामराव तुपे , आप्पा कापरे ,बंडू बेडगे, राजू तुपे, आजिस शेख, सलीम भाई, अण्णा दादा वाघ, काकाजी तुपे, काकाजी कापरे, पत्रकार हेमंत वाघ, शाम तुपे काकाजी कोलते, स्वप्निल पाथ्रीकर, सचिन तोरणमाल, असे विविध राजकीय व सामाजिक व ग्रामस्थ यांच्याकडून शेतकरी जिनिग सहकारी संस्थेचे संचालक पदवी बिनविरोध झाल्याबद्दल त्यांचे खूप खूप अभिनंदन व शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात येत आहे पुढील कामात शुभेच्छा देण्यात आल्या.





# लोणी खुर्द येथे निळ्या पाखरांचे महामानवाला अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**लोणी खुर्द :** वैजापुर तालुक्यतील लोणी खुर्द येथे विश्वरत्न महामानव भारतिय घटनेचे शिल्पकार. बाबासाहेबआंबेडकरयांची १२७ वीजयंती  मोठ्या ऊत्साहात साजरी करुन यावेळी निळ्या पाखरांनी महामानवाला अभिवादन केले. जागतिक पातळीवर ज्यांचीजयंतीधुमधडाक्यात आणी जल्लोषाने साजरी होते ते म्हणजेच एकमेव विश्वरत्न बोधिसत्व तथा राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेबआंबेडकरयांची जयंतीऊत्सवानिमित्त लोणी खुर्द येथे  पंचशिल ध्वजारोहन करुनबाबासाहेबआणी तथागत गौतम बुध्द यांच्या प्रतिमेचे पुजन व हारार्पन केले.व मान्यवरांनीबाबासाहेबांच्या जीवनकार्यावर आपल्या मनोगतातुन प्रकाश टाकला. महिलांनी सामुहिक वंदना दिली यावेळी लोणी खुर्द गावासह परीसरातील भिम सैनिक मोठ्या संख्येने उपस्थितीत होते पोलिस बंदोबस्त मोठ्या प्रमाणात होता.






## अंबड तालुक्यातील शेळके दांपत्याला राज्यस्तरीय पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**अंबड :** तालुक्यातील डोमेगाव येथील सविता बाबासाहेब शेळके व बाबासाहेब शेळके यांना आपल्या गांवात क्रांतिसुर्य महात्मा जोतीराव फुले यांना अभिप्रेत असलेले समाजकार्य केल्याने या शेळके पती पत्नीचे श्री संत शिरोमणी सावता माळी सेवाभावी संस्था व महात्मा फुले ब्रिगेड महाराष्ट्र च्या वतीने महात्मा फुले जयंती निमित्त लातूर येथे दि.9 एप्रिल रोजी राज्यस्तरीय "महात्मा फुले समाजरत्न पुरस्कार" देऊन सन्मानित करण्यात आले आहे. यावेळी संत शिरोमणी सावता माळी सेवाभावी संस्था व महात्मा फुले ब्रिगेड यांच्या वतीने प्रदेशाध्यक्ष दत्तात्रय किसनरावं चांभारगे (माळी) यांची उपस्थिती होती.

## आयु:पंख संघटनेतर्फे आरोग्य दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** स्त्री वैद्या संचलित आयुःपंख संघटनेतर्फे सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ ,संत रोहिदास आरोग्य केंद्र मुकुंदवाडी येथे जागतिक आरोग्य दिन साजरा करण्यात आला यावेळी डॉ. रीना देशमुख यांनी 14 ते 20 वर्ष वयोगटातील किशोरवयीन मुलींना आहार आणि मासिक पाळी या संदर्भात मार्गदर्शन केले यावेळी सौ.वर्षा पाटील (संत रोहिदास आरोग्य केंद्र प्रमुख) यांच्या विशेष सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

वंदना सुरडकर (किशोरी विकास प्रकल्प संचालिका) सौ. कोमल मोरे (किशोरी विकास प्रकल्प समन्वयक), सौ. अनिता उमरे (तेजस्विनी महिला प्रकल्प समन्वयक) सौ.अनिता सपकाळ (किशोरी विकास प्रकल्प समन्वयक) व सौ. कल्याणी अवसरमोल व सौ. कल्पना नन्नावरे (किशोरी विकास प्रकल्प संवादिनी ताई) या सर्वांचे सहकार्य लाभले . तसेच आयुःपंख च्या डॉ. सुनीता परिहार, डॉ. सुचिता सावळे, डॉ. सुनीता राठोड, डॉ. स्नेहल विभुते, यांनी सर्व मुलींची आरोग्य तपासणी केली व शंकाचे निरसन केले. डॉ. मंगल ताठे यांनी सूत्रसंचालन केले आणि डॉ. वृषाली निर्वे यांनी आभार प्रदर्शन केले.




## पत्रकार महामंडळ स्थापण्यासाठी केंद्राच्या हालचाली?

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** देशात प्रत्येक वंचित घटकांच्या मदतीसाठी असणाऱ्या महामंडळाप्रमाणे देशातल्या सर्व पत्रकारांच्या सर्वांगीण विकासासाठी महामंडळा असावे अशी मागणी दिल्लीमध्ये 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या केंद्रीय शिष्टमंडळाने केली. भागवत कराड यांनी या प्रकरणी सकारात्मक संकेत दिले आहेत. देशातल्या प्रत्येक राज्यातल्या पत्रकार महामंडळाला दरवर्षी शंभर कोटी रुपये देण्यात यावेत, अशी मागणी 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, केंद्रीय राज्यमंत्री भागवत कराड यांच्याकडे केली आहे.

'कोविड'च्या काळापासून देशातील पत्रकार खूप अडचणीत आले आहेत. अनेकांची नोकरी गेली आहे. देशात कोविडच्या काळात अनेक पत्रकारांचे प्राण गेले आहेत. त्या प्राण गमावलेल्या पत्रकारांच्या कुटुंबीयांना आता मदतीची नितांत गरज आहे. मोठ्या शासकीय मदतीमधून सर्व राज्यांतील पत्रकारांना चांगले दिवस येऊ शकतील. त्यासाठी महामंडळाची आवश्यकता आहे. पत्रकारांचे आर्थिक सक्षमीकरण काळाची गरज होऊन बसले आहे. देशात केवळ एकवीस टक्के पत्रकार आपल्या कुटुंबाला जेमतेम आधार देऊ शकतात, अशी अवस्था आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी या विषयी सकारात्मक पावले उचलू, असे सांगितले; तर केंद्रीय राज्यमंत्री भागवत कराड यांनी भेटीदरम्यान सांगितले की, पत्रकारांच्या सर्वांगीण विकासासाठी महामंडळ हा विषय खूप महत्त्वाचा आहे. या विषयात अजून खोलवर जाऊन, संशोधनाचा आधार घेऊन हा विषय मार्गी लावण्याबाबत मी पुढचे पाऊल टाकणार असल्याचे कराड म्हणाले.

खुद्द केंद्रीय अर्थमंत्री यांनी केवळ आश्वासन न देता काम मार्गी लावू, असे सांगितल्यामुळे आता महामंडळाच्या कामाला सुरुवात होईल. पत्रकारांच्या आयुष्यात चांगले दिवस येतील,  अशी आशा आता पल्लवित झाली आहे. 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, राष्ट्रीय  सरचिटणीस चंद्रमोहन पुप्पाला, राष्ट्रीय उपाध्यक्ष धर्मेंद्र जोरे, 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे मार्गदर्शक संचालक ओमप्रकाश शेटे, 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या आरोग्य सेलचे प्रमुख, भिमेश मुतुला, 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे संचालक श्यामसुंदर माडेवार, यांचा या शिष्टमंडळामध्ये सहभाग होता.



### पत्रकारांच्या भवितव्यासाठी केंद्राने महामंडळाचा धाडसी निर्णय घ्यावा : संदीप काळे

सगळेच व्यवसाय करतात, मग पत्रकारांनी व्यवसाय केला तर भुवया उंचवण्याचे कारण काय, नोकरीचा भरोसा नाही . जेमतेम पगार, अशा परिस्थितीमध्ये सन्मानाने जगायचे कसे,  हा प्रश्न देशातील 85 टक्के पत्रकारांसमोर उभा आहे . पत्रकारांचे असलेले आयोग, पत्रकारांना जेमतेम जगण्यासाठी असलेल्या अनेक स्वरूपाच्या प्रलंबित मागण्या या जशाच्या तशा कित्येक वर्षांपासून खितपत पडल्या आहेत . त्या त्या राज्याच्या ठिकाणी, या कठीण परिस्थितीकडे सातत्याने लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला गेला, पण तिथे सतत दुर्लक्ष होत गेले . अशा कठीण परिस्थितीमध्ये आता केंद्राने पत्रकारांच्या प्रश्नाकडे लक्ष देणे गरजेच आहे . केंद्राने ठरवले तर महामंडळ सुरू करणे ही अवघड बाब नाही . त्यासाठी केवळ इच्छाशक्ती महत्त्वाची आहे . महामंडळाचे स्वरूप कसे असावे, कशा पद्धतीने पत्रकार या महामंडळाच्या माध्यमातून उभा राहू शकतो . याचा पूर्ण आराखडा 'व्हॉईस ऑफ मीडिया'ने तयार केला आहे . सरकारने या आराखड्याच्या माध्यमातून पत्रकारांच्या दृष्टीने असलेल्या महामंडळाचा निर्णय घेऊन ऐतिहासिक भूमिका बजावावी, अशी मागणी 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे संस्थापक– राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांनी केंद्र सरकारकडे केली आहे .

## नक्षलवाद्यांमध्ये आणि पोलिसांत चकमक

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** जिल्ह्यातील सालेकसा पोलीस ठाणे अंतर्गत मुरकुटडोह आऊटपोस्टअंतर्गत येत असलेल्या छत्तीसगड सीमेवरील दक्षिणपूर्व भागातील आऊट पोस्टपासून 3 कि.मी.अंतरा वरील टकेझरी जंगल पहाडी परिसरात शुक्रवारला सायकांळी साडेसहा ते सात वाजेच्या सुमारास पोलिसांसोबत नक्षलवाद्यांची चकमक झाल्याची घटना घडली. या घटनेत सहा ते सात नक्षली हे छत्तीसगड वरुन महाराष्ट्रातील सीमेवरील जंगलात शिरत असल्याचे शोध मोहिमेवर असलेल्या गोंदिया पोलिसांच्या पथकाला दिसताच त्यांनी त्यांच्यावर गोळीबार केला. नक्षल्यांनीही गोळीबार करत घटनास्थळावरुन परत छत्तीसगडच्या दिशेने फरार झाले. या घटनेत कुणीही जखमी झाला नसून सालेकसा पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद करण्यात आली आहे. सहा ते सात संशयित व्यक्तीच्या हालचाली या परिसरात असल्याची गुप्त माहिती मिळाली असता त्या परिसरात शोधमोहीम वाढवली होती. दरम्यान, महाराष्ट्राच्या सीमेत शिरत असताना शोधमोहीम करणाऱ्या पथकांनी त्यांचेवर गोळीबार केला असता त्यांच्याकडून परत गोळीबार करण्यात आला. दोन्हीकडून अर्धातास गोळीबार झाला.



# मंदिरावरील ध्वज काढल्याने जिंतूरात काही काळ तणाव

## काही काळ बाजारपेठ बंद मुख्याधि कार्यावर गुन्हा दाखल करण्यासाठी पोलीस ठाण्यात ठिया

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी.रामपूरकर**

**जिंतूर :** शहरातील रामनवमी व हनुमान जयंती निमित्त लावण्यात आलेले भगवे झेंडे कोणतीही पूर्व सूचना न देता काढण्यात आली यावेळी न पंचा कर्मचाऱ्यांनी शनि मंदिर मंदिरावर चेही झेंडे काढल्यामुळे गुरुवार 13 एप्रिल रोजी जिंतूर शहरात मोठा तणाव निर्माण झाला समाज बांधवांच्या वतीने मोर्चा काढत पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन करण्यात आली मुख्याधिकाऱ्यांवर पुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली जिंतूर शहरातील बाजारपेठ काही कडकडीत बंद होती जिंतूर शहरातील मुख्य बाजारपेठेत रामनवमी व हनुमान जयंती निमित्त भगवे झेंडे लावण्यात आले होते गुरुवार दिनांक 13 एप्रिल रोजी कोणती पूर्व सूचना न देता कर्मचाऱ्यांनी झेंडे काढून गाडी टाकली कचऱ्याच्या गाडीत टाकल्यावरून यावेळी मंदिरावरील झेंडे काढल्याने शहरात मध्ये तणाव निर्माण झाला समाज बांधवांचा एक मोठा जमाव तहसील कार्याजवळ जमा झाला ही बाब बाजारपेठेत पसरतात तात्काळ बाजारपेठ बंद झाली थोड्यावेळाने जमावणे पोलीस ठाण्यावर मोर्चा काढला जोपर्यंत मुख्याधिकारी यांच्यावर उन्हा दाखल होत नाही






तोपर्यंत पोलीस ठाण्यातून उठणार नाही असा पवित्रा जमावाने घेतला तब्बल दीड तास पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन करण्यात आले परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन अपर पोलिस अधीक्षक यशवंत काळे तहसीलदार अमित घाडगे मुख्याधिकारी जगताप पोलीस ठाण्यात दाखल झाले.

तसेच या प्रकरणात गुन्हेगार अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यासंदर्भात जमावणे हट्ट धरला शनी मंदिरावरील भगवा ध्वज एका मुस्लिम कर्मचाऱ्यामार्फत काढण्यात येतो कसा असेही तक्रारीत नमूद करण्यात आली असून मुख्याधिकारी यांनी रोडवरील साईडचे आंब्यावरील ध्वज काढावयास पाहिजे असतानी मुद्दाम होऊन समाजामध्ये वाद निर्माण होणाऱ्या हेतूने नगरपरिषद जिंतूरचे मुख्याधिकारी यांनी कर्मचारी यांनी संघटने लोकांच्या व्यक्तिगत मालकीण च्या जागेतील तसेच मंदिरावरील भगवे झेंडे काढले आणि ते झेंडे धर्मांच्या अपंग करण्याचे हेतूने नगरपरिषद जिंतूर यांच्या मालकीच्या कचरा वाहतूक करण्याच्या घंटागाडी मध्ये टाकली सदरील बाब पोलीस स्टेशन जिंतूर यांना निर्देश आणून दिल्यानंतर पोलीस उपविभागीय अधिकारी यांनी तक्रार देण्यास दिलेल्या शिष्टमंडळात उद्धटपणे बोलून कारवाई केल्याने काय होते ?निलंबित केल्याने काय होते ?अशा प्रकारे बोलून तिथे तक्रार देण्यात आलेले शिष्टमंडळात उद्धटपणे वागून गर्वर्तन केले प्रशासनाला जिंतूर शहरांमध्ये या प्रकरणावरून काय सिद्ध करायचे होते असाही प्रश्न जनतेत उपस्थित होत आहे. दिलेल्या निवेदनावर लक्ष्मण बुधवंत, गंगाप्रसाद घुगे ,प्रमोद कराड, एडवोकेट मनोज सारडा ,अडवोकेट कपिल निकम ,अमोल देशमुख, बाळासाहेब काजळे, प्रशांत रोकडे, अविनाश देशमुख, दत्तात्रय कटारे, आकाश रहाटे, भारत मेहता ,प्रदीप चौधरी, रोहन देशमुख, कृष्णा सांगळे ,रंगनाथ मुटकुळे, प्रदीप राठी, प्रकाश सोनी, सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांच्या व नागरिकांच्या साक्षर या आहेत.

# महावितरणमध्ये भीमजयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलात छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती उत्सव समितीतर्फे कर्मचाऱ्यांच्या पाल्यांची वक्तृत्व स्पर्धा, व्याख्यान, मशाल रॅली अशा विविध उपक्रमांनी डॉ.आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता सचिन तालेवार होते. यावेळी उच्च न्यायालयातील अधिवक्ता विष्णू ढोबळे, शहर मंडलाचे अधीक्षक अभियंता प्रकाश जमधडे, ग्रामीण मंडलाचे अधीक्षक अभियंता प्रवीण दरोली, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील, जनसंपर्क अधिकारी ज्ञानेश्वर आर्दड, कार्यकारी अभियंता सतीश खाकसे, प्रेमसिंग राजूपत, महेश पाटील, जयंत खिरकर, विश्वनाथ लहाने, सहायक अभियंता रूपाली पहूरकर, समितीचे सचिव सुनील बनसोड, कोषाध्यक्ष डॉ.कृष्णा काळदाते यांची प्रमुख उपस्थिती होती.

भीमजयंतीनिमित्त कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत



बालगटात राजेश्री शिंदे-प्रथम, रिया भवर-द्वितीय, परिणीती शिंदे -तृतीय तर मोठ्या गटात राजलक्ष्मी सूर्यवंशी- प्रथम व कृष्णा सूर्यवंशी-द्वितीय यांना पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. स्पर्धेचे परीक्षण प्रा.डॉ.गहिनीनाथ वळेकर यांनी केले.

भीमजयंतीनिमित्त सकाळी विद्यापीठातील बाबासाहेबांचा पुतळा ते मिलकॉर्नरवरील महावितरणच्या परिमंडल कार्यालयापर्यंत ज्ञानज्योती मशाल यात्रा काढून वीजचोरीचे दुष्परिणाम, वीज बचत, वीजबिल भरण्याचे महत्त्व याबाबत महावितरणचे कर्मचारी संजय शाहीर, नारायण खरात, विशाल घायाळ, शशी सपकाळ, विनोद तित्तर, प्रेमचंद चव्हाण, विजय पवार, विनायक देवकर, विवेकानंद बांगर, कृष्णा काळदाते, तुळशीराम सपकाळ यांनी जनजागृती केली. यावेळी प्रमुख वक्ते विष्णू ढोबळे म्हणाले की, डॉ.आंबेडकर हे दीनदलित, कामगार, शेतकरी, महिलांना न्याय देणारे महापुरुष होते. त्यांनी लिहिलेल्या संविधानाप्रमाणे वाटचाल करण्याची आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

अध्यक्षीय समारोप करताना मुख्य अभियंता सचिन तालेवार म्हणाले की, बाबासाहेबांनी भारतातील विद्युत क्षेत्राच्या विकासाची पायाभरणी केली. त्यांच्या विचारांनुसार महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी ग्राहकांना सर्वोत्कृष्ट सेवा देण्यासाठी कार्यरत असले पाहिजे. जयंती उत्सव समितीने यावर्षी राबवलेल्या विविध उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले. प्रास्ताविक सुनील बनसोड यांनी केले. यावेळी महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार संघटनेचे सरचिटणीस सय्यद जहिरोद्दिन, महाराष्ट्र विद्युत अभियंता-अधिकारी-कामगार सेनेचे कार्याध्यक्ष शीलरत्न साळवे, महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे प्रादेशिक सचिव तुषार भोसले, सबऑर्डिनेट इंजिनिअर्स असोसिएशनचे प्रादेशिक सचिव अविनाश चव्हाण, वर्कर्स फेडरेशनचे पदाधिकारी बी.एल. वानखेडे, पांडुरंग पठाडे, मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचे परिमंडल अध्यक्ष गौतम पगारे, महाराष्ट्र नवनिर्माण वीज कामगार सेनेचे कार्याध्यक्ष नारायण खरात आदींसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# मोलखेडा येथे आंबेडकर जयंती उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडा येथे ग्रामपंचायत कार्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२ व्या जयंती निमित्त बहूजनाचे कैवारी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन सरपंच मनीषाताई ज्ञानेश्वर वारंगणे, केंद्र प्रमुख श्रीमती एस.बी.राठोड मॅडम व ग्रामसेविका सुरेखा पवार मॅडम यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यासंगी ग्रामपंचायत सदस्य वारांगणे चेअरमन यांनी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती बद्दल थोडक्यात माहिती दिली.

यावेळी सरपंच मनिषाताई वारंगाणे, उपसरपंच गुलाबसिंग राणा, केंद्र प्रमुख एस.बी.राठोड मॅडम, ग्रामसेविका सुरेखा पवार मॅडम, अतुल इंगळे, दिगांबर वारंगणे,सौ.शालुबाई शेळके, उषाबाई लोंढे, शेख इमान शेख इरफान अभिमान वारंगणे तंटामुक्ती अध्यक्ष,संग्रामसिंग निकुंभ तंटामुक्ती उपाध्यक्ष, ग्रामपंचायत कर्मचारी रामलाल झांबरे, गोपाळ चव्हाण,विजय वारंगणे, अमोल शेळके, वैभव गायकवाड, स्वानंद पाटील,राजमल हजेरी चव्हाण सर, व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तपोवन, निंभोरा भागातील धुमाकुळ माजवणारा बिबट्याचा विहीरीत पडून मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील तपोन, निंभोरा भागातील धुमाकुळ माजवणारा बिबट्याचा अखेर मृत्यु तपोन, निंभोरा मागील काही दिवसा पासुन हा शेळ्याचा फडशा पाडणारा तसेच शेतकऱ्यांना घाबरवणारा बिबट्याचा अखेर चार ते पाच दिवसात मृत्यु झालेचे दिसून येत आहे हा बिबट्या तपोवन भागातील विहीरीत चार ते पाच दिवसापासुन मृत अवस्थेत होता नेमके तो पाण्याच्या की भक्ष्यकाच्या शोधात होता मात्र या कडे वन्यजिव विभागाने दुर्लक्ष केल्याने तो चार ते पाच दिवसापासुन विहीरीतच पडुन होता मात्र या कडे राऊड वर अघिकारी कर्मचारी यांचे दुर्लक्ष झाल्याने विहीरीतच पडुन होता अशीही चर्चा सुरू आहे.

हा बिबट पाण्याच्या की भक्ष्यकाच्या शोधात होता याचा खुलासा मात्र होऊ शकला नाही की त्याचा कोन्ही काटा काढला अशी चर्चा सध्या सुरू आहे मात्र वन्यजिव विगाचे अक्षम्य दुर्लक्ष दिसुन येत आहे. शेवटी प्रादेशीक विभाग तसेचे रेस्क्यु टिमने विहरीतुन मृत अवस्थेत बिबट काढण्यात यश आले आहे.






# जामठी येथे डॉ. आंबेडकरांना विनम्र अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील जामठी येथे ग्रामपंचायत कार्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२ व्या जयंती निमित्त बहूजनाचे कैवारी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन सरपंच वैशाली राठोड उपसरपंच रमेश जाधव व ग्रामसेवक संदीप सावंत यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यासंगी सरपंचपती विलास राठोड (सामाजिक कार्यकर्ते) यांनी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती बद्दल बहूजनाचे कैवारी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बहुजनांना त्यांचा न्याय हक्क मिळवून देण्यासाठी स्वाताहाचे आयुष्य वाहून घेतले ओ बी सी समाजाला आरक्षण दिले आज आपल्याला मतदानाचा अधिकार दिला हूकूमशाही मोडून लोकशाहीचा अधिकार दिला आज आपण त्या लोकशाहीच्या अधिकारावर आपण आपले अस्तित्व टिकवून आहे.असे डॉ बाबासाहेब आंबेडकर अधूनिक कार्य आहे अशी थोडक्यात माहिती दिली.यावेळी सरपंच वैशाली राठोड, उपसरपंच रमेश जाधव, ग्रामसेवक संदीप सावंत, कृष्णा जाधव, अर्जुन जाधव, प्रशांत देवकर,पो पा.घनशाम जाधव,व्यास्थापन शाळा समिती चे अध्यक्ष उमेश सरोदे ,रत्न सुरवाडे, वंशराम जाधव, ग्रामपंचायत कर्मचारी प्रकाश चव्हाण तंटामुक्ती अध्यक्ष व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# जि.प. प्रार्थमिक शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बुद्धवंदना

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे दिनांक 14 एप्रिल 2023 रोजी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सावळदबारा या ठिकाणी भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची 132 वी जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जब्बार तडवी यांनी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यानंतर केंद्रीय मुख्याध्यापक एम.डी. सोनोने सर व भागवत गायकवाड सर यांनीही प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. यावेळी श्रीमती निता हिरास मॅडम, गजानन गवई सर, सतीश ढोणे सर, प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ विशाल राजपूत, विकास मापारी सर, नागापुरे आरोग्य सेविका, कडुबा गोरे, सोमासे आरोग्य कर्मचारी तसेच आशा कर्मचारी आदी उपस्थित होते. याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी माहिती सांगितली. त्यानंतर भागवत गायकवाड सर यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर विषयी माहिती सांगितली. त्यानंतर श्रीमती निता हिरास यांनी उपस्थितांचे आभार मानले. अशाप्रकारे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सूत्रसंचालन भागवत गायकवाड यांनी केले. यावेळी विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ, मान्यवर उपस्थित होते.

# डाभा येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बुद्धवंदना

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील डाभा येथे ग्रामपंचायत कार्यालयात दि.१४/४/२३ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२ व्या जयंती निमित्त बहूजनाचे कैवारी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन सरपंच राहूल हेलोडे, व ग्रामसेवक प्रदिप पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यासंगी सरपंच राहुल हेलोडे यांनी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती बद्दल बहूजनाचे कैवारी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बहुजनांना त्यांचा न्याय हक्क मिळवून देण्यासाठी स्वाताहाचे आयुष्य वाहून घेतले ओ बी सी समाजाला आरक्षण दिले आज आपल्याला मतदानाचा अधिकार दिला हूकूमशाही मोडून लोकशाहीचा अधिकार दिला आज आपण त्या लोकशाहीच्या अधिकारावर आपण आपले अस्तित्व टिकवून आहे.असे डॉ बाबासाहेब आंबेडकर अधूनिक कार्य आहे. अशी थोडक्यात माहिती दिली. यावेळी सरपंच राहुल हेलोडे, उपसरपंच विद्दाताई दांडगे, गणेश कुल्ले, भास्कर जाधव,राजू जाधव, विक्रम वाघ, ग्रामपंचायत सर्व सदस्य, अंगणवाडी सेविका, कर्मचारी तंटामुक्ती अध्यक्ष व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# घाणेगाव तांडा येथे आंबेडकर यांना विनम्र अभिवादन



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील घाणेगांव तांडा येथे ग्रामपंचायत कार्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२ व्या जयंती निमित्त बहूजनाचे कैवारी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन सरपंच रत्नाताई सुरेश चव्हाण, उपसरपंच हिरा जाधव व ग्रामसेवक एस.ए.रणसिंग यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यासंगी सरपंचपती सुरेश चव्हाण (सामाजिक कार्यकर्ते) यांनी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती बद्दल बहूजनाचे कैवारी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बहुजनांना त्यांचा न्याय हक्क मिळवून देण्यासाठी स्वाताहाचे आयुष्य वाहून घेतले ओ बी सी समाजाला आरक्षण दिले आज आपल्याला मतदानाचा अधिकार दिला हूकूमशाही मोडून लोकशाहीचा अधिकार दिला आज आपण त्या लोकशाहीच्या अधिकारावर आपण आपले अस्तित्व टिकवून आहे.असे डॉ बाबासाहेब आंबेडकर अधूनिक कार्य आहे अशी थोडक्यात माहिती दिली.यावेळी सरपंच रत्नाताई सुरेश चव्हाण, उपसरपंच हिरा जाधव, ग्रामसेवक एस.ए.रणसिंग, उपसरपंच अंजू हिरा जाधव,ईम्तीयाजबी तडवी, बबितताई राठोड, मुक्ताबाई राठोड, जनाबाई पवार,करुणाबाई चव्हाण, लक्ष्मण सुदाम पवार, महेश राठोड,लवकेश राठोड, ग्रामपंचायत कर्मचारी ईश्वर चव्हाण,राजमल चव्हाण, सुभाष जाधव, गोपाळ चव्हाण, जगन्नाथ चव्हाण, सुरेश शेळके, गोविंद महाराज, तंटामुक्ती अध्यक्ष व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वैजापुरात नागरिकांचे डॉ. आंबेडकरांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** माजी आमदार स्व. आर. एम. वाणी यांनी स्थापन केलेल्या आधार जेष्ठ नागरिक सेवा संघाच्या कार्यक्रमात शुक्रवार(ता. ०१४) एप्रिल २०२३रोजी संत तुकाराम महाराज सभागृहात जेष्ठ नागरिक सभा झाली या सभेत विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला व थोर समाजसुधारक महात्मा जोतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. आधार जेष्ठ नागरिक संघाच्या या कार्यक्रमात व्ही,एस, शिंदे यांचे या थोर व्यक्तीच्या जीवन व कार्य कर्तृत्ववर व्याख्यान झाले,अध्यक्षस्थानी अण्णासाहेब शेळके होते,तर व्यासपीठावर वैजीनाथ आप्पा मिटकरी व वसंतराव साळुंके होते, सामाजिक कार्यकर्ते,धोंडीरामसिंह राजपूत यांनी सूत्र संचलन करून प्रास्ताविक केले,उपाध्यक्ष उत्तमराव साळुंके यांनी प्रार्थना व पसायदान म्हटले, आभार आसाराम निकम यानी मानले, मुकुंद दाभाडे यांनी पांच हजार रुपये व प्रेमसिंग राजपूत यानी संघाला पाचशे रुपये देणगी दिली त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला,या प्रसंगी जेष्ठ नागरिक से, नि,पोलीस अधिकारी सोपानराव निकम,पोपट भोसले,दगु वाणी, नारायण लाडवाणी,भागीनाथ निकम, बाबुराव वाणी,अशोक आप्पा पवार, कृष्ण कांबळे,पारे मामा,काळे मामाश्री,धामणे, देशमुख, शिंदे साहेब यांची उपस्थिती होती.



# डॉ. आंबेडकर यांना अभिवादन करून स्वच्छतेचा संदेश

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** १४ एप्रिल,हा दिन भारतीय संविधानाचे जनक विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मदिन हा दिन वैजापूर शहरात संपूर्ण भारतीयांचा महा उत्सव म्हणून साजरा करण्यात आला. डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याचे सुशोभिकरण व त्याजवळ असलेले भारतीय संविधानच्या पहिल्या पानावरील उद्धेशिका चे हिंदी आणि इंग्रजीत उतारा व पुतळ्याभोवती मनाला भावणारी सजावट हे सर्व म्हणजे डॉ,आंबेडकर यांच्या जयंती दिनाला सण व उत्सवाचे आनंददायी रूप होय. या दिनाचे औचित्य साधत आ.रमेश पा. बोरनारे व येथील पालिकेच्या नगराध्यक्ष शिल्पाताई दिनेशभाऊ परदेशी, उपनगराध्यक्ष साबेरखान,मुख्याधिकारी भागवत बिघोत ,माजी नगराध्यक्ष डॉ,दिनेश परदेशी व सर्व नगरसेवक, अभियंता, कर्मचारी यांच्या मार्गदर्शन खाली कार्यरत पालिकेच्या स्वच्छता विभागाच्या वतीने स्वच्छता निरीक्षक प्रमोद निकाळे, सहायक रमेश त्रिभुवन व स्वच्छता दूत धोंडीरामसिंह राजपूत यांनी सकाळी सहा वाजता डॉ,बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार टाकून स्वच्छतेला आरंभ केला तर येथील सायकलिस्ट व स्वीमिंग ग्रुप चे सर्वश्री जयराम खाडे, बाबासाहेब जगताप, दिलीप अनर्थे, व सर्व सायकलिस्ट व स्वीमिंग ग्रुपने पुतळ्याला पुष्पहार टाकून अभिवादन केले व सायकल चालवा-आयुष्य वाढवा, आरोग्य हीच संपत्ती ,झाडे लावा झाडे जगवा माझी वसुंधरा मी वसुंधरेचा हे संदेश देत खंडाळा गावापर्यंत रॅली काढली या रॅली ला धोंडीराम राजपूत यानी ध्वज दाखविला व "शिका,संघटित व्हा व संघर्ष करा ,स्वच्छता पाळा, संविधान वाचन करा हा संदेश दिला या प्रसंगी भीमा शंकर तांबे,श्री वारकर,लक्ष्मण देवरे, डॉ,थोरात, डॉ, जगताप, शौर्य गाढे, सोहम घुमरे उपस्थित होते.